सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १०२ । पाने १२ । किंमत रु. ६/- |RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचा सत्कार

सोलापूर : मराठी वन्यजीव अभ्यासक, लेखक वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी. नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही अशी ६५ वर्षे जंगलात काढणारे, जंगलातील प्राणीजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे, लेखन अतिशय ओघवत्या शैलीत करणारे, त्यांचे वाचनही प्रचंड व त्यांना पुस्तकांचीही आवड असणारे पद्मश्री विजेते अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांची आदर्श बालक मंदीरचे शिक्षक जनार्दन वाघमारे यांनी भेट घेऊन सत्कार केला.

# ‘शेतकरी ओळखपत्रासाठी’ राज्यातून ४२ लाख ६८ हजार शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी

### सोलापुरातून दीड लाख तर विभागातून साडेदहा लाख शेतकऱ्यांचा योजनेत सहभाग

**तभा वृत्तसेवा।**
**अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ‘अ‍ॅग्रीस्टॅक’ या डिजीटल उक्रम द्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना अ‍ॅग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. या फार्मर आयडीसाठी सोलापुरातून १ लाख ५१ हजार ५०८ तर पुणे विभागातून १० लाख ५१ हजार ५६० जणांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. तर संपूर्ण राज्यातून ४२ लाख ६८ हजार ०१९ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्रासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

राज्यात अमरावती विभागातून ६ लाख ४७ हजार ५७४, छत्रपती संभाजीनगर ८ लाख ७५ हजार ४३३, कोकण २ लाख ८ हजार ३२४, नागपूर ५ लाख ९ हजार ४३५, नाशिक ९ लाख ७५ हजार ३७६, मुंबई ३१७ तर पुणे



विभागातून सर्वाधिक १० लाख ५१ हजार ५६० इतक्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. तर राज्यातून ४२ लाख ६८ हजार ०१९ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्रासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. आता या शेतकऱ्यांना शासनस्तरावरून शेतकरी ओळखपत्र लवकरच मिळणार आहेत.

**फार्मर आयडीसाठी कोणती लागतात कागदपत्रं?**
केंद्र व राज्य सरकारकडून शेती विषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा, गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करून आपला अर्ज ऑनलाईन भरता येतो.

**डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शेतकऱ्यांचे साधणार हित**
अ‍ॅग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. अ‍ॅग्रीस्टॅक हा प्रकल्प बीड जिल्ह्यात राबवण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल.

**पीएम किसान सन्मान निधीसाठी लागणार फार्मर आयडी**
शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे. यामुळे शेतकरी बांधव ई-सेवा केंद्रांवर गर्दी करताना दिसून येत आहे.

**या कार्डद्वारे खालील योजनांचा होणार लाभ**
पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभाच्या हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणं आवश्यक आहे.

**-मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी**

**करोडो शेतकऱ्यांना होणार फायदा**



यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विविध घोषणा केल्या आहेत. यामधील महत्वाची घोषणा म्हणजे किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवण्यात आली आहे. ही मर्यादा ३ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्यात आली आहे. शेतकरी आता १ एप्रिल २०२५ पासून ५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी अर्ज करु शकतील. याचा फायदा करोडो शेतकऱ्यांना होणार आहे.

**१८ वर्षे वयानंतरच मिळणार किसान क्रेडिट कार्ड**
किसान क्रेडिट कार्ड योजनेत शेतकऱ्यांना अर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे लागते. मात्र योजनेमध्ये कमाल वयाची मर्यादा नाही. आता सरकार या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. हे कर्ज पाच वर्षांपर्यंत घेता येते. किसान क्रेडिट कार्डची वैधता देखील पाच वर्षांपर्यंत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### शिवप्रेमी प्रतिष्ठानच्यावतीने शिवमूर्तीची प्रतिष्ठापना

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोलापुरातील पांडुरंग वस्ती येथील शिवप्रेमी प्रतिष्ठानच्या वतीने शिवमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवमूर्तीचे विधीवत पूजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक शिवाजी कदम, अध्यक्ष योगेश जाधव, उपाध्यक्ष संतोष चंदेले, सचिव विलास घाणेकर, सदस्य सोहन कदम, विशाल माने, रोहित माने, संजय जाधव, शक्तीश्री निचळे, विजय कदम, ज्ञानेश्वर अष्टगी, सुहास कदम, राजू आगळे, प्रशांत माने, गोविंद परळकर, गणेश ढेरे, शुभम कदम, गणेश कसबे, नितेश खरटमल, गणेश हलसंगी आदी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### एस.आर.चंडक हायस्कूलचे बुद्धीमत्ता शोध परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
डी.एच.बी. सोनी महाविद्यालयातील बुद्धीमत्ता शोध परीक्षेत एस.आर.चंडक इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इयत्ता नववी मधील साची काबरा प्रथम क्रमांक तर नेहाल लोया हिने तृतीय क्रमांक मिळविला. साजिरी कराडे, वैदेही बसवंती, पार्श्व जैन, खुशी उपाध्ये उत्तेजनार्थ तसेच दहावी मधील प्रगुण राठी या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक आणि तनिष्का सावंत, ओम कवलगीकर, विराज मर्दा यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले. यामध्ये विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिका अंजली चव्हाण, पर्यवेक्षिका मोनाली संगवे, गणित शिक्षक रमेश कटकम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्याचे चेअरमन योगेश बियाणी, सचिव डॉ. अर्चना दरक, सहसचिव स्वप्निल मर्दा, गिरीधारी भुतडा, ओमप्रकाश सोमाणी, विष्णूकांत मानधनिया, संजय डागा, प्रमोद भुतडा, संजय करवा, जितेंद्र राठी, राहुल चंडक, शैलेश चंडक, किशोर चंडक, सपना राठी, डॉ. सारिका झंवर, सी.ए. जोत्स्ना भट्टड, नैना राठी यांनी अभिनंदन केले.

### एस.व्ही.सी.एस.होटगी प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी प्रशालेतील दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे होते. होटगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य महांतेश कौलगी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे आदी उपस्थित होते. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे स्वागत केले. त्यानंतर काही विद्यार्थी वर्ग प्रतिनिधींनी शाळेला भेट वस्तू प्रदान केले.यावेळी नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.काही निवडक विद्यार्थ्यांनी मनोगतातून शाळा व शिक्षकांसंबधी कृतज्ञता व्यक्त केले. सूत्रसंचालन गीता पुजारी व चैत्राली टोण्णे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख भानुदास राठोड यांनी परिश्रम घेतले.

### दिगंबर जैन गुरुकुल शाळेत मातृ-पितृ दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
श्री दिगंबर जैन गुरुकुल बालक मंदिर व प्राथमिक शाळेत मातृ-पितृ पूजन दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षक झरेकर व चौथीच्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रम या वरती नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे नियोजन चेतन महाजन यांनी केले. स्काऊट गाईड प्रमुख हडाळे, कोळगोरे उपस्थित होते. सूत्रसंचालन जमालपुरे यांनी केले तर आभार काटकर यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, ज्येष्ठ शिक्षक सचिन मेहता, बालक मंदिर प्रमुख विभावरी रणदिवे, तृप्ती माणिकशेटे उपस्थित होत्या.

# महापालिकेच्यावतीने आज प्लॉग रन

### शहरातील विविध १२ ठिकाणाहुन निघणार रन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

महापलिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७ ते ९ वाजता शहरातील विविध १२ ठिकाणाहुन प्लॉग रन निघणार असून यामध्ये ७० शाळा सहभागी होणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

लोकसहभागातून शहराचे सौंदर्य अबाधित राखण्याचा प्रयत्न म्हणून हा प्लॉग रन काढण्यात येणार आहे. या प्लॉग रनचा समारोप इंद्रभुवन याठिकाणी सकाळी ९ वाजता आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या उपस्थित होणार आहे.

महापालिका शासनाच्या वतीने मंगळवारी प्लॉग रनचे (धावता धावता कचरा उचलणे) आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ९ यावेळेत शहरातील एकूण १२ मार्गावरून ही रॅली निघून इंद्रभवन येथे त्याची सांगता होणार आहे.

**या मार्गावर राहणार प्लॉग रन**
छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सरस्वती चौक मार्गे इंद्रभवन, दत्त चौक ते सिद्धेश्वर प्रशाला मार्गे इंद्रभवन, डीआरएम कार्यालय ते महात्मा गांधी पुतळा ते डफरीन चौक मार्गे इंद्रभवन, व्हीआयपी चौक ते एम्प्लॉयमेंट चौक ते इंद्रभवन, सात रस्ता ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, विजापूर वेस ते सिद्धेश्वर प्रशाला ते इंद्रभवन, गेंट्याल चौक ते पाथरूट चौक ते इंद्रभवन, भैय्या चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते इंद्रभवन, सोलापूर ग्रामीण हेडक्वार्टर ते सिव्हिल चौक ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, पूनम गेट ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, राजेंद्र चौक ते पोटफाडी चौक ते इंद्रभवन, गांधीनगर कॅम्प शाळा ते पोटफाडी चौक ते इंद्रभवन आदी मार्गावरून हा रन होणार आहे.

शहरातील नागरिकांनी स्वतःच्या ज्याप्रमाणे चालणे किंवा धावणे महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी चालताना अथवा धावताना रस्त्यावर पडलेला कचरा उचलून कचरापेटीत टाकण्याची सवय लागण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

# गैरहजरप्रकरणी महापालिकेतील ७४ कर्मचाऱ्यांना बजावली नोटीस

### उपायुक्त लोकरे यांच्या अचानक भेटीनंतर कर्मचाऱ्यांना लागली शिस्त



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी शुक्रवारी अचानक सकाळी महापालिकेतील प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची पाहणी केल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. यामुळे आता सोमवारी सकाळी कर्मचाऱ्यांनी शिस्त पाळत वेळेत हजेरी लावली. दरम्यान, गैरहजरप्रकरणी महापालिकेतील ७४ कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. खुलासा असमाधानकारक असल्यास संबंधितांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात येणार आहे.

महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे नियंत्रण अधिकारी तथा उपायुक्त आशिष लोकरे यांनी शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी अचानकपणे सकाळी महापालिकेतील प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची पाहणी केली. कर्मचाऱ्यांच्या हजेरींची तपासणी केली. यावेळी काही कर्मचारी गैरहजर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून सुमारे ७४ गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली. समाधानकारक खुलासा नसल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या पाहणीत मोठ्या संख्येने कर्मचारी गैरहजर असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली मात्र शिफ्टनसार कर्मचारी येत असल्याचे सांगण्यात आले. सर्व माहिती घेऊन गैरहजर आढळलेल्या कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेतील विविध विभागातील सर्व कर्मचारी, अधिकाऱ्यांना हालचाल नोंद रजिस्टरची सक्ती करण्यात आली आहे. कर्मचारी कुठे जाणार ? काय काम आहे? कशासाठी जाणार ? याची नोंद करणे गरजेचे आहे अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच महापालिकेतील प्रशासकीय इमारतीत आल्यानंतर प्रत्येक नागरिकांनी आपले कोणत्या विभागात काम आहे ? याची नोंदणी रजिस्टर मध्ये करणे आवश्यक आहे. नोंदणी करूनच त्या विभागात संबंधित नागरिकांनी जावयाचे आहे, असे लोकरे यांनी स्पष्ट केले आहे.

**२४ तासात खुलासा द्यावा लागणार : लोकरे**
गैरहजर राहिल्या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. २४ तासात खुलासा द्यावयाचा आहे. खुलासा असमाधानकारक असल्यास संबंधितांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात येणार आहे. ड्रेस कोड आणि ओळखपत्र बंधनकारक असल्याचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले.

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींची अनास्था**
उपायुक्त आशिष लोकरे यांनी केलेल्या अचानक पाहणीमध्ये महापालिकेच्या कर्मचाऱ्यांबरोबरच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील लाभार्थ्यांचा सहभाग असल्याचे दिसून आले. कामात वेळेवर हजर न राहण्याचा, गैरहजर राहणे असा प्रकार उघडकीस आला. शासनाने युवक युवतींनी कौशल्य विकासासाठी,स्वंयम रोजगारासाठी, प्रशिक्षणासाठी व्यावहारिक कामाचा अनुभव मिळावा या उदात्त हेतूने ही योजना राबविली आहे. मात्र संबंधित काही लाभार्थ्यांमध्ये गांभीर्य नसल्याचे दिसून आले.

# प्रेमाने श्रीगुरुजी म्हणून ओळखले जाणारे श्री गोळवलकर गुरुजी

श्री माधवराव सदाशिव गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक, ज्यांना प्रेमाने श्रीगुरुजी म्हणून ओळखले जाते, त्यांचे तत्वज्ञान आणि विश्वदृष्टी सनातन धर्माच्या ठोस आणि वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित होती, ज्यामुळे त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होता. तथापि, याचा अर्थ असा नाही की त्यांच्या कल्पना प्राचीन तत्त्वांशी कठोरपणे बांधल्या गेल्या होत्या. सेमिटिक धर्मांच्या विपरीत, हिंदू धर्माने सातत्याने लवचिकता आणि अनुकूलता दर्शविली आहे. सनातन धर्म हा मूळ आणि शाश्वत आहे, तरीही आपल्या ऋषीमुनींनी कालांतराने बदलाची अपरिहार्यता ओळखली. परिणामी, सनातन धर्माची तत्त्वे आंधळेपणाने किंवा धर्मांधपणे लागू न करता, विचारपूर्वक आणि संदर्भानुसार लागू केली पाहिजेत. श्रीगुरुजींनी हा फरक चांगल्या प्रकारे समजून घेतला आणि त्यानुसार मार्गदर्शन केले.

**या आधुनिक युगात गोळवलकर गुरुजींची शिकवण का आवश्यक आहे?**

सजीवांमध्ये आनंदी, काळजी घेणारे आणि शांत जीवन जगण्याची उपजत प्रवृत्ती असते. तथापि, जगाने पाश्चिमात्यीकरणाचा स्वीकार केल्यामुळे, विकसित भौतिकवादी मानसिकतेने प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर मोठा परिणाम केला आहे, ज्यामुळे ते त्यांच्या सभोवतालची शांतता, आनंद आणि सौहार्द गमावून बसले आहेत. लोभ, शत्रुत्व, विध्वंसक मानसिकता आणि अहंकारी वृत्ती, माणुसकीची भावना गमावणे आणि निसर्गाच्या विरोधात काम करणे अशा अनेक नकारात्मक वैशिष्ट्यांसह बहुतेक लोक यांत्रिक अस्तित्व जगतात. लक्षणीय तांत्रिक प्रगती आणि उच्च राहणीमान असूनही, जगभरातील व्यक्ती नाखूष, असमाधानी आणि सामाजिक अस्थिरता निर्माण करत आहेत. पाश्चात्य उपभोक्तावादाची संकल्पना हानिकारक आहे कारण ती व्यक्तींना केवळ वस्तू आणि ग्राहक म्हणून पाहते. यामुळे सर्व उपलब्ध मार्गांचे शोषण होते, अनेकदा मानवता आणि पर्यावरणीय अखंडतेचा विनाश करून. शिवाय, फेसबुक, ट्विटर (आता द) आणि इंस्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, सामाजिक बांधिलकी आणि कल्याण यांना प्रोत्साहन देण्याऐवजी उपभोगतावादावर लक्ष केंद्रित करून डिझाइन केलेले आहेत. त्यामुळे श्रीगुरुजींची शिकवण आजच्या जगात अत्यंत समर्पक आहे. त्यांना समाज, राष्ट्र आणि जगाच्या सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक परिमाणांचे पूर्ण ज्ञान होते. त्यांच्या काही शिकवणी आपण चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी सादर केल्या आहेत.

**श्रीगुरुजींची आर्थिक, राजकीय आणि स्वदेशी तत्त्वे**

समाजाच्या राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक व्यवस्थेतील बदलांचा परिणाम संपूर्ण समाजावरही होऊ शकतो. श्रीगुरुजींनी एकात्मिक सामाजिक-राजकीय-आर्थिक दृष्टिकोन विकसित केला. श्रीगुरुजींनी भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, धर्म आणि साहित्य तसेच समाजवाद, मार्क्सवाद आणि पाश्चात्यीकरण यासारख्या पाश्चात्य विचारसरणींचा सखोल अभ्यास केला. आपल्या व्याख्यानांमध्ये आणि भाषणांमध्ये त्यांनी मार्क्सवाद आणि पाश्चात्यीकरण या दोन्हींवर टीका केली. त्यांनी अनेकदा भारतीय तत्त्वज्ञान आणि साहित्याची तुलना मार्क्सवाद आणि त्याच्या विचारसरणीशी केली. श्रीगुरुजींनी मार्क्सवादाच्या आर्थिक निर्धारवाद, द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि वर्गसंघर्ष या मूलभूत तत्त्वांना नाकारले. साम्यवाद किंवा भांडवलशाही जगाला एकत्र करू शकत नाही यावर श्रीगुरुजींचा विश्वास होता. मानवाला भौतिक प्राणी मानणारी आणि भौतिक हितसंबंधांना प्राधान्य देणारी भौतिकवादी विचारसरणी एकता आणि समरसतेऐवजी स्पर्धा आणि संघर्षाला जन्म देते.



तर्क सोपा आहे. भौतिक पातळीवर फक्त विविधता आणि फरक आहे. ते अलिप्ततावाद आणि बहिष्कारांना प्रोत्साहन देतात. केवळ भौतिक वास्तवावर लक्ष केंद्रित करणाऱ्या व्यक्तींमध्ये एकता आणि एकात्मता नसू शकते. त्यांच्यात सहकार्याचा विचार करण्याचे कारण असूच शकत नाही. जेव्हा आपण भौतिकवादी मानसिकता सोडून, या स्पष्ट फरकांच्या पलीकडे पाहतो, तेव्हा आपण एक सूक्ष्म एकता पाहू शकतो जी सर्व स्थूल प्राण्यांना एका सुसंगत पूलमध्ये जोडते. श्रीगुरुजींच्या मते, भौतिकवादी मानतात की आपण सर्व स्वतंत्र व्यक्ती आहोत ज्यामध्ये कोणतेही समान संबंध किंवा संलग्नता नाहीत. कार्ल मार्क्सचे सिद्धांत वर्ग संघर्ष आणि भांडवलशाहीवर वर्गहीन समाजाचा विजय यावर लक्ष केंद्रित करतात. श्रीगुरुजींनी परस्पर नापसंती आणि शत्रुत्वामुळे यश मिळू शकते ही धारणा नाकारली. त्यांना वाटले की साम्यवाद वर्ग विभाजन आणि द्वेष निर्माण करू शकतो, ज्यामुळे शेवटी वर्ग संघर्ष होतो. कार्ल मार्क्सची विचारधारा कटुता आणि परस्पर शत्रुत्वावर भर देते. श्रीगुरुजींनी राष्ट्र मजबूत करण्यासाठी वर्ग शांतता, सहकार्य आणि परस्पर समंजसपणावर भर दिला. त्यांचा असा विश्वास होता की वर्गीय भेद समाजात फूट पाडतात, जे राष्ट्रासाठी हानिकारक आहे. सोव्हिएत युनियन आणि चीन ही मार्क्सवादी-आधारित साम्यवादाची सर्वात प्रमुख उदाहरणे मानली जातात. श्रीगुरुजींच्या मते, चीन आणि रशियाने ऐतिहासिकदृष्ट्या समाजवादाचा वापर सत्ता मिळविण्यासाठी केला आहे, ज्यामुळे विध्वंसक कारवाया झाल्या आहेत. राजकीय वर्चस्व मिळविण्यासाठी दोन्ही देशांतील सत्तेच्या भुकेल्या नेत्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या आपल्याच नागरिकांचे नुकसान केले आहे. चीन आणि रशिया प्रगत आणि विकसित असल्याचा दावा करतात, परंतु दोघांचेही लक्ष्य जागतिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचे आहे. श्रीगुरुजी हा स्वभाव आणि वागणूक राक्षसी मानतात.

उपभोगतावाद हा हिंदू संस्कृतीच्या आचारांशी विसंगत आहे. जास्तीत जास्त उत्पादन आणि न्याय्य वितरण हे आमचे ब्रीदवाक्य असले पाहिजे आणि राष्ट्रीय स्वावलंबन हे आमचे तात्कालिक ध्येय असले पाहिजे. बेरोजगारीवर युद्धपातळीवर उपाय करणे आवश्यक आहे. औद्योगीकरण आवश्यक असले, तरी त्यासाठी पाश्चात्य देशांची नक्कल करण्याची गरज नाही. निसर्गाचा योग्य वापर केला पाहिजे, शोषण नाही. पर्यावरणीय घटक, नैसर्गिक संतुलन आणि भावी पिढ्यांच्या गरजा विचारात घेतल्या पाहिजेत. पर्यावरणशास्त्र, अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र या सर्वांचा एकत्रित विचार केला पाहिजे. प्रत्येक नव्या स्वतंत्र राष्ट्राच्या नेतृत्वाची सर्वात महत्वाची जबाबदारी म्हणजे तेथील नागरिकांच्या मानसिक रचनेत आवश्यक बदल घडवून आणणे. नव्या स्वतंत्र भारताची मानसिकता श्रीगुरुजींना चांगलीच ठाऊक होती. इंग्रजांनी भारताला केवळ राजकीय आणि आर्थिकच नव्हे, तर जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये सांस्कृतिकदृष्ट्याही गुलाम बनवले होते. ते त्यांच्या दुर्भावनापूर्ण योजनांमध्ये बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. आपल्या स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनी हे सत्य समजून घेत स्वदेशी, गोरक्षण, मातृभाषा, हिंदी इत्यादींवर भर देऊन ही आत्मघाती मानसिकता दूर करण्याचा प्रयत्न केला. डॉक्टरजींच्या पाठोपाठ श्रीगुरुजींनी लोकांमध्ये या विचारांची जाणीव वाढवण्यासाठी संघाच्या माध्यमातून अनेक पुढाकार घेतले. त्यांची स्वदेशीवरील श्रद्धा सार्वत्रिक होती. स्वदेशीची त्यांची संकल्पना केवळ स्वदेशी वस्तूंच्या वापरापुरती मर्यादित नव्हती; यामध्ये दैनंदिन जीवनातील सर्व घटकांचा समावेश होता, जसे की लग्नाची आमंत्रणे किंवा कार्यक्रमाच्या शुभेच्छा आमच्या मूळ भाषेत पाठवणे, तसेच हिंदू परंपरेनुसार वाढदिवस साजरा करणे इ.

या दृष्टिकोनांना विशेष महत्त्व आहे. हे केवळ तात्विक ग्रंथ नाहीत. श्रीगुरुजी केवळ बौद्धिक तत्त्वज्ञानी नव्हते. त्यांना हिंदू तत्त्वज्ञान आणि त्यातील गुंतागुंत चांगल्या प्रकारे समजली होती. देशव्यापी चळवळीचा एक व्यावहारिक नेता आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी वैयक्तिक अनुभव आणि प्रयोगाद्वारे त्यांच्या तत्त्वज्ञानाची चाचणी घेतली. ते वास्तविक-जगातील समस्या आणि आव्हानांवर केंद्रित राहिले. हिंदू अध्यात्मिक परंपरेवर आधारित त्यांचा दृष्टिकोन अत्यंत व्यावहारिक होता. जगाला एकता, अखंडता आणि मानवतेचा मार्ग दाखविणाऱ्या या महान द्रष्ट्याला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**- पंकज जयस्वाल**
मो. ७८७५२१२१६१

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## लाडक्या बहिणींना दरवर्षी करावी लागणार ई-केवायसी



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १७ फेब्रुवारी-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर पडणारा ताण कमी करण्यासाठी सरकार एक नवी नियमावली तयार करणार आहे. त्यानुसार, आता लाभार्थी महिलेची प्राप्तिकर खात्याकडील नोंद तपासली जाणार आहे तसेच त्यांच्या उत्पन्नाची शहानिशा करण्यासाठी त्यांची दरवर्षी ई-केवायसी केली जाणार आहे. गरजू महिलांनाच या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी हा नवा नियम केला जाणार आहे.

आतापर्यंत अनेक महिलांनी पात्र नसतानाही या योजनेचा लाभ घेतलेला आहे. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेचा महायुतीमधील घटक पक्षांना चांगला फायदा झाला. आता या योजनेवर होणारा खर्च आवाक्यात आणण्याची ओरड होत असल्यामुळे सरकारने या योजनेच्या निकषांची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, सरकारने विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून लाभ घेणाऱ्या व ज्या महिलांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे अशा महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. विशेषतः लाभार्थी महिलेचे उत्पन्न अडीच लाखांहून जास्त आहे का? हे शोधण्यासाठी प्राप्तिकर विभागाचीही मदत घेतली जाणार आहे.

**हयातीचे प्रमाणपत्रही सादर करावे लागणार**

सरकारच्या नव्या नियमानुसार, आता लाभार्थी महिलांना दरवर्षी जून महिन्यात बँकेत जाऊन ई-केवायसी द्यावी लागणार आहे तसेच हयातीचा दाखलाही त्यांना बँकेकडे जमा करावा लागणार आहे. त्यानंतरच त्यांच्या खात्यावर लाडक्या बहिणीची रक्कम वर्ग करण्यात येणार आहे.

## ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय आत्मनिर्भरता अशक्य : गडकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. १७ फेब्रुवारी-**

शहराबरोबरच ग्रामीण भागाचा जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत देश आत्मनिर्भर होउ शकत नाही. यासाठी ग्रामीण भागासाठी चांगले रस्ते, पाणी आणि वीज या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी इस्लामपूर येथे बोलताना केले.

इस्लामपूर येथे राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी या स्वायत्त अभियांत्रिकी संस्थेच्या नवीन विद्यार्थी वसतीगृह इमारतीचे आणि जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन केंद्रिय मंत्री गडकरी यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ. जयंत पाटील, खा. विशाल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश खाडे, अरूण लाड, रोहित पाटील, सुहास बाबर, माजी आमदार मानसिंगराव नाईक, शिवाजीराव नाईक, संस्थेचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील आदींसह जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री गडकरी म्हणाले, महात्मा गांधी ९० टक्के लोक खेड्यात राहतात असे सांगत होते. मात्र, आज यापैकी ३५ टक्के लोक शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. हे स्थलांतर आनंदाने झालेले नाही, तर



सुविधांच्या अभावाने झाले आहे. यातून शहरी भागात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. जीडीपीमध्ये २२ ते २४ टक्के वाटा उद्योगाचा, ५२ ते ५४ टक्के सेवाक्षेत्राचा आहे, तर केवळ १४ टक्के वाटा ग्रामीण व शेतीचा आहे. जर ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर चांगले रस्ते, वीज, पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. हे झाले तरच भारत आत्मनिर्भर होउ शकतो.राजकारण हे केवळ निवडणुकीपुरतेच हवे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सांगितले होते, निवडून आला नाही तर तुम्ही पक्षाचे, आमदार, खासदार झाला तर जनतेचे आणि मंत्री झाला तर देशाचे हा विचार हवा. राजकारण हे विकासाचे हवे, केवळ सत्तेचे राजकारण देशाचा विकास करू शकत नाही. राजकारणात होणारी टीका ही मनावर फारशी घ्यायची नसते. केवळ बातम्यामधून उपस्थित केल्या जाणार्या शंकांमुळे संवेदनशील राहू नये.



### आता गडकरी राष्ट्रवादीत जाणार?

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना देशभर झालेल्या रस्ते विकासाचे श्रेय देत मंत्री गडकरी यांचे कौतुक केले. पेठ-सांगली रस्त्याचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६ टक्के कमी दराने निविदा मंजुरी होउनही चांगल्या दर्जाचे झाले आहे, असे सांगत राज्यात मात्र २५ ते ४५ टक्के अधिक दराने रस्त्याची कामे होत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. आता माध्यमांनी केद्रिय मंत्री गडकरी राष्ट्रवादीत जाणार अशा बातम्या प्रसारित करू नयेत, असा मिश्किल सल्ला देत असे चिंतन करणाऱ्या माध्यमांच्या कृतीचे शल्य वाटते. चांगल्या उद्देशाने राजकीय व्यक्ती एकत्र येउ शकत नाहीत, अशी धारणाच झाल्याची खंत आ. पाटील यांनी व्यक्त केली.

## धनंजय मुंडेनाच विचारा, 'त्या' प्रश्नावर अजित पवार संतापले

**नाशिक, दि. १७ फेब्रुवारी-**



नैतिकतेच्या दृष्टिने मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करीत असल्याबाबत पत्रकारांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना प्रश्न विचारले असता, अजितदादा संतापले अन् म्हणाले, याबाबत धनंजण मुंडेंनाच विचारा. दादांच्या या उत्तरावरून राजकारण पेटले असून अंजली दमानिया यांनीही यावरून अजितदादांवर टिकास्त्र सोडले आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी मुंडेच्या मागणीला जोर आला आहे. नैतिकतेच्या दृष्टीने धनंजय मुंडे यांनी राजीनाम द्यावा, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. हेच प्रश्न पत्रकारांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारले असता त्यांनी राजीनामाप्रकरणी मुंडेंनाच प्रश्न विचारा, असे म्हटले आहे. विशेष म्हणजे अजितदादा असे म्हणाले की, सिंचन घोटाळ्यात आपले नाव आले तेंव्हा आपण नैतिकतेवरून राजीनामा दिला होता. नैतिकतेवरून राजीनामा देणार का हा प्रश्न धनंजय मुंडेंनाच विचारा. यावरूनही राजकारण रंगले असून अजितदादांनी मुंडेंच्या राजीनाम्याचा प्रश्न मुंडेंच्याच कोर्टात ढकलला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.




## आदित्य ठाकरेच उद्धव साहेबांना सोडायची भाषा करतील

**▸ सांगोल्याचे शहाजीबापू पाटील यांची ठाकरेंवर टिका**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभा मतदारसंघात सोमवारी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजेनेच्या कामांचा भूमिपूजन समारंभ पार पडला.

यानंतर शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, कालच्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची वास्तवता परिस्थिती अशी झाली आहे की, तिथे थांबण्यात काही अर्थ नाही अशी भावना झाली आहे. एक दिवस असा उगवेल की उद्धव साहेबांना सोडायची भाषा आदित्य ठाकरेच करतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्याबरोबरच्या आमदारांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यापासून दोन्ही गट सातत्याने एकमेकांवर टीका आणि आरोप-प्रत्यारोप करत असतात.



अशात माजी आमदार राजन साळवी यांनी उद्धव ठाकरे यांना सोडून एकनाथ शिंदेंच्या पक्षात प्रवेश केल्यानंतर दोन्ही शिवसेनेचे नेते एकमेकांवर जोरदार टीका करत आहेत. अशात कोकणातील ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधवही नाराज असल्याच्या चर्चा आहेत.

याबाबत सांगोल्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी पत्रकारांनी विचारले असता, काही दिवसांनी आदित्य ठाकरेच उद्धव ठाकरे यांना सोडायची भाषा करतील, असे विधान केले आहे. दरम्यान पाटील यांच्या या विधानाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. आदित्य ठाकरेंना विरोधी पक्षनेता पद दिले तर महाराष्ट्रात अतिशय निकृष्ट काम करणारा विरोधी पक्षनेता म्हणून नाव गाजेल, असेही पाटील म्हणाले.






## अग्रलेख...

# बांगलादेशविरोधात भारताची संयमी भूमिका

बांगलादेशमधून शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचा संताप कमी झालेला नाही. 'जुलै उठाव'चे आंदोलन अलिकडेच आपल्या मागण्या घेऊन बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनुस यांच्या निवासस्थानाबाहेर पोहोचले. विद्यार्थी आंदोलनात जखमी झालेल्या आंदोलकांना योग्य उपचार, पुनर्वसन आणि अधिकृत मान्यता मिळावी, अशी आंदोलकांची मागणी आहे. आंदोलकांनी मुख्य सल्लागार मोहम्मद युनुस यांचे निवासस्थान असलेल्या 'जमुना' या स्टेट गेस्ट हाऊसजवळ जाऊन आपल्या मागण्या मांडल्या. सुरक्षा दलांनी मार्गात बॅरिकेड्स लावून त्यांना अडवले. आंदोलक तेथेच संपावर बसले. नंतर ते बॅरिकेड्स तोडून मोहम्मद युनुस यांच्या निवासस्थानी पोहोचले. सरकारच्या आश्वासनानंतर आंदोलकांनी आंदोलन संपवले. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी'च्या नेत्यांची युनुस यांनी सुटका केली. त्यानंतर देशभरात युनुस लवकरच निवडणुका घेतील, अशी अपेक्षा होती; परंतु निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल होत नसल्याने 'बीएनपी' त्यांच्यावर नाराज आहे. आपल्या मागण्यांबाबत सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी यापूर्वीच केला होता; मात्र मुख्य सल्लागाराच्या प्रतिनिधीला भेटण्याची मागणीही त्यांनी केली होती. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी'चे प्रभारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी म्हटले आहे की, सुधारणांवरील चर्चा ठप्प राहिल्यास हुकूमशहांना संधी मिळेल. सुधारणांबाबतची चर्चा रखडली तर देश गंभीर संकटात जाईल. 'बीएनपी'चे तारिक रहमान अलिकडेच एका कार्यक्रमामध्ये मोहम्मद युनुस यांचे नाव न घेता म्हणाले, सुधारणांची जबाबदारी असणाऱ्यांनी ती सुरू करावी. कोणताही सुधारणा प्रस्ताव लागू करण्यापूर्वी निवडणुका होणे आवश्यक आहे. जनतेने देश चालविण्याची संधी दिल्यास बीएनपी सुधारणांबाबत दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. अंतरिम सरकारने १५ वेगवेगळ्या सुधारणांसाठी आयोग स्थापन केले आहेत. या सुधारणांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुधारणादेखील आहे. या आयोगांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि त्यावर सहमती झाल्यानंतरच या सुधारणा लागू केल्या जाऊ शकतात. निवडणूक प्रक्रियेपूर्वी सर्व सुधारणा राबविता येणार नसून त्या अंमलात आणायच्या असतील तर आणखी सहा महिने लागतील. युनुस यांनी या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार असून आपण देशाच्या एकात्मतेचे रक्षण करत असल्याचे सांगितले. याशिवाय जुलैमधील आंदोलनात सहभागी होणारे विद्यार्थी पक्ष काढू शकतात, असे संकेतही त्यांनी दिले आहेत. कदाचित पक्ष स्थापन करताना त्यांच्यात फूट पडू शकते. शेख हसीना यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताचे बांगलादेशशी अतिशय घनिष्ठ संबंध होते. बांगलादेशचे अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध चढ-उतारांनी भरले आहेत. पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन शेख हसीना भारतात आल्या आणि आजही येथे राहात आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारला शेख हसीना यांच्यावर गुन्हा दाखल करायचा आहे. मुलाखतीदरम्यान इस्लामिक कट्टरपंथी त्यांच्या देशाचा ताबा घेऊ शकतात आणि भारतासोबतचे संबंध अतिशय नाजूक टप्प्यावर आहेत, अशी भीती आहे का, असे विचारण्यात आले तेव्हा मोहम्मद युनुस म्हणाले, 'मला अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. तरुणांचा राजकीय करीअर करण्याचा कोणताही हेतू किंवा वैयक्तिक स्वार्थ नसल्याने ते राजकीय पक्ष बनवत आहेत. त्यांनी आपल्या रक्ताने देश वाचवला असल्याने याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा, पूर्वीच्या कारकीर्दीची पुनरावृत्ती करण्याची संधी शोषणाऱ्यांनी त्यांना दूर केले असते.' पश्चिम बंगालला लागून असलेल्या भारत आणि बांगलादेशच्या सीमेवर तणाव आहे. अनेकदा दोन्ही बाजूचे ग्रामस्थ आमनेसामने येत आहेत. कधी-कधी सीमेवर तैनात असलेले सुरक्षा दल समोरासमोर येत आहेत. त्यामुळे सीमेजवळ राहणारे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारमधले लोक भारताबाबत अतिशय आक्रमक विधाने करीत आहेत; पण भारत सरकारकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय संतुलित आहे. हे स्पष्ट करणारी घटना पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यातील सुखदेवपूर ग्रामपंचायतीमध्ये घडली. बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या सुखदेवपूर येथील बकराबाद गावात राहणारे ग्रामस्थ नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामासाठी गेले होते. त्यांचे शेत बांगलादेश सीमेच्या 'शून्य रेषेच्या' १५० मीटर आत आहेत. येथे काटेरी कुंपण आहे; मात्र एक किलोमीटरच्या परिसर असा आहे की, जिथे काटेरी कुंपण नाही. अनेक शेतात गव्हाचे पीक आलेले ग्रामस्थांनी पाहिले. येथे आंब्याची मोठी बागही आहे. त्यात सुमारे ९०० झाडे आहेत. यापैकी अनेक झाडे तोडल्याचे आढळून आले. गावकऱ्यांनी 'झीरो लाईन'जवळ तैनात 'बांगलादेश बॉर्डर गार्ड्स'च्या (बीजीबी) जवानांना ही माहिती दिली; पण काही वेळातच सीमेच्या पलीकडे लोकांचा जमाव जमला. भारतीय बाजूचे ग्रामस्थही तेथे जमले. सीमेपलीकडे जमलेल्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप सुखदेवपूरच्या ग्रामस्थांनी केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि 'बीजीबी'च्या जवानांनी नियंत्रण आणली. या घटनेपूर्वी ६ जानेवारीला 'बीएसएफ' आणि 'बीजीबी' जवानांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी भारताच्या बाजूने काटेरी कुंपण उभारण्याचे काम सुरू करण्यात आले होते. ही घटनाही त्याच ठिकाणी घडली, ज्या ठिकाणी काटेरी तारा लावण्याचे काम सुरू आहे. ती जागा 'झीरो लाईन'पासून १५० मीटरपेक्षा कमी त्रिज्येत आहे, असे सांगत 'बीजीबी'ने आक्षेप घेतला होता. यानंतर दोन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'फ्लॅग मीटिंग' बोलाविण्यात आली. वायरिंगचे काम सध्या रखडले आहे. भारत आणि बांगलादेशदरम्यानच्या पश्चिम बंगालच्या सीमेवर अशी अनेक ठिकाणे आहेत, जिथे गेल्या दोन महिन्यांमध्ये दोन्ही देशांच्या सुरक्षा दलांमध्ये तणावाच्या अशाच घटना घडल्या आहेत. सततच्या तणावामुळे गेल्या काही दिवसांपासून दोन्ही देशांच्या सीमेवर तैनात सुरक्षा दलांच्या अधिकाऱ्यांच्या नियमित बैठकाही होत आहेत. पश्चिम बंगालच्या बांगलादेश सीमेवर जवळपास प्रत्येक सीमा चेक पोस्टवर अशाच प्रकारच्या 'फ्लॅग मीटिंग' आयोजित केल्या जात आहेत. जेणेकरून तणाव संपुष्टात यावा. 'बीजीबी' प्रमुख मेजर जनरल अशरफुज्जा सिद्दीकी भारत दौऱ्यावर येत आहेत. यादरम्यान ते सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंग चौधरी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. दोन्ही देशांमधील सीमेवरून निर्माण झालेल्या वादावरही चर्चा होणार आहे. सुखदेवपूरचे बकराबाद हे गाव मालदा जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. सीमा भागातून जाणाऱ्या रस्त्यावरून जाण्यास सध्या बंदी आहे. दुसरा मार्ग कालियाचक मार्गे जातो. सध्या काटेरी तार नसलेल्या भागाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. हा परिसर दुकानापासून फक्त ४०० मीटर अंतरावर आहे. सुखदेवपूरसह मालदा जिल्ह्यातील इतर भागांतील बांगलादेशच्या सीमेवर घडणाऱ्या घटनांमुळे स्थानिक लोक खूप चिंतेत आहेत. अशा वाढत्या घटनांदरम्यान नुकतेच मालदा दौऱ्यात राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सीमेजवळ राहणाऱ्या गावकऱ्यांना आंतरराष्ट्रीय सीमेपासून अंतर राखण्याचा सल्ला दिला होता. वाढत्या वादांच्या पृष्ठभूमीवर सीमा सुरक्षा दलाने सीमेवरील तस्करीविरुद्ध मोहीम तीव्र करण्याचा दावा केला आहे. दक्षिण पश्चिम बंगालमधील विविध ठिकाणांहून सुरक्षा दलांनी विशेष मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त केल्याचे 'बीएसएफ'चे म्हणणे आहे. बांगलादेशवर दीर्घकाळ नजर ठेवणाऱ्या तज्ज्ञांना वाटते की, भारत सरकार यावेळी संयमाने वागत आहे. अंतरिम सरकार सार्वत्रिक निवडणुका घेण्यास नाखूश आहे. निवडणुकांच्या मागणीवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवता यावे यासाठी भारताच्या सीमेवर आक्रमक भूमिका दाखवत असल्याचे त्यांचे मत आहे. सीमेवर संघर्ष वाढला आणि भारताने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली, तर बांगलादेशच्या अंतरिम सरकारला हवे आहे ते होईल. भारताने आतापर्यंत घेतलेली भूमिका हे स्पष्टपणे दर्शवते की, ती बांगलादेश सरकारच्या या फंदात पडणार नाही. ▮

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# चाळावी इतिहासाची पाने

लोकसभेत राष्ट्रपतींचे आभार मानण्याच्या निमित्ताने बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे डेमोक्रॅट अध्यक्ष जॉन एफ. केनडी यांच्या विषयीच्या 'फरगॉटन क्रायसिस' या पुस्तकाचा उल्लेख केला. हे पुस्तक एका निवृत्त सीआयए या गुप्तहेर खात्याच्या अधिकाऱ्याने लिहिलेले आहे. यात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी काही उल्लेख आहेत. हे उल्लेख १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या संदर्भातले आहेत. याचवेळी अमेरिकेशेजारच्या क्युबाला रशियन अण्वस्त्रे पुरविण्याचा मुद्दाही निकरावर आला होता. याचा उल्लेख 'क्युबन मिसाईल क्रायसिस' असा केला जातो. रशिया आणि अमेरिका यात संघर्षाची ठिणगी उडणार अशी भीती सर्व जगाला वाटू लागली होती. भारत आणि चीन यातही याचवेळी सीमा संघर्ष निर्माण झाला होता. ब्रुस रिडेल नावाच्या सीआयए अमेरिकन गुप्तहेर खात्यातील अधिकाऱ्याने यावर एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे नाव 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' असे लांबलचक आहे. या पुस्तकात अमेरिकन दृष्टिकोनातून भारत-चीन युद्धाबाबत सविस्तर माहिती दिली आहे. सीआयएमध्ये वरच्या आणि महत्त्वाच्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने नमूद केलेला हा वृत्तांत अर्थातच खूप महत्त्वाचा आहे. ही माहिती आणि पंडित नेहरू आणि जॉन एफ. केनेडी यांच्यातील पत्रव्यवहार त्यावेळी गुप्त ठेवण्यात आला होता. पुढे हा डीक्लासिफाय (उघड) करण्यात आला. ब्रुस रिडेल यांचे पुस्तक २०१६ मध्ये भारतात उपलब्ध झाले होते. या पुस्तकातील माहिती अभ्यासकांसाठी खूप महत्त्वाची आहे. १९६२ मध्ये भारत-चीन युद्धात भारताचा मान खाली घालायला लावणारा पराभव झाला होता. या विषयीचे तपशीलवार 'आतले' वृत्त 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' या पुस्तकात आहे. १९६२ नंतर काही माहिती झिरपत बाहेर आली होती. भारताची त्यावेळी पर्वतीय क्षेत्रातील युद्ध लढण्यासाठीची सिद्धता अगदीच अपुरी होती. बर्फात लागतात तसे जोडेसुद्धा आपल्या सैनिकांच्या पायात नव्हते. ते साधे कॅनव्हासचे जोडेच वापरत असत, या शब्दात आपल्या सैनिकी तयारीचे वर्णन चेष्टेने केले जायचे. कालबाह्य झालेली बंदूकच आपल्या सैनिकांजवळ होती. १९ नोव्हेंबर १९६२ ला नेहरूंनी केनेडी यांना पत्र लिहून मदतीसाठी विनंती केली. क्युबाप्रकरणी गुंतलेले असूनसुद्धा केनेडी यांनी नेहरूंच्या पत्राची तातडीने दखल घेतली आणि मदतीचे आश्वासन दिले. भारताने हव्या असलेल्या सैन्यसामग्रीची तपशीलवार आणि लांबलचक यादी अमेरिकेकडे पाठविली. भारताने पाठविलेली यादी भारतीय साडीसारखीच लांबलचक आहे, अशी अमेरिकेत त्यावेळी चेष्टा झाली, असे म्हणतात. केनेडी यांनी सुचविले की, या सामग्रीची किंमत खूप मोठी होईल. भारतीय अर्थकारणावर यामुळे खूप ताण पडेल, म्हणून हे साहित्य आम्ही तुम्हाला भाडेतत्त्वावर देतो. युद्ध संपले की, भाड्यासह ती तुम्ही आम्हाला परत करा. युद्धात वापरल्या गेलेल्या सामग्रीचेच पैसे आम्हाला द्या. असे म्हणतात की, त्याकाळी शस्त्रसामग्री घेऊन येणारी विमाने दर पाच मिनिटांच्या कालांतराने कोलकाता विमानतळावर उतरत होती. ही बातमी भारतीय वृत्तसृष्टीने प्रसारित करताच 'त्यांनी असे करू नये, अशाने ही माहिती शत्रुपक्षालाही कळते' असे आवाहन सरकारच्या वतीने करण्यात आले होते.

केनेडी यांच्या १९६१ ते १९६३ या कार्यकाळात जॉन केनेथ गेलब्रेथ हे अमेरिकेचे भारतातील राजदूत होते. भारत आणि अमेरिका यांच्यात स्नेहाचे संबंध असावेत यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले. आर्थिक बाबतीत ते नेहरूंना सल्ला देत असत, चीन-भारत यांच्या १९६२ च्या सीमायुद्धाच्या काळात त्यांनी अमेरिकेने भारताला साथ द्यावी यासाठी मनापासून प्रयत्न केले होते. १९६२ मध्ये भारताकडून दोन पत्रे अमेरिकेकडे रवाना झाली होती. त्यांचा तपशील तेव्हा गप्तप्त ठेवण्यात आला होता. अशी पत्रे आम्ही पाठविलीच नव्हती, असे भारत अनेक वर्षे सांगत होता. अमेरिकेने पत्रे आली होती हे स्पष्ट केले, पण तपशील उघड केला नाही. २०१० साली ही पत्रे अमेरिकेने जाहीरपणे उघड केली. त्यातील मजकुराचा सारांश काहीसा असा आहे- 'भारताला बॉम्बफेकी विमाने, रडार, शहरांचे व कारखान्यांचे संरक्षण करणाऱ्या यंत्रणांची आवश्यकता आहे. चीनची शस्त्रास्त्र तळे अमेरिकेने नष्ट करावीत, अशी अपेक्षा भारताने व्यक्त केली होती. चीनचा हल्ला हे केवळ भारतावरचेच संकट नाही, तर हा मुद्दा या भागातील इतर देशांच्या स्वातंत्र्याशीही संबंधित आहे. आम्हाला पुरविली जाणारी शस्त्रे फक्त चीनच्या विरोधातच उपयोगात आणली जातील. 'टॉप सिक्रेट' असा शिक्का मारलेली ही दोन्ही पत्रे आज ब्रुस रिडेल यांच्या पुस्तकाच्या एका आवृत्तीत १३४ व १३५ या पानांवर उपलब्ध आहेत.

मोदींनी संसदेत केलेल्या भाषणातला आणखी एक उल्लेख प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंग्यचित्राचा होता. यात आर. के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' एक (ठेला) खटारा ओढताना दाखविला आहे. या खटाऱ्यावर एक विमान दाखविले आहे. विमानाच्या खिडक्यातून आत बसलेले प्रवासी त्यावेळच्या राजकारण्यांची आठवण करून देतात तर पायलट त्यावेळच्या पंतप्रधानांसारखा (राजीव गांधी) तोंडवळा असलेला दिसतो आहे. चित्राच्या शिरोभागी शीर्षक आहे- 'दी फ्लोट दॅट वॉजंट देअर.' खटाऱ्यावर लिहिले आहे- 'ॲन एक्सायटिंग ट्रिप टू २१ सेंच्युरी.' त्याच्याखाली लांबलचक टीप आहे- 'इन कोलॅबोरेशन विथ जपान, यूएसए, यूके, जर्मनी, इटली, यूएसएसआर, कॅनडा एटसेटरा, एटसेटरा.' मोदींच्या भाषणानंतर हे व्यंग्यचित्रही वृत्तसृष्टीने पुन्हा प्रसारित केलेले दिसते. त्यावेळच्या महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या, पण साजेसे प्रयत्न?, त्याची वानवा होती. लाकडी खटारा ओढणारा 'कॉमन मॅन', शिरोभागी २१ वे शतक, पण विमान जमिनीवरच नव्हे खटाऱ्यावरच आहेत, म्हटले तर प्रवासी व पायलट पण साम्य तत्कालीन राजकारण्यांशी अशी वैशिष्ट्ये दाखवणारे व्यंग्यचित्रकाराचे फटकारे विनोदाबरोबरच आणखी बरेच काही सांगून जातात. मोदींनी कुणाचेही नाव घेतलेले नाही. सतत २१ वे शतक असा धोशा लावणारा पंतप्रधान एवढाच उल्लेख त्यांनी केला आहे. त्याकाळी हे व्यंग्यचित्र बरेच गाजले. नंतर आजही ते 'क्रियेवीण व्यर्थ वाचाळतेचे' लक्तरे तोडणारे ठरले आहे. ज्या गोष्टी दशकांपूर्वी व्हायला हव्या होत्या, त्या आज होत आहेत, हे बघून संवेदनशील मनाला काय वाटत असेल बरे? आम्हाला संधी मिळताच आम्ही मात्र राष्ट्र उभारणीच्या कामात स्वत:ला झोकून दिले आहे, असे जे मोदी म्हणाले, ते काय उगीचच! राष्ट्रपती मुर्मू यांनी संसदेला आणि देशाला उद्देशून केलेल्या उद्बोधनाबद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या प्रस्तावावर भाषण करताना मोदींनी 'जेकेएफज फरगॉटन क्रायसिस : तिबेट, दी सीआयए ॲण्ड दी सिनो इंडियन वॉर' या पुस्तकाचा आणि आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंग्यचित्राचा (कार्टून) फक्त उल्लेख केला. जुन्या नेतृत्वाच्या चुकांवर आणि त्यांच्या ऱ्हस्व दृष्टीवर त्यांनी टीका केली. मोदींचे भाषण ऐकताना एनडीएचे सदस्य हसत जल्लोष करीत होते तर विरोधकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या. रंजकता आणि बोधप्रदता ही मोदींच्या भाषणाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये याही भाषणाच्या निमित्ताने प्रत्ययाला आली. ▮

९४२२८०४४३०

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# मजुरांअभावी धान्य गोदाम रिकामे होईल!

एकाने करावे काम । दुसऱ्याने करावा आराम । हे तो आहे हराम । देशहिताच्या दृष्टीने ॥ दुनिया आहे कष्टिकांची। जो जो कसेल शेती त्याची । जो काम करील लक्ष्मी तयाची । दासी व्हावी नियमाने ॥ अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून मांडली आहे. मात्र प्रत्यक्षात आपल्याच देशात दुर्दैवाने का असेना पण आळशी लोकांची संख्या वाढली आहे. याच कारणाने शेतात काम करण्यासाठी शेतमजूर मिळत नसल्याच्या भयावह स्थितीचा सामना शेकडो शेतकरी रोज करीत आहेत. अशा अवस्थेत मजूर न मिळाल्यास शेती करणार कशी? अन्नधान्याचे उत्पादन होणार कसे? कारखाने चालणार कसे? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. समजा शेतमजूर मिळणार नाही तर शेतमालाचे उत्पादन घटेल. सरकारची धान्य गोदामे रिकामी होतील अन् मग नाईलाजाने का असेना धान्य देणे सरकारला बंद करावे लागेल किंवा त्यात घट केली जाईल. अशा महत्त्वपूर्ण समस्येवर उत्तरे शोधण्याची गरज आज निर्माण झाली आहे. तत्पूर्वी शेतमजूर किंवा कुठल्याही कार्यासाठी मजूर का मिळत नाही, याचीही कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. सरकार कुठलेही असो, त्यांना लोककल्याणकारी भूमिका प्रत्यक्ष अमलात आणावीच लागते. तशीच लोककल्याणकारी भूमिका अंत्योदय योजनेच्या माध्यमाने शासनाने प्रत्यक्षात आणली आहे. आता ही योजना आल्याने गहू, तांदूळ, डाळ आदी दैनंदिन गरजेसाठी लागणारे धान्य सहजतेने शासनानेच दिल्याने घरातील कर्ता पुरुष काम कशाला करायचे म्हणून आळशी बनत चालला आहे. आता तर त्याला वाटते की, काम करायची गरजच नाही. पूर्वी हा प्रकार महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. आता तर संपूर्ण देशातच मजुरांची वानवा निर्माण झाली आहे. कुठल्याही राज्यात जा, तेथील शेतकरी, कारखानदार मजूर नसल्याची खंत बोलून दाखवीत आहेत. सुमारे १४० कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात मजूर मिळत नाही हे मनाला पटण्यासारखे नाही. पण प्रत्यक्षात हे कटू वास्तव आहे. पूर्वी महाराष्ट्रात मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेशातील मजूर मोठ्या प्रमाणात यायचे आणि रग्गड पैसा कमावून आनंदात जीवन जगायचे. आता तेही मजूर महाराष्ट्रात यायला नकार देतात. समजा ते आले तर अर्धवट काम सोडून पळून जातात. हा फार मोठा प्रश्न निर्माण झाल्यावर यावर चिंता व्यक्त करीत बसण्यापेक्षा रामबाण उपायच करायला हवेत.

सरकारने आपल्या लोककल्याणकारी योजना बंद कराव्यात, अशी मागणी केली तर ज्यांना खरोखरच गरज आहे ते मदतीपासून वंचित होतील. समजा या योजना सुरूच राहिल्या तर लोक घरीच बसून मस्तपैकी मजा मारतील. अशा दुष्टचक्रातून बाहेर पडायचे असेल तर संपूर्ण देशात युद्धपातळीवर श्रमप्रतिष्ठा लोकांना पटवून द्यायला हवी. दररोज देशात धार्मिक कार्यक्रम होत असतात. त्या माध्यमाने आळस झटकून काम करा, असे आवाहन वारंवार करायला हवे.

जलसंपदा विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील रामटेक शाखा कार्यालयात सन १९९० मध्ये उप अभियंता रशीद कार्यरत होते. तेव्हा बहुतांश चालक आणि वाहक रिकामे बसून महाराष्ट्र शासनाकडून पगार घ्यायचे. हा प्रकार संबंधित अभियंता रशीद यांना खटकत होता. त्यांनी तातडीने आपल्या पातळीवर निर्णय घेत जलसंपदा विभागाच्या वसाहतीत वृक्षारोपण करीत त्यांचे संगोपन करण्याचे कार्य चालक आणि वाहकांवर सोपवले. प्रथमत: आळशी झालेल्या चालक-वाहकांनी विरोध केला पण उप अभियंता रशीद आपल्या निर्णयावर ठाम राहिले अन्?? खऱ्या अर्थाने एक अनोखा उपक्रम जलसंपदा विभागात यशस्वी झाला. अर्थात कुठल्याही कर्मचाऱ्याने काम न करता पगार घ्यावा ही बाब त्यांना पटली नाही. मग आपण काम न करता केवळ सरकारकडून अन्नधान्य घ्यायचे आणि दिवसभर पानटपरीवर बसून, मोबाईल पाहण्यातच वेळ गमवायचा का? समजा हे दुष्टचक्र असेच सुरू राहिले तर एक दिवस सरकारी गोदामातील अन्नधान्यही संपेल. मग सरकार तुम्हाला अंत्योदय अंतर्गत धान्याचा कुठून पुरवठा करणार आहे. एक सांगतो, हा प्रकार जास्त दिवस चालूच शकत नाही. कारण सरकारकडे जे काही धान्य गोळा होते ते आपल्याच देशातील शेतकऱ्यांनी, शेतमजुरांनी घाम गाळल्यानंतर उत्पादित होते तेच असते. आता शेतमजुरांनी शेताकडे पाठ वळविल्याने उत्पादनात घट शंभर टक्के होणारच आहे. पर्यायाने शेतकरी शेतमाल कुणालाही न विकता स्वत:च त्याचा उपयोग करतील. परिणामी सरकारचे धान्य गोदाम रिकामे राहतील. त्याचा विचार करता आळस झटकून शेतमजुरांनी कामाला लागावे, हीच माफक अपेक्षा. ▮

९८८१७१७८५९

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# विकसित भारत २०४७ : आवश्यकता आणि शक्यता

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन्? यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मांडलेला अर्थसंकल्प व त्यातील विविध तरतुदींवर अद्याप चर्चा सुरूच आहे. सरकारच्या अर्थसंकल्पात आर्थिकच नव्हे, तर सामाजिक व राजकीय पैलू असणे अपरिहार्य असते. यावेळी या प्रमुख तीन मुद्यांच्या जोडीलाच विविध राज्यांमध्ये होणाऱ्या वा होऊ घातलेल्या राजकीय निवडणुकांची सांगड अर्थसंकल्पातील तरतुदींशी घातली गेली. असे करणे किती चूक अथवा बरोबर आहे हा मुद्दा बाजूला ठेवला, तरी अर्थमंत्र्यांसह स्वतः पंतप्रधानांनी पण नमूद केल्यानुसार यावेळचा अर्थसंकल्प हा मोदी सरकारद्वारा प्रस्तावित देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात म्हणजेच २०४७ पर्यंत खऱ्या अर्थाने विकसित भारत घडविण्यासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नेमका हाच मुद्दा अर्थसंकल्पादरम्यान व त्यानंतर दुर्लक्षित राहिला असला, तरी त्यावर अधिक विस्तृत व साधक-बाधक चर्चा करणे मात्र तेवढेच आवश्यक ठरते.

'विकसित भारत : २०४७' या राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या व महत्त्वाकांक्षी संकल्पनेची पृष्ठभूमी म्हणजे १५ ऑगस्ट २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वार्थाने विकास झालेला असा विकसित भारत २०४७ मध्ये म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात प्रत्यक्षात साकारण्याचा संकल्प सोडला. यापूर्वी स्वातंत्र्योत्तर काळात एकदाच म्हणजे १९५६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचा विकास साधण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर पंचवार्षिक योजनेची मुहूर्तमेढ रोवली होती, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. जवाहरलाल नेहरू यांनी अशा प्रकारे देशाला राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक व विकासाचे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनेला इंदिरा गांधींच्या कार्यकाळात घरघर लागली. यातूनच इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी १९६९ मध्ये देशातील निवडक व प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा आर्थिक निर्णय घेतला व तेवढ्यानेच भागले नाही असे वाटून इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये संपूर्ण देशावर आणिबाणी लादण्याचा राजकीय निर्णय घेतला व त्याच दरम्यान नेहरूंनी सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनांची इतिश्री झाली, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. आता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी औद्योगिकदृष्ट्या उत्पादक व आर्थिकसंदर्भात उपयुक्त अशा विकसित भारताची संकल्पना मांडली आहे. आर्थिक-औद्योगिक विकासाच्या इच्छाशक्तीला राजकीय स्थिरता, नेतृत्वाची क्षमता व प्रशासनिक तत्परता या बाबी आवश्यक असतात.



यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा सरकारकडे या बाबी आहेत, ही जमेची बाजू ठरते. या बाबींची नोंद आंतराष्ट्रीय स्तरावर पण घेण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय व्यवसाय व आर्थिक स्थितीच्या संदर्भात साशंकता असण्याच्या पृष्ठभूमीवर भारताच्या आगामी २५ वर्षांनंतरचे विकासाचे चित्र काय असू शकेल, याबद्दल जागतिक बँकांसह कथित प्रगत देश व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अर्थशास्त्रज्ञ साशंक होते. मात्र, सातत्याने तीन वर्षे सकल घरेलू उत्पादनांमध्ये झालेली वाढ व या वाढीसह आर्थिक क्षेत्रात भारताने घेतलेली व टिकविलेली आघाडी पाहता भारत आणि भारतीय यांच्या संदर्भात शंका घेणाऱ्यांचे शंकास्वर आता थंडावले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय संस्था व या विषयातील विषयतज्ज्ञांच्या मते भारताची ही आर्थिक व विकासविषयक आघाडी २०२९ पर्यंत कायम राहील, अशी स्थिती आताच भक्कमपणे निर्माण झाली आहे.

या साऱ्या पृष्ठभूमीवर २०४७ मधील विकसित भारत कसा असेल अथवा असू शकेल याचा विचार करणे आता व्यावहारिक व शक्य झाले आहे. यासाठी देशांतर्गत सध्या असणारी ३.१ ही विकासाची टक्केवारी त्यासाठी आगामी सुमारे २४ वर्षे साध्य करणे व कायम राखणे अत्यावश्यक ठरते. असे झाले तरच २०४७ मध्ये विकसित भारताचे ध्येय साध्य केले जाऊ शकते. यावर प्रश्न पडतो की, विकासाची वर नमूद केल्याप्रमाणे टक्केवारी सातत्याने व कशा प्रकारे साधली जाऊ शकेल? या शंका वा प्रश्नाच्या उत्तरासाठी सद्य:स्थितीतील भारताच्या कामगिरीचा आढावा घेणे अर्थातच आवश्यक ठरते. यासंदर्भातील मोठी व महत्त्वाची बाब म्हणजे १९८१ ते २०२३ या ३० वर्षांहून अधिक व प्रदीर्घ काळात भारताचा सरासरी वार्षिक विकास दर ४ टक्के राहिला आहे. भारतासाठी ही बाब मोठी जमेची बाजू ठरते. वरील कालावधीत कोरोना काळाचा समावेश व त्यापोटी आलेली आर्थिक अस्थिरता या साऱ्या बाबी असताना भारताने साधलेला सातत्यपूर्ण विकास दर लक्षणीय ठरतो.

यासंदर्भात जागतिक बँकेंतर्गत प्रकाशित झालेल्या दक्षिण आशियाविषयक २०२४ मधील विशेष अभ्यास-अहवालानुसार राष्ट्रीय विकास दर वाढवून प्रदीर्घ काळ कायम राखण्यासाठी दक्षिण कोरियाच्या १९६०-१९८० या दोन दशकातील विकास दराचा दाखला देत भारताला सावध राहण्याचा वा अधिक काळजी घेण्याचा सल्ला याचा इशारा देण्यात आला आहे. या अहवालात रोजगार आणि उत्पादकता याद्वारे विकास दर साधण्यावर जोर देण्यात आले आहे.

विकास व विकास दराच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय संदर्भात तुलनात्मक आकडे व टक्केवारीच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार १९६० मध्ये जे वार्षिक दरडोई उत्पन्न होते ते साध्य करण्यासाठी भारतीय उपखंडातील भारतासह बांगलादेश, नेपाळ व पाकिस्तान या देशांना २०२२ पर्यंत प्रयत्नांसह वाट पाहावी लागली. यामागे कोरियातील रोजगार व वाढती उत्पादकता ही मुख्य कारणे असल्याचे नमूद करण्यात आले होते.

जागतिक बँकेकडे आर्थिक-औद्योगिक विकासाच्या संदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार सद्य:स्थितीत भारताच्या विकासाची तुलना कोरियाशी करणे सहज शक्य आहे. तुलनात्मक संदर्भात सांगायचे म्हणजे कोरियाने १९६० ते १९८० या कालावधीची तुलना भारताने आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीची भारताने २००० ते २०२२ या कालावधीत केलेल्या आर्थिक प्रगतीशी सहजपणे करता येते. त्याच दरम्यान उत्पादन व कामगारांच्या उत्पादकतेची पण कोरिया व भारत यांची तुलना करता येईल. थोडक्यात आकडेवारीमध्ये वरील कालावधीत उत्पादन क्षेत्र व कामगारांची उत्पादकता ६.१ टक्के होती तर भारताच्या संदर्भात हीच आकडेवारी होती ५.३ टक्के. सद्य:स्थितीत व विकसित भारताच्या संदर्भात विचार करताना ही वस्तुस्थिती व टक्केवारी भारताच्या संदर्भात निश्चितच जमेची बाजू ठरते. हीच बाब उत्पादन-कामगार क्षेत्रातील महिलांच्या वयोगटाच्या संदर्भात दिसून अपेक्षित विकास दर साधण्यासाठी २०२२-२३ या वर्षात कोरियातील २५ वर्षे वयाखालील टक्केवारी ४१.७ होती तर याच आर्थिक वर्षात अशा वयोगटातील महिलांची टक्केवारी होती ४१.९. यावरून उत्पादन क्षेत्रातील युवा वर्गाच्या टक्केवारीवर विकसित भारताच्या संदर्भात बोलताना पंतप्रधानांचा का म्हणून आग्रही भर असतो ते स्पष्ट होते. थोडक्यात म्हणजे आगामी सुमारे २०-२२ वर्षांनंतर विकसित भारत हे नरेंद्र मोदींची कल्पना म्हणजे एक आव्हानात्मक शक्यता म्हणावी लागेल. याकडे 'पळते ध्येय' म्हणूनही पाहता येईल. मात्र, आजची भारताची आर्थिक-औद्योगिक प्रगती व भारतीयांची क्षमता २०४७ मधील विकसित भारताचे ध्येय हे कठीण वाटत असले, तरी अशक्य मात्र नाही. विकसित भारताची शक्यता साधण्यासाठी तशा मानसिकतेची आवश्यकता मात्र आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### कल्याणकारी योजनेत लाभार्थीपेक्षा अपात्र भरपूर

शासनाने अनेक वंचित वर्गासाठी विविध योजना आणल्या आहेत. या माध्यमातून लोककल्याणकारी योजना थेट जनतेपर्यंत पोहचू लागल्या आहेत, शेवटच्या घटकापर्यंत योजनेचा लाभ मिळावा हा उद्देश आहे. परंतु शासनाच्या योजना येताच अनेक लाभ घेणारे कोणत्याही निकषात बसत नसतानाही या योजनेचा लाभ घेतात. योजेनेच्या सूचना, नियमावली यात तडजोड करून त्यामध्य खोटे कागदी पुरावे सादर करून लाभ घेणारे दिसून येतात. त्यामुळे शासनाच्या योजनांचा घोटाळा सहज दिसून येतो. शासनाच्या विशिष्ट कल्याणकारी योजनेत वंचित वर्गाला लाभ झाला तर हरकत नाही, परंतु लाभ मिळावा म्हणून खोटी कागदपत्रे सादर करून लाभ घेणारे अनेक आहेत. त्यांच्यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे.शासनाकडे संपूर्ण जनतेचा डेटा असून देखील लोककल्याणकारी योजनेत अनेक घोटाळे उघडकीस येत आहे. असे होऊ नये यासाठी शासनाने पूर्व नियोजन केले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### गजानन महाराज बुद्धी द्या! वसुंधरा सुंदर राहू द्या!

गजानन महाराजांचा प्रकट दिन जवळ येतो आहे. महाराजांवरील भक्तांचे प्रेम दिवसेंदिवस वाढत आहे आणि महाराज सगळ्यांना सांभाळून घेत आहेत. अन्नाची उरलेली शीतं खाऊन अन्न बचतीचा मौलिक संदेश देणारे महाराज आज कुठेतरी व्यथित होत असतील. भक्तांच्याच पैशाने भक्तांच्याच पोटात विष घालताना महाराजांना निश्चितच वाईट वाटत असेल. गजानन महाराज मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की आपण देत असलेला प्रसाद प्लॅस्टिकच्या किंवा थर्माकोलच्या डिशमध्ये देत असू तर तो प्रसाद नसून भक्ताला दिलेले विष आहे. त्याच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. पाणी पिऊन फेकून देण्यात येणारे हजारो प्याले परिसरातील दृश्य खराब करतात. डिस्पोजेबलमुळे शहर, गाव अस्वच्छ होत आहे. या अस्वच्छतेची महाराजांना निश्चितच अपेक्षा नाही. स्वतः गजानन महाराज मंदिर संस्थान शेगाव याबाबतीत आदर्श घालून देत आहे. श्री क्षेत्र माहूर येथे मिळणारा प्रसाद सुद्धा स्टीलच्या ताटवाटीवर मिळतो. ही ताटवाटी घासून तुम्हाला

## वाचक पत्रे



परत करावी लागते. स्वच्छता आणि आरोग्य दोन्हीही पाळले जाते. निश्चितच जास्त भक्तांची तिथे काळजी घेतली जाते. मग स्थानिक पातळीवर आपण या गोष्टी का पाळू शकत नाही. मानवी शरीरातील प्लॅस्टिक आणि इतर विषारी द्रव्यांचे प्रमाण यामुळे वाढले आहे. प्याले आणि प्लेट उचलणारे थकून जातात. नगरपरिषेदला करोडोंचे टेंडर काढावे लागतात. कचऱ्याचा ढीग पेटवून दिल्यामुळे शहराच्या आजूबाजूचे वातावरण खराब होते. श्वसनाचे विकार वाढतात. महाराजांचे भक्त आणि संचालक मंडळ यांनी या गोष्टी समजून घ्याव्या.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

### शिवजयंती

१९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारखेनुसार) साजरी केली जाते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील प्रत्येक शिवभक्तांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी दिवस आहे. आज ठिकठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. पोवाडे, गाण्यांचे कार्यक्रम, रॅली, भाषणे यांसारख्या उपक्रमांमुळे शिवचरित्राचा प्रचार होतो, हे नक्कीच प्रशंसनीय आहे. परंतु अशा कार्यक्रमांचे आयोजन म्हणजेच शिवरायांना दिलेली खरी आदरांजली ठरेल का? किंवा त्यांचे एक दिवस केलेले हे कार्यक्रम म्हणजेच स्मरण ठरेल का? याचा विचार करायला हवा. त्यांचे आचार, विचार, शौर्य, ध्येयनिष्ठा आणि नेतृत्वगुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करण्याची आज आवश्यकता आहे. शिवराय लहानपणापासूनच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होते. कुस्ती, दांडपट्टा, घोड्यावर स्वार होणे, तलवार चालवणे अशा खेळांमुळे त्यांच्यात निर्भयता, क्षात्रवृत्ती, अन्यायाविरुद्ध चीड, लढाऊवृत्ती, तसेच नेतृत्वक्षमता असे अनेक गुण निर्माण झाले. परंतु आजची मुले संगणकावर काल्पनिक खेळ खेळतात. त्या खेळातून विध्वंसक आणि विकृत विचारप्रवृत्ती वाढते. अशा खेळांतून मनाची दुर्बळता आणि आत्मकेंद्रितपणा देखील वाढतो. ती आत्मकेंद्रित बनल्याने त्यांच्यात राष्ट्रप्रेम; 'मला या राष्ट्रासाठी जगायचे आहे, काही करायचे आहे', असे व्यापक विचार कसे निर्माण होणार? तेव्हा शिवरायांप्रमाणे आपल्या मुलांमध्ये देखील धर्मप्रेम, राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी त्यांच्यावर योग्य संस्कार करणे गरजेचे आहे.

शिवरायांचे अनुकरण करणे, म्हणजे केवळ जयघोष करणे नव्हे, तर त्यांचा नि:स्वार्थी सेवाभाव, धैर्य, न्यायप्रियता, स्वराज्यनिर्मितीची तळमळ आणि त्यांचे तत्त्वज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात आत्मसात करणे हीच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल. ▮

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सहकार भारतीचे सतीश मराठे यांचा उद्या मुंबईत अमृत महोत्सवी सत्कार

**सांगली, दि. १७ फेब्रुवारी-**

बीना संस्कार नहीं सहकार'' हे ब्रीदवाक्य घेऊन सहकार भारती १९७९ पासून राष्ट्रीय स्तरावर सहकार क्षेत्रात कार्यरत आहे. सहकार भारतीच्या संस्थापक मंडळातील सदस्य आणि भारतीय रिझर्व बँकेचे संचालक आणि सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व सतीश मराठे यांना १ फेब्रुवारी २०२५ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली.



श्री. मराठे यांनी बँक ऑफ इंडिया येथून नोकरीची सुरवात केली. त्यांनतर सहकार क्षेत्रातील कार्यास प्रारंभ केला. त्यांनी डोंबिवली नागरी सहकारी बँक तसेच जनकल्याण सहकारी बँक येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वीरीत्या काम पाहिले. तसेच इंडियन बँक असोसिएशन येथेही कार्यरत होते. बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी सहकार भारतीतर्फे श्री. मराठे यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा श्री स्वामी नारायण मंदिर सभागृह, दादर (पूर्व), मुंबई या ठिकाणी आयोजित केला आहे. या सत्कार सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून रा. स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, इफको, दिल्लीचे प्रबंध निर्देशक डॉ. उदय शंकर अवस्थी आणि माजी केंद्रीय मंत्री आणि सतीश मराठे अमृत महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष सुरेश प्रभू यांची उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमाचे निमंत्रक सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी व राष्ट्रीय महामंत्री दिपक कुमार आहेत, अशी माहिती सहकार भारतीचे प्रदेश कोषाध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांनी दिली.

# जाणता राजा शिवछत्रपतींच्या पाळणा महोत्सवाला लाभणार हजारो जिजाऊ मातांची उपस्थिती !

## श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ महोत्सवाची दिमाखात तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक, बहुजन प्रतिपालक, निश्चयाचा महामेरू बहुत जनासी उध्दारू, जाणता राजा श्रीमंत छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ सोलापूर यांच्यावतीने भव्य दिव्य असा पाळणा महोत्सव ना भूतो न भविष्यती अशा पद्धतीने साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यातील सुमारे ५० हजाराहून अधिक माता बहिणी उपस्थित राहणार आहेत. याच पार्श्वभूमीवर महामंडळाच्या वतीने सर्व जय्यत तयारी करण्यात आली आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अश्वारूढ शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर हा भव्यदिव्य पाळणा महोत्सव संपन्न होणार आहे. यासाठी पुतळ्या समोर स्टेज तयार करण्यात आला आहे. या महोत्सवास शहीद माता, शहीद पत्नी, व शहीद कन्या यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. मध्यरात्री बारा वाजता सदरचा पाळणा कार्यक्रम संपन्न होणार असून, यासंबंधीची सर्व तयारी करण्यात आल्याची माहिती उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी दिली. यासाठी मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने विशेष परवानगी काढण्यात आली आहे.



### मिरवणुकीत सार्वजनिक मंडळांचा सहभाग

मध्यवर्ती महामंडळाचे शिवमुर्ती मेकॅनिकल चौकात येऊन दाखल झाल्यानंतर विविध सार्वजनिक मंडळे या मिरवणुकीत सहभागी होतील. या मिरवणुकीमध्ये शहरातील वारकरी संघटनेचे भजनी मंडळ, लेझीम झांज ढोल ताशा पथक, त्याच पद्धतीने छत्रपतींच्या जीवनावरील देखावे, लेझर शो सादर करण्यात येणार आहेत. डॉल्बी मुक्त मिरवणूक ही संकल्पना यंदाच्या वर्षी राबवून पारंपारिक वाद्य वृंदांच्या तालावर ही मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न केली जाणार आहे.

### पाळणा महोत्सवासाठी येणाऱ्या महिलांना बसेसचे नियोजन

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजन्मोत्सव पाळणा कार्यक्रमाला शहरात येणाऱ्या माता-भगिनींना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी विशेष बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी बसेसची मागणी करावी असे निवेदन मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या मार्गात बदल

शिवजन्मोत्सव पाळणा कार्यक्रमासाठी शहर जिल्ह्यातून असंख्य शिवभक्त आणि माता-भगिनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दाखल होणार आहेत. संपूर्ण रात्रभर या चौकात मोठी वर्दळ असणार आहे. त्यामुळे शहर पोलीस आयुक्ताच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे येणाऱ्या मार्ग वळवण्यात आले आहेत. सोलापूर शहरवासी यांनी या बदलाची नोंद घेण्याचे आवाहन पोलीस आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त बुधवार ( दि.१९ ) फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधीष्टीत मूर्तीची पूजा करून डाळिंबी आड मैदान येथून मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. पारंपारिक मार्गाने म्हणजे सरस्वती बुक डेपो, नवी पेठ, मेकॅनिकी चौक, भागवत थिएटर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी रोड, बाळीवेस, मधला मारुती, माणिक चौक, दत्त चौक, राजवाडे चौक, चौपाड विठ्ठल मंदिर, मार्गे निघून डाळिंबी आड मैदान येथेही मिरवणूक विसर्जित होणार आहे.

# वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

''आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी पुढाकार घेऊन जागतिक पातळीवर त्याचे मार्केटिंग केले पाहिजे'', असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले.

पुणे येथे वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते रविवारी झाले. एरंडवण्यातील धन्वंतरी सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात येथील वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक प. खडीवाले, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष वैद्य स. प्र. सरदेशमुख, सचिव वैद्य योगेश व. गोडबोले, विश्वस्त वैद्य संगीता खडीवाले, विश्वस्त वैद्य निखिल खडीवाले, विश्वस्त वैद्य विवेक साने, विश्वस्त जयश्री टाव्हरे आदी उपस्थित होते.

वैद्य प्रशांत बागेवाडीकर म्हणाले, ''आज आयुर्वेदाला कधी नव्हता इतका अनुकूल काळ दिसत आहे. आयुर्वेदासाठी आपल्या आधीच्या पिढ्यांनी अतोनात संघर्ष आणि परिश्रम घेतले आहेत. त्यांचे ऋण मान्य केले पाहिजे. आयुर्वेदिक रसशास्त्रातील औषधे वापरू नका, हा अपप्रचार थांबवला पाहिजे. आपल्या ज्ञानाचा प्रसार, प्रचार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यातूनच आयुर्वेद जागतिक स्तरावर जाईल.''

प्रास्ताविकात वैद्य विनायक खडीवाले म्हणाले, ''पुरस्काराचे हे ४० वे वर्ष आहे. आयुर्वेद क्षेत्रात जे समाजासाठी चांगले, सकारात्मक कार्य करीत आहेत, त्यांचे कौतुक, त्यांच्या कार्याची माहिती इतरांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या कार्यापासून इतरांना प्रेरणा मिळावी, या हेतूने वैद्य दादा खडीवाले यांनी याची सुरुवात केली.''

पुरस्कारप्राप्त सर्व वैद्यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते श्रीकृष्ण चितळे यांचा अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करण्यात आला. वैद्य संगीता खडीवाले यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य विवेक साने यांनी आभार मानले.







सोलापूर : मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी प्रशाला येथील शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला निमित्त दगडी इमारतीवरील विद्युत रोशनाईचे सोमवारी टिपलेले छायाचित्र.



## बैलगाडीचे आकर्षण...

सोलापूर : डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह परिसरात कृषी संस्कृती कार्यशाळा सुरु झाली. यावेळी त्या परिसरात गावचे वातावरण निर्माण केले होते. त्यावेळी बैलगाडीवर बसून सेल्फी काढताना युवतीचे सोमवारी टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)



# मुस्लिम मावळ्यांच्या वतीने शिवजयंतीनिमित्त मिठाई वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जे. पी. सोशल फाउंडेशनच्या वतीने कुमठा नाका येथील श्री बालाजी मतीमंद मुकबधिर शाळेत विद्यार्थ्यांना संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्या हस्ते स्वच्छता प्रसाधने किट आणि मिठाई वाटप करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी १८ पगड जाती धर्मातील मावळ्यांना एकत्रित करून रयतेचे स्वराज्य निर्माण केले. यामध्ये मुस्लिम मावळ्यांचेही मोठे योगदान होते. जेपी फाउंडेशनच्या माध्यमातून मुस्लिम मावळे एकत्र येऊन शिव विचारांची शिवजयंती साजरी करतात; हे खरंच अभिमानास्पद आहे. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष श्याम कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून युथ प्राइडचे समीर शेख, शहानवाज शेख, वसीमसाब शेख, शाहनवाज आणि कंपनी, जमीर सालार, फाउंडेशनचे अध्यक्ष जाफर पटेल, खजिनदार अनिस शेख, रियाज अत्तार, जिलानी शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक कुलकर्णी यांनी केले आणि कार्यक्रमाचा उद्देश व प्रास्ताविक फाउंडेशनचे सल्लागार रियाज अत्तार यांनी केले.

## क्रीडा

### महत्त्वाचे

**रणजी करंडक : गुजरातविरुद्ध केरळच्या २०६ धावा**

**अहमदाबाद** : कर्णधार सचिन बेबीच्या नाबाद अर्धशतकामुळे केरळने संथ सुरुवात केली, परंतु खेळ संपेपर्यंत गुजरातने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. पहिल्या डावातील बाद फेरीच्या चिंतेमुळे केरळने ही रणनीती स्वीकारली असावी. अलिकडेच जम्मू आणि काश्मीरविरुद्धच्या सामन्यात त्यांनी २०० धावसंख्येवर नऊ गडी गमावले होते. परंतु शेवटच्या गड्यासाठी ८१ धावांच्या भागीदारीमुळे त्यांना एका धावेची महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली. सलामीवीर अक्षय चंद्रन आणि रोहन कन्नुमल यांनी २०.४ षटकांत ६० धावा जोडल्या होत्या पण त्यानंतर पुढील ४५ मिनिटांत २६ धावांत त्यांचे तीन गडी बाद झाले. चंद्रन ३० धावा काढून धावबाद झाला आणि कन्नुमलही ३० धावांवर रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर पायचित झाला. केरळने शॉन रॉजरच्या जागी वरुण नयनरला तिसऱ्या क्रमांकावर पाठवले आणि त्याने सुमारे अर्धा तास गोलंदाजांना खेळवत ठेवले. तथापि, १० धावा केल्यानंतर, तो चांगल्या सुरुवातीचे मोठ्या डावात रूपांतर करण्यात अपयशी ठरला. दुपारच्या सत्रात, केरळने धावा काढण्याऐवजी वेळ घालवण्याची रणनीती अवलंबली. जलज सक्सेना आणि बेबी यांनी २७.५ षटकांत ७१ धावा जोडल्या. रणजी ट्रॉफीच्या दुसऱ्या टप्प्याच्या सुरुवातीपासून बेबीच्या बॅटमधून हे पहिले अर्धशतक आहे. ■

# कराची, लाहोर स्टेडियमवर भारताचा तिरंगा नाही

**कराची, १७ फेब्रुवारी**

पाकिस्तानला चॅम्पियन्स चषकाचे यजमानपद मिळाल्यानंतर या स्पर्धेचे काय होणार याची चिंता सर्वांनाच होती. भारत तेथे खेळणार नाही, अशी भूमिका बीसीसीआयने घेतली. मग या स्पर्धेचे काय होणार, अशी चर्चा असतानाच अखेर भारताने ही स्पर्धा पाकिस्तानात न खेळता अन्य ठिकाणी खेळण्याचा निर्णय घेतला आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला.

यात नवीन घटनाक्रम म्हणजे भारतीय संघ पाकिस्तानात खेळत नसल्याने पाकिस्तानने भारताचा झेंडा कराची आणि लाहोरच्या स्टेडियमवर लावलेला नाही. यामुळे पाकिस्तानला भारताचा किती द्वेष आहे, हे दिसत आहे.




पाकिस्तानला भारताच्या संघामुळे येणारा पैसा हवा आहे, परंतु भारतीय तिरंगा नको आहे. सोशल मीडियावर याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. लाहोरच्या गडाफी स्टेडियम आणि कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर भारताचा झेंडा लावण्यात आलेला नाही. चॅम्पियन्स चषकामध्ये जेवढे देश खेळत आहेत, त्या इतर देशांचा झेंडा लावण्यात आला आहे. भारत सर्व सामने दुबई ध्ये खेळणार आहे. यामुळे पाकिस्तानने झेंडा लावलेला नाही, असे मानले जात आहे. पाकिस्तानमध्ये अद्याप काही स्टेडियमचे काम सुरू आहे. याचेही व्हिडीओ येत आहेत. पाकिस्तानात फक्त पहिल्या फेरीतील सामने होणार आहेत. भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहेत. भारताने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तानने याला विरोध केला होता.

भारतीय संघ नसेल तर या स्पर्धेला काही अर्थ नाही हे आयसीसीला माहिती आहे. यामुळे आयसीसीने हायब्रिड मॉडेलमध्ये ही स्पर्धा खेळण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघ उपांत्य फेरीत गेला तर ते देखील सामने हे दुबईला होणार आहेत. यामुळे पाकिस्तानची आगपाखड होत आहे. यजमानपद आहे पण नावालाच, कारण उपांत्य आणि अंतिम सामना जर देशाबाहेर होत असेल तर त्या यजमानपदाला उपयोग काय, असा सवाल क्रिकेट जगतात उपस्थित केला जात आहे. यावरूनही पाकिस्तानची खिल्ली उडविली जात आहे. यामुळे पाकिस्तान भारताविरोधात अशा कुरघोडी करत आहे.

# खेळाडू देशाचे अस्तित्व असतो

## दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडा पारितोषिकवितरणप्रसंगी एपीआय अजित पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १७ फेब्रुवारी-**

आंतरराष्ट्रीय खेळात खांद्यावर राष्ट्रध्वज घेऊन संचलन करताना आज अंगावर शहारे उभे राहतात व रोमांचकारी अनुभव येतात कारण खेळाडू देशाचे अस्तित्व असतो. खेळाडू घडत असताना संपूर्ण कुटुंब त्यांच्या मागे असते. तुम्ही १००% योगदान दिले पाहिजे यातून घर, गाव, शाळा, संस्था, राज्य, देश पातळीवर नावलौकिक होतो. दयानंदसारख्या शिक्षणसंस्थेतला विद्यार्थी नितीमत्तेचा धडा घेऊन पोलिसी सेवेत यावा व सामान्य लोकांना न्याय देऊ शकेल अशी शिकवण दयानंद शिक्षण संस्थेत आहे असे गौरवपूर्ण उद्गार ए.पी. आय. अजित पाटील यांनी काढले.




ते दयानंद शिक्षणसंस्थेच्या कला व शास्त्र, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा ८४व्या वार्षिक क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी.,एन.एस.एस.,आविष्कार व दयानंद टॅलेंट सर्च या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. वेलणकर हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशासक प्रो. व्ही. पी. उबाळे हे होते. दयानंद शिक्षण संस्थेतला विद्यार्थी खेळाडू म्हणून देशपातळीवर चमकावा डी.ए.व्ही. चा माजी विदयार्थी बंड ॲम्बेसिडर नीरज चोप्रा, मनु भाकर आणि डी.ए.व्ही. सोलापूरचा आफताब शेख हे तुमच्या समोर आदर्श आहेत असे अध्यक्षीय मनोगत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी क्रिकेट, मैदानी, हँडबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस, लॉनटेनिस, सॉफ्टबॉल, बास्केटबॉल, खोखो, व्हॉलीबॉल, कुस्ती, शूटिंग इत्यादी १८३ नैपुण्यप्राप्त गुणवंतांना प्रमुख अतिथी ए.पी.आय. अजित पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व विविध पदके देण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. के. टी. चोकाककर यांनी केला, व्यासपीठावर कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. बी.एच. दामजी, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, वाणिज्य महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. एस. व्ही. शिंदे, विधी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. एस. जे. गायकवाड, उपप्राचार्य श्री ए. बी. खांडेकर, उपप्राचार्या श्रीमती एस. पी. जांभळे, कार्यक्रमाचे समन्वयक श्री एस.एस. कुंभारे, सहसमन्वयक प्रा. पी.आर. भोजे, डॉ. एस. ए. बंडे हे उपस्थित होते. प्रा. लक्ष्मी मुशन, प्रा. राखी गवळी, सौ. गीताभारती जिंदे, सौ. विद्या अजनसोंडकर, डॉ. मीनाक्षी म्हेत्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व डॉ. एस. डी. मनुकर यांनी आभार मानले.




# समृद्धी स्पोर्टस्‌चे सृष्टी हडपद, अक्षता गंगोंडा प्रथम

## सोलापूर चिल्ड्रन रन स्पर्धा

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

सुयश गुरुकुलच्या वतीने झालेल्या सोलापूर चिल्ड्रन रन स्पर्धेत समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एस आर पी कॅम्प सोलापूर येथील सृष्टी शरणप्पा हडपद व अक्षता गंगोडा यांनी प्रथम तर पवित्रा नागलगाव हिने द्वितीय स्थान मिळविले.

१२ ते १५ वर्षे वयोगट मुलीमध्ये इयत्ता सहावीतील सृष्टीने ७ किलोमीटर धावणेमध्ये २९.२० मि. वेळ नोंदवत तर ९ ते १२ वयोगटात सहावीतील अक्षताने ५ किलोमीटर धावणेमध्ये २०.०६ मिनिटे वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकाविला. इयत्ता सहावीतील पवित्राने २०.४२ मिनिटे वेळ नोंदवत द्वितीय क्रमांक मिळविला. या खेळाडूंना मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना सुयश गुरुकुलचे संस्थापक केशव शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. त्यांचे समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक अध्यक्ष संजय सावंत, अध्यक्ष प्रा. राजू प्याटी, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, तुकाराम शेंडगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रियांका माळी यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वैरागमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम

## अतिक्रमणधारकांची लोकप्रतिधींकडे धाव; नगरपंचायतीची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ फेब्रुवारी-**

वैराग नगरपंचायतीच्या क्षेत्रामधील बेकायदेशीर आणि अनाधिकृत केलेले अतिक्रमण काढण्यासाठी नगरपंचायतीने वेगवान हालचाली सुरू करीत हिंगणी रस्त्यावरील बेकायदेशीर अतिक्रमण काढण्या सुरुवात केली असून त्यामुळे अतिक्रमण केलेल्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले असून कारवाई टाळण्यासाठी नेतेमंडळींना साकडे घालू लागले आहेत.

वैराग ग्रामपंचायतची नगरपंचायत झाली मात्र बेकायदेशीर आणि अनाधिकृत केलेले अतिक्रमण तसेच राहिले. या अतिक्रमणाबाबत गेल्या अनेक वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रिया आणि वारंवार तक्रारी होत राहिल्या आहेत. या तक्रारींची दखल घेऊन दस्तुरखुद जिल्हाधिकाऱ्यांनी दोन वेळा अतिक्रमण काढण्याबाबतच्या नोटिसा वैराग नगरपंचायतीस बजावल्या होत्या. तरी देखील वैराग नगरपंचायतीने अनाधिकृत आणि बेकायदेशीर अतिक्रमण काढण्याच्या निर्णयाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे . रस्त्यावरील अतिक्रमण आणि बेशिस्त वाहुतकीमुळे वैदयकीय शिक्षण घेणाऱ्या १९ वर्षीय ऋतुजाचा अपघातामध्ये बळी गेला आहे यामुळे वैराग करामध्ये संतप्त भावना निर्माण झाली असून नगरपंचायतीचे अधिकारी ,पदाधिकारी यांना लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे . याची दखल घेत नगरपंचायतीने अनाधिकृत अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली आहे .बार्शी - सोलापूर रस्त्यावरील मुख्य शहर आणि ५७ गावांची वैराग बाजारपेठ प्रसिद्ध आहे. माढा, धाराशिव, तुळजापूर, मोहोळ या तालुक्यांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण वैराग बनले आहे.त्यामुळे ग्रामस्थांची मोठी रेलचेल वैराग मध्ये असते. वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता अनाधिकृतपणे वाढलेल्या अतिक्रमणामुळे अपघातांची संख्या वाढली आहे. व्यवसायिकांनी प्रमाणापेक्षा अधिक अतिक्रमण केल्यामुळे वाहतुकीस अडथळा आणि वारंवार तंटे होण्याचे प्रकार घडले आहेत. अतिक्रमण मोहीम कारवाई सर्वसमावेशक व्हावी, वैराग नगरपंचायतीच्या प्रत्येक हद्दीतील प्रत्येक ठिकाणचे अनाधिकृत अतिक्रमण निघावे. आणि या मोहिमेमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये असे सर्वसामान्यांचे म्हणणे आहे. नगरपंचायतीच्या सोबत वैराग- बार्शी, वैराग-माढा या रस्त्यावरील देखील अतिक्रमण काढून रस्त्याचा श्वास रिकामा करावा अशीही मागणी प्रवाशांकडून होत आहे.



### बांधकाम विभागाकडून कारवाईस टाळाटाळ

बार्शी तालुका सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बार्शी-सोलापूर रस्ता तसेच माढा रस्त्यावरील झालेले अतिक्रमण काढणे गरजेचे असताना देखील त्याला संबंधीत विभागाकडून जाणून बुजून टाळाटाळ केली जात असल्याची चर्चा लोकामध्ये होत आहे.

### जनजागृतीकडे दुर्लक्ष

अतिक्रमण काढण्याबाबत यापूर्वी विविध माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे. सर्व अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घ्यावे. असे आवाहन नगर पंचायत वैरागच्या मुख्य कार्यकारी अधिकारी चरण कोल्हे यांनी केले आहे.

---

## संक्षिप्त वृत्त



### शिल्पा घाडगे हिची महसूल सहाय्यकपदी नियुक्ती

**टेंभुर्णी, दि. १७ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील अकोले-खुर्द येथील शिल्पा बाबुराव घाडगे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून महसूल सहाय्यकपदी (मंत्रालय) नियुक्ती झाल्याने तिची माळी वस्ती येथे सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.तसेच तिचा अकोले-खुर्द ग्रामपंचायत व माळी वस्ती जि. प. शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापक नामदेवराव जगदाळे, जनार्दन बुधवंत,अंगणवाडी सेविका संगिता टेके,मदतनीस अंजना घाडगे यांच्यावतीने कु.शिल्पा घाडगे हिचा फेटा, शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रप्रमुख मनोज पवार, कोळी, माजी सरपंच महादेव घाडगे, ग्रा. पं. सदस्य वैशाली घाडगे, बाबुराव घाडगे, ग्रामसेवक राजेंद्र माळी, तुळशीराम घाडगे, अनिल बनसोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर घाडगे, उपाध्यक्ष सुप्रिया कुबेर, उत्तम घाडगे, नवनाथ झगडे, यशवंत घाडगे, शिवाजी घाडगे, निखिल घाडगे, रमेश घाडगे, आदित्य घाडगे आदी उपस्थित होते. अकोले-खुर्द ग्रामपंचायतीच्या वतीने शिल्पा घाडगे व प्रियांका पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी चेअरमन हरिदास पाटील, संभाजी पाटील, सरपंच रुपाली कांतीलाल नवले, संतोष पाटील, अनिल तोडकर, कुबेर महाडिक, हनुमंत माळी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार नामदेव जगदाळे यांनी मानले.

### आहेरवाडीच्या उपसरपंचपदी रविराज पाटील



**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील उपसरपंच रमेजा इनामदार यांनी एक वर्ष मुदत संपल्यानंतर राजीनामा दिला होता. त्यांच्या जागेवर शिवसेना तालुका प्रमुख योगीराज पाटील यांचे बंधू रविराज पाटील यांना तेरा सदस्यांपैकी अकरा तर प्रतिस्पर्धी कन्याकुमारी बिराजदार यांना दोन मते पडली. त्यामुळे नऊ मतांनी विजयी होऊन पाटील यांची उपसरपंचपदी निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी सज्जाद काझी व तलाठी रमजान करनाचे यांनी काम पाहिले. या विजयात श्री पंचलिंगेश्वर ग्रामविकास पॅनलप्रमुख सिद्धाराम बावी, शिवानंद कोनापुरे, प्रभाकर दिंडोरे, नरसप्पा दिंडोरे, शिवानंद बाके, बाबुराव रामपुरे, शिवानंद कोळी, बंडपा पाटील व सरपंच सुवर्णा दिंडोरे तसेच ग्रामपंचायत सदस्य परशुराम आटकर, विमलाबाई ससावे, आडव्याप्पा कोराळे, नीलाबाई पाटील, रमेजा इनामदार, श्रीदेवी बम्मणगे, शांताबाई बोरुटे, अंबाना रामपुरे, शुभम दिंडोरे, काशिनाथ वाघमारे यांचे सहकार्य लाभले. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष मल्लिनाथ कापसे, रुद्रप्पा बाके, गुंडप्पा सासवे, भीमराव पाटील, हजरत पिरजादे, बसनींग कांबळे, संतोष शिंदगी, शरणप्पा बम्मणगे, हजरत पिरजादे, पंचप्पा कुमठे, यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### तिलाटीजवळ रेल्वे रुळावर आढळला महिलेचा मृतदेह

**अक्कलकोट, दि.१७ फेब्रुवारी-**

तिलाटी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे पटरीवर रविवारी पहाटे अज्ञात महिला मृतावस्थेत सापडली. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुमितकुमार अजयकुमार सिंह (वय २९, रा. रेल्वे क्वार्टर, जुना तिलाटी स्टेशन, ता. दक्षिण सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी २३ ते १६ फेब्रुवारी सकाळी सातदरम्यान रेल्वेचे अप आणि डाऊन ट्रॅकवरवर पेट्रोलिंग करीत असताना १६ फेब्रुवारी रोजी पहाटे सव्वातीनच्या सुमरास कि. मी नंबर ४८२/१४ च्याजवळ रेल्वे डॉउन ट्रॅकचे शेजारी एक अज्ञात महिला डोकं, हात, पाय, पाठ, कंबरेवर जखमा होऊन गंभीर अवस्थेत पडली होती. त्या जखमी महिलेस ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे आणण्यात आले, त्या ठिकाणी डॉक्टरांनी मयत घोषित केले.

### शारदा पोतदार यांचे निधन



**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

कुमठानाका-नई जिंदगी रोड वरील भाग्योदय सोसायटी सोलापुर येथिल रहिवासी शारदा रेवण पोतदार यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी रहाते घरी अकस्मीत हृदय घाताने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना व नातवंड असा परिवार आहे. त्यांच्यावर मोदी परिसर रामवाडी बोगदा जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे मुळेगांव येथील गट नं. १००/१ पैकी गोदावरी नगर मधील प्लॉट नं. ६ याचे क्षेत्र ९२.९४ चौ. मीटर अथवा १००० चौ. फुट इतके आहे.

यासी चतुः सीमा :-

पुर्वेस :- रस्ता — दक्षिणेस :-रस्ता
पश्चिमेस : गट नं. १००/२ पैकी जमिन — उत्तरेस :- प्लॉट नं. ५

येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

या प्लॉट जागा साधना गोविंद पडगे, रा.१३२२, भद्रावती पेठ, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती व करारपत्र लिहून दिला आहे, त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. १७/०२/२०२५

सही/-
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६
**अशिलातर्फे**

---

# तीन वर्षांत योजना पूर्ण करणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील : स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ फेब्रुवारी-**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजेनेचे काम सुरु होणार असल्याने १२ गावातील सुमारे १५ हजार ४०० हे. जमिनींना बंदिस्त नलिकेव्दारे शेतीला लवकरच कायमस्वरुपी पाणी मिळणार आहे. यामुळे सांगोला तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरुपी संपून तालुका दुष्काळमुक्त होणार आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले.



स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला या योजनेच्या कामाचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले, यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. बाबासाहेब देशमुख, माजी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ. शहाजीबापू पाटील, दीपक साळुंखे-पाटील, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता डॉ. ह. तु. धुमाळ, भीमा कालवा अधीक्षक अभियंता धीरज साळी उपस्थित होते. विखे-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. राज्यातील शेतकरी दुष्काळातून आता मुक्त झाला पाहिजे. स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या कामास शासनाने सुधारीत प्रशासकीय मंजुरी दिली. या योजनेकरिता उजनी धरणामधून दोन टीएमसी पाण्याची तरतूद असून या पाण्याद्वारे सांगोला तालुक्यातील १२ गावातील सुमारे १३ हजार ५५ हे. क्षेत्रास व सांगोला शाखा कालवा क्र. ५ अंतर्गत २ हजार ३४५ हे. असे १५ हजार ४०० हे. क्षेत्राचा सिंचनाचा लाभ मिळणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ. शहाजी पाटील व माजी आ. दीपक साळुंखे-पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

---

# बेळगावहून कुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या गाडीला अपघात

### चारजण गंभीर जखमी; माचणूर येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ फेब्रुवारी-**

बेळगावहून प्रयागराज कुंभमेळ्यासाठी दर्शनाला जाणाऱ्या मिनी बसचा कोल्हापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रॅव्हलर गाडीचे (के. २४/७१७६) मागील टायर फुटून रविवार सकाळी ८.३० मिनिटांनी माचणूर येथे भीषण आपघात झाला आहे.



ट्रॅव्हलमध्ये १३ प्रवासी प्रवास करत होते. त्यापैकी चारजण गंभीर जखमी झाले. त्यांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात ड्रायव्हर बसवराज पाटील (वय४०, प्रवीण पाटील (वय ४२), सुधा भोपळे (वय ४५), शोभा पन्हाळकर (वय ५२) यांचा आपघातात समावेश आहे तर किरकोळ जखमीमध्ये संजय भोपळे (वय ५६), वैभव भोपळे (वय २८), अक्षता भोपळे (वय २५), सानिका धुडूम (वय १८), विकास धुडूम (वय २२), गणपत पन्हाळकर (वय ६०), चन्नम्मा पन्हाळकर (वय ५०), चिनू सुतार (वय ४५), सुनीता सुतार (वय ४५), वंश भोपळे (आठ महिने), संग्राम भोपळे (वय २) अशी किरकोळ जखमींची नावे आहेत.

अपघातस्थळी माचणूर ग्रामस्थांनी व फ्रोझा एक्स. टी. सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्तांना गाडीतून बाहेर काढण्यास मदत केली.

---

# बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचा कायापालट

## प्रा. विठ्ठल एडके : देगाव येथील एनएसएस शिबिरात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**

भारतात नव आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर बचतगटाची चळवळीची निर्मिती झाली असून ग्रामीण जीवनात बचतगटाच्या माध्यमातून कायापालट होऊ शकतो, असे प्रतिपादन पुअहो सोलापूर विद्यापीठातील प्रा. विठ्ठल एडके यांनी केले.




श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित देवगांव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये महिला मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्या शैलजाताई मांजरे होत्या.

यावेळी मंचावर शितलताई मांजरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. समाधान लोंढे, प्रा. मनोज चिकराम आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. एडके म्हणाले की, महिला बचतगटांनी शहरातील नागरिकांना उपयोग पटणाऱ्या वस्तूची निर्मिती केली तर त्यातून मिळणाऱ्या आर्थिक फायद्यातून संसाराचा गाडा सुरळीत चालू शकतो. तसेच आपल्या मुलांना शिकण्याची संधी उपलब्ध करुन देणे काळाची गरज बनले आहे. ग्रामीण भागातील महिलांनी शेती मालावर प्रक्रिया उद्योगाची निर्मिती करुन अनेक महिलांना रोजगाराची संधी मिळू शकते. शासनाच्या बचतगटासाठी अनेक योजना राबविल्या जातात, त्यातून बचतगटांना नवे उद्योग उभा करता येतील. ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी बचतगटाची नितांत गरज बनले आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक स्वयंसेवक यशराज शेंबडे यांनी तर सुत्रसंचलन स्वयंसेवक ओम लोहार यांनी केले तर आभार डॉ. दामाजी भिसे यांनी मानले.

---

# शिवजयंतीतील खर्चाला फाटा देत वाचनालय सुरु करणार

## इर्लेवाडी ग्रामस्थांचा उपक्रम; जुन्या ग्रामपंचायत इमारतीचीही करणार डागडुजी



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ फेब्रुवारी-**

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी होत असते. छत्रपती शिवाजी महाराज हे डोक्यावर घेण्याचा विषय नाही तर डोक्यात घेण्याचा विषय आहे, हाच विचार जपत येत्या शिवजयंतीला कोणतीही मिरवणूक न काढता, डीजे, डॉल्बी न लावता एक अनोखा, आगळावेगळा उपक्रमाने साजरी करण्याचा निर्णय इर्लेवाडी गावातील सर्व ग्रामस्थांनी, विशेषतः गावातील युवकांनी घेतला आहे.

गावातील इर्लेवाडी ग्राम पंचायत कार्यालयाची जुनी इमारत पडीक बनून होती. त्याचे नूतनीकरण करून त्या इमारतीमध्ये सर्वांच्या सहकार्याने वाचनालय सुरू करण्याचा एक प्रयत्न येथील युवकांनी केला आहे. आजच्या मोबाईलच्या युगामध्ये सुद्धा नव्या पिढीला वाचनाची गोडी निर्माण व्हावी, शिवरायांचे चरित्र आणि शौर्यगाथा पुस्तकातून जाणून घेता यावी, यासाठी ग्रामस्थांचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून शिवप्रेमी, प्रतिष्ठीत व्यक्ती, दानशूर व्यक्ती, नोकरदार वर्गाने आपलं योगदान देत असंख्य पुस्तके भेट दिली आहेत. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

> शिव जयंतीनिमित्त शिवाजी महाराजांच्या विचारातून अनोखी शिव जयंती साजरी करण्याचा निर्णय इर्लेवाडी ग्रामपंचायतीने घेतला. आजच्या युगात पुस्तके हीच शस्त्रे आहेत. वाचनामुळे माणसाच्या आयुष्यात अनेक सकारात्मक बदल होतात. यापूर्वी सुद्धा जत्राचे खर्च टाळून त्या पैशात प्रार्थना वृद्धाश्रमास मदत केली होती. यापुढे ही सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने समाजोपयोगी उपक्रम राबविले जातील.
>
> **- पंकज सरकाळे, उपसरपंच, इर्लेवाडी**

---

# राज्यस्तरीय डायरेक्ट व्हॉलीबॉल स्पर्धेत २४ संघांचा सहभाग

### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी आयोजित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त भव्य कर्मवीर राज्यस्तरीय डायरेक्ट व्हॉलीबॉल स्पर्धा पार पडली.




उद्घाटन उपाध्यक्ष नंदन जगदाळे व सचिव पी. टी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दीपक गुंड उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात या स्पर्धेच्या नियोजनाचा हेतू सांगितला. या स्पर्धेसाठी राज्यातून जवळपास २४ संघाने सहभाग नोंदविला. राज्यातील सोलापूर, धाराशिव, सांगली, लातूर अशा विविध जिल्ह्यातून संघाने सहभाग नोंदविला आहे. ही स्पर्धा डे - नाईट स्वरुपात खेळवली.

२४ संघाचे जवळपास २३ सामने या मैदानावरती पार पडले व त्यातून पाच संघ विजेते म्हणून घोषित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक विजेता संघ इंडिया स्पोर्ट व्हॉलीबॉल संघ वैराग, द्वितीय शिवरत्न हॉलीबॉल संघ शेळगाव आर, तृतीय मोरया हॉलीबॉल संघ काटी तुळजापूर, चौथा लोकमान्य हॉलीबॉल संघ माणकेश्वर व पाचवा कर्मवीर हॉलीबॉल क्लब बार्शी यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, परिस स्पर्श हे पुस्तक तसेच ट्रॉमा युनिटची माहिती पुस्तिका ही देण्यात आली. प्रथम पाच विजेत्या संघांना खालील व्यक्तींनी सहकार्य करुन देणगी स्वरुपात हे बक्षीस दिले. सर्व विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव श्री पी. टी. पाटील हे उपस्थित होते. तसेच श्री जयकुमार शितोळे हे देखील उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये विजेत्या संघांना तसेच इतर सहभागी संघांचे अभिनंदन केले व असाच सहभाग कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धांमध्ये नोंदवावा व अशा खेळीमेळीच्या वातावरणात अशा स्पर्धा पार पाडण्यात याव्या आणि सहकार्य करावे, असे सांगितले. बक्षीस वितरणाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दीपक गुंड सर यांनी व्यक्त केले. तसेच आभार प्रा. साबळे सर व प्रा. धुमाळ सर यांनी मांडले. सूत्रसंचालन प्रा. जे. पी. गायकवाड सर यांनी केले.

### यांनी दिले बक्षिस

या बक्षिसांसाठी देणगीदार म्हणून प्रथम क्रमांकासाठी इंजिनिअर सुरज गायकवाड यांनी ११,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी अमोल ताकभाते बीडीओ तुळजापूर यांनी ९,००० रुपये, तृतीय क्रमांकासाठी प्रा. हेमंत तुकाराम शिंदे यांनी ७,००० रुपये, चौथ्या क्रमांकासाठी माऊली पतसंस्था बार्शी यांनी ५,००० रुपये तसेच पाचव्या क्रमांकासाठी राहुल आवटे यांनी ३,००० रुपये बक्षीस जाहीर केले होते.


भरोसा और
निवेशकों को पहला स्थान
मूल्यों की नींव पर
मध्यप्रदेश की उड़ान
नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री
डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश
ग्लोबल इन्वेस्टर्स समिट
इन्वेस्ट मध्यप्रदेश
अनंत संभावनाएं
24-25 फरवरी 2025, भोपाल
असीमित संभावनाएं एवं निवेश का समृद्ध इकोसिस्टम आपके लिए तैयार है
आकर्षक नीतियां
पारदर्शी नीतियों के साथ कस्टमाइज्ड पैकेज
ईज़ ऑफ डूइंग बिज़नेस
EODB रैंकिंग में अग्रणी राज्य
आधुनिक आधारभूत संरचना
340+ औद्योगिक पार्क (MSME, IT, EMS पार्क सहित) 7 स्मार्ट सिटीज़, 5 आईटी सेज़
पावर सरप्लस
31 GW स्थापित क्षमता
30% स्वच्छ ऊर्जा
स्ट्रेटजिक कनेक्टिविटी
6 हवाई अड्डे, 20 रेलवे जंक्शन, 6 ड्राई पोर्ट
1 मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क
व्यापक औद्योगिक लैंड बैंक
1 लाख + एकड़
विस्तृत रोड नेटवर्क
5 लाख + किमी रोड नेटवर्क
46 राष्ट्रीय राजमार्ग
पर्याप्त जल आपूर्ति
उद्योगों के लिए 1000 + मिलियन घनमीटर जल उपलब्ध
रजिस्ट्रेशन के लिए स्कैन करें
www.investmp.in
सीधा प्रसारण
@Cmmadhyapradesh
@jansampark.madhyapradesh
@Cmmadhyapradesh
@jansamparkMP
JansamparkMP
#InvestInMP
#MPGIS2025

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माजी महापौर स्व.भीमरावजी जाधव यांच्या जयंतीनिमित्त उद्या विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**




ज्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी उभे आयुष्य वेचले, समाजास सन्मानाने जगण्याची दिशा दिली असे दलितमित्र भीमरावजी जाधव यांच्या १०२ व्या जयंती दिनानिमित्त बुधवार १९ फेब्रुवारी रोजी मातोश्री सुभद्राबाई जाधव सांस्कृतिक भवन, जूना वांगी रोड, येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सकाळी ९.३० ते दु. १ वा. श्री. विघ्नेश प्रस्तुत मराठी व हिंदी भावगीत व भक्तीगींताची सुरेल कार्यक्रम होत असून प्रा. अनिल लोंढे व त्याचे सहकारी सादर करतील. दुपारी १.१० वा गुलालाचा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमानंतर महाप्रसाद देण्यात येणार आहे. नागरीकांनी व जाधव परिवारावर प्रेम करण्याऱ्या स्नेहीनी उपस्थीत रहावे, असे आवाहन भारत भीमराव जाधव यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्फूर्तिगीताचं विमोचन

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पार्टीचं महाराष्ट्रात सध्या संघटन पर्व सुरु आहे. ज्यामध्ये दीड कोटी सदस्य बनविण्याचे पक्षाने उद्दिष्ट ठेवले असून विविध माध्यमांतून महाराष्ट्रातील जनतेला भाजपाची विचारधारा पोहोचवून पक्षाकडे आकर्षित करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून भाजपा स्फूर्तिगीत तयार करण्यात आले आहे.




या ऊर्जादायी गाण्याचे विमोचन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सदस्यता महा अभियान २०२५ अंतर्गत आयोजित संघटन पर्व कार्यशाळा या भव्य कार्यक्रमात करण्यात आले. भाजपा पक्ष देशाला विकासाची दिशा देण्याचं काम करत आहे त्यामुळे त्यात जास्तीतजास्त लोक जोडून यावेत यासाठी स्फूर्तिगीताची कल्पना राबविण्याचा निर्णय घेतल्याचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

### शिवजयंतीनिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी लाँग बुक सीरिज लाँच

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

ट 'यूवा' या नवनीत एज्युकेशन हाऊसच्या भारतातील प्रमुख स्टेशनरी ब्रँडतर्फे छत्रपती शिवाजी महाराज लाँग बुक सीरिज लाँच करण्यात आली आहे. महान योद्धे छत्रपती शिवाजी महाराज यांना ही लिमिटेड एडिशन समर्पित करण्यात आलेली आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेली ही बुक्स, मराठा साम्राज्याच्या या महान नेतृत्वाच्या शौर्यकथा आणि समृद्ध इतिहास यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहेत.यावेळी अभिजीत सान्याल म्हणतात,शिक्षणात महाराजांची यशोगाथा जिवंत ठेवून उद्याचे नेतृत्व घडवण्याची आमची महत्त्वाकांक्षा आहे.

### शिवजयंतीनिमित्त उद्या संभाजी आरमारच्या वतीने पालखी सोहळा

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

शिव-विचारांचा जागर करावा, अशी प्रत्येकाची इच्छा असते. मात्र सगळेच जण ना लेझीम खेळू शकतात, ना डॉल्बीच्या तालावर ठेका धरू शकतात. त्यामुळेच अशा सर्वांना शिवजन्मोत्सवाचा आनंद सोहळा साजरा करता यावा म्हणून संभाजी आरमारच्या वतीने शिवजयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती रंगभवन चौक येथे पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात हजारो माता-भगिनी भगवा फेटा बांधून सामील होणार आहेत. अनेक कुटुंब शिवरसात समरसून जाणार आहेत. शिवजयंती साजरी तर करायची आहे पण कशी? हा प्रश्न पडलेल्या सर्वांचे संभाजी आरमारच्या पालखी सोहळ्यात सहर्ष स्वागत आहे.

### ऑर्किड इंजिनियरिंगमध्ये शुक्रवारी मेकॅनिक मेळावा व प्रदर्शन

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

जिल्हा टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशनच्या वतीने शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी एन. के. आर्किड इंजिनिअरिंग कॉलेज येथे मेकॅनिक मेळावा आणि प्रदर्शनाचे आयोजन केले आहे, अशी माहिती अध्यक्ष राजेंद्र घुले यांनी पत्रकार परिषदेत दिली. संस्थेच्या ३५व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या मेळाव्यास सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील सुमारे १ हजार मेकॅनिक यावेळी उपस्थित राहणार आहेत. स्पेशल टूल्स, इक्विपमेंट, मशिनरी, बीएस ६ओबीडी टूल्स, इलेक्ट्रिक व्हेहिकल्स यांचे प्रदर्शनही इथे पाहता येणार आहे. मेळाव्याचे उद्घाटन हिरो मोटो कॉर्पचे नॅशनल हेड मनीष मिश्रा, एन. के. ऑर्किड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी.के. सोनगे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे जनरल मॅनेजर गीते, हिरो मोटो कॉर्पचे झोनल मॅनेजर संजीव कुमार, ऑटो इन्स्टिट्यूट मुंबईचे संचालक पाटणवाला, वूर्थ इंडियाचे नॅशनल मॅनेजर रजित मुलीयील आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यात चर्चासत्र, प्रशिक्षण, मेकॅनिक स्पर्धा , मनोरंजन कार्यक्रम आणि बक्षीस वितरण होणार आहे. या पत्रकार परिषदेस बादशाह शेख, सुनील इंगळे आदी उपस्थित होते.

## २१ हजार बटनांमधून साकारली शिवप्रतिमा

- युवाचित्रकार विपुल मिरजकरांनी चित्राच्या माध्यमातून शिवाजी महाराजांना केले अभिवादन
- अन्नदान करत राबविणार सामाजिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक, बहुजन प्रतिपालक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती (१९) फेब्रुवारी रोजी मोठा उत्साहात साजरी होणार आहे. याच शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रसिद्ध चित्रकार विपुल मिरजकर यांनी आपल्या हस्त कौशल्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची सौंदर्यपूर्ण अशी प्रतिमा साकारलेली आहे. सुमारे २१ हजार शर्टाच्या बटनच्या साह्याने सदरची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. मिरजकर यांनी या वैविध्यपूर्ण अशा प्रतिकृतीच्या माध्यमातून शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले आहे.

दरम्यान, यापूर्वी मिरजकर यांनी बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, त्याचप्रमाणे इतर थोर महापुरुषांच्या प्रतिमा रांगोळी, खिळे, दोरा, तिळगुळ लाह्या यांच्या सहाय्याने विविध प्रकारे साकारल्या आहेत. मिरजकर यांचा यामध्ये विशेष हातखंडा असून, प्रत्येक प्रतिमा तयार करण्यामागे त्यांचा सागरात्मक उद्देश दिसून येतो. यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली जात आहे. प्लायवूडवर प्रतिमा साकारून आकर्षक रंगछटा व चेहऱ्याच्या लकेरनुसार प्रतिमा साकारली जात आहे. हुबेहूब प्रतिमा दिसावी यासाठी विविध रंगी बटन वापरले गेले आहेत. बटनच्या माध्यमातून अशी प्रतिमा साकारले जाऊ शकते, असा विचार त्यांच्या डोक्यात आल्यानंतर त्यांनी ही प्रतिमा साकारली आहे. सदरची प्रतिमा शिवजयंती मिरवणुकी दरम्यान श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीसमोर ठेवली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

यंदाच्या शिवजयंतीनिमित्त देखील असाच उद्देश समोर ठेवून छत्रपती शिवाजी महाराज यांची वैविध्यपूर्ण अशी प्रतिकृती साकारली आहे. सदरची प्रतिकृती बनवण्यासाठी मिरजकर यांना तब्बल चार दिवसांचा कालावधी लागला आहे. त्याच पद्धतीने विविध रंगाचे बटन उपलब्ध करून देण्यामध्ये त्यांना बसवराज कडगंची आणि पंकज शहा यांचे सहकार्य लाभले आहे. सदरच्या प्रतिमा विक्री केल्यानंतर त्यातून जे काही उत्पन्न प्राप्त होईल त्यातून देखील अन्नदान करण्याचा सामाजिक उपक्रम मिरजकर यांनी हाती घेतला असल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




सोलापूर : उजव्या बाजूला युवा चित्रकार विपुल मिरजकर आपलेच अनोखे चित्र निहाळताना.

**हस्त कौशल्यांच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम :** हस्तकौशल्याच्या माध्यमातून विविध प्रकारचे चित्र, प्रतिमा, प्रतिकृती साकारल्या जातात. काही विशेष चित्र साकारण्यासाठी ऑर्डर प्राप्त होते. त्यातून जे उत्पन्न मिळते. त्यातून अन्नदाना सारखा सामाजिक उपक्रम हाती घेतला जात आहे. शिवजयंती निमित्त साकारलेल्या या शिवप्रतिमा छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादक ठरणार आहेत. तसेच त्यातून जे काही उत्पन्न प्राप्त होईल त्यातून अन्नदान तसेच विविध सामाजिक कार्य केले जाणार आहे.

**- विपुल मिरजकर, चित्रकार**

## 'उद्योगवर्धिनी'च्या स्त्री सक्षमीकरणाचा प्रवास उलगडणार

- तळागाळातील स्वयंपूर्ण बनलेल्या महिला सादर करणार नाट्याविष्कार
- सोलापूरकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात 'मी ते आम्ही' -प्रवास उद्योगवर्धिनीचा' हा नाट्यरूपातील कार्यक्रम सादर होणार आहे, अशी माहिती उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते होणार असून याप्रसंगी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार प्रमोद कुलकर्णी (पुणे) यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. 'मी ते आम्ही'- प्रवास उद्योगवर्धिनीचा' या नाट्याविष्कारात संस्थापिका चंद्रिका चौहान यांनी उद्योगवर्धिनी संस्थेची स्थापना केल्यापासून २१ वर्षांत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतून महिलांना बाहेर काढत त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे विविध उपक्रम, त्यातून गरजू महिलांना लाभलेली स्वयंपूर्णता, अन्नपूर्णा क्षुधाशांती योजना, शिलाई प्रशिक्षण व उत्पादन, मंगलदृष्टी भवन, सेवा पाथेय प्रकल्प, विविध बचतगटांना मार्गदर्शन व प्रशिक्षण, शांतसंध्या, समुपदेशन केंद्र आदी सेवाभावी प्रकल्पांची माहिती नाट्याविष्काराच्या माध्यमातून सोलापूरकरांना पाहायला मिळणार आहे. उद्योगवर्धीनी संस्थेच्या १५० महिला सदस्या हे नाट्य सादरीकरण करणार असून अश्विनी तडवळकर यांनी याचे लेखन केले असून अभिनेते, दिग्दर्शक अमीर तडवळकर यांनी याचे दिग्दर्शन केले आहे.

या पत्रकार परिषदेस संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान, उपाध्यक्षा शोभा श्रीवास्तव, सचिवा मेधा राजोपाध्ये, खजिनदार वर्षा विभूते, संचालिका मृणालिनी भूमकर, अॅड. गीतांजली चौहान, सुलोचना भाकरे, स्मिता लाहोटी, कांचना श्रीराम, मीनाक्षी सलगर उपस्थित होत्या.

## सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून सोडले पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

उजनी धरणातून सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा नगरपरिषद आणि भीमा नदीवरील इतर गावे आणि शहरांना पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी पिण्याच्या पाण्याच्या आवर्तनासाठी भीमा नदीतून आज सोमवार दि.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजल्यापासून पाणी सोडण्यात आले आहे.

सुरुवातीला १६०० क्युसेक वेगाने तर त्यानंतर ६ हजार क्युसेकने हे पाणी सोडले जाणार आहे. हे पाणी सोलापूरच्या औज बंधाऱ्यात पोहोचण्यासाठी आठ ते दहा दिवसाचा कालावधी लागणार आहे. अर्धा टीएमसी एवढी पाणी साठवण क्षमता असलेल्या औज बंधाऱ्यात पाणी सोडण्यासाठी उजनीतून पाच टीएमसी पाणी नदीवाटे सोडावे लागते. १२३ टीएमसी एवढे पाणी साठलेल्या उजनी धरणात सध्या ९८ टीएमसी एवढा पाणीसाठा आहे. मार्च आणि एप्रिल मध्ये पुन्हा शेतीसाठी पाण्याचे आवतण सोडले जाणार आहे.



पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी आरक्षण समितीचे बैठकी मधील निर्णयानुसार भिमा नदी काठच्या गावातील पिण्याचे पाणी पुरवठा योजनांसाठी सोमवारी पाणी सोडण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सुरक्षतेच्या दृष्टीने धरणाखालील गावांना व नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## सोलापुरात वाढली उन्हाची दाहकता

**● गेल्या आठवड्यापासून तापमान ३८ अंशाच्या घरात**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

थंडीची हुडहुडी संपल्यानंतर आता सोलापुरात उन्हाळ्याची दाहकता चांगलीच जाणवू लागली असल्याने दुपारी रस्त्यांवरील गर्दी कमी होत आहे आणि थंड पेयांच्या दुकानांवर दुपारी मोठी गर्दी दिसू लागली आहे. दरम्यान, चालू आठवड्यापासून ३६ ते ३८ अंश सेल्सियसच्या दरम्यान तापमान राहिले आहे. दरम्यान, पुढील मार्च-एप्रिलमध्ये तापमान ४३ अंशावर जाईल अशी भीतीही जाणकार नागरिकांतून व्यक्त होत आहे.

शहरात उन्हाचा चटका वाढला असून, राज्यातील बहुतांशी जिल्ह्यातही तापमान आता वाढू लागले आहे. दि. १३ फेब्रुवारीपासून तापमानात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दि. १४ फेब्रुवारीस ३६.४, १५ फेब्रुवारीस ३७.८, दि. १६ फेब्रुवारी ३७.४ तर आज १७ फेब्रुवारीस ३७.३ अंश सेल्सियस तापमानाची सोलापुरात नोंद झाली. शहरातील वातावरणातही मोठ्या प्रमाणात बदल झाला असून, तापमान झपाट्याने वाढत आहे. वाढत्या तापमानामुळे दुपारी रस्त्यावरची गर्दी तुरळक होऊ लागली आहे. त्याच बरोबर चौका-चौकातील गाड्यांवर शीतपेये, उसाचा रस, ज्यूस यासाठी गर्दी होत आहे. दुपारी कामासाठी बाहेर पडणारा प्रत्येकजण चेहऱ्याला रूमाल स्कार्फ बांधूनच बाहेर पडत असल्याचे दिसत आहे. आता चाकरमाने आणि शालेय विद्यार्थ्यांचे उन्हामुळे हाल होत आहेत. सध्या १२ वी परीक्षा चालू असल्याने या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनाही दुपारी उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहेत.

**शरिराला थंडावा देणारे पदार्थ खा**

सोलापुरात उष्णतेची दाहकता भयावह असते. त्यामुळे शरीराचे तापमान व्यवस्थित राखण्यासाठी जास्तीत जास्त स्वच्छ पाणी प्यावे. आहारात शरीराला थंडावा देणारे पदार्थ खावेत. विविध प्रकारचे ज्यूस प्यावेत. डोक्याच्या संरक्षणासाठी रुमाल अथवा डोक्यावर टोपी घालावी. इतकेच नाहीतर दुपारी शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे.

**- डॉ. रविराज गायकवाड, माजी अध्यक्ष निमा संघटना**

## शिवजयंती निमित्त शिवभक्त महिलांनी कपाळावर कोरली शिवरायांची प्रतिमा

**● टॅटूच्या माध्यमातून नव्या पिढीला शिवरायांची देणार शिकवण**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक जाणता राजा श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरात सध्या उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. प्रत्येक अबालवृद्ध शिवजयंती वेगवेगळ्या पद्धतीने साजरी करत आहे. याच अनुषंगाने सोलापूर शहरातील काही शिवभक्त महिलांनी शिवरायांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपली शिवभक्ती सादर करत कपाळावरच छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा कोरली आहे. आरती पवार श्रुती हंचनाळकर शुभांगी जगदाळे आणि गंगा गुरव अशी महिलांची नावे आहेत.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आत्मीयता महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना आहे. मात्र नवीन पिढीला छत्रपती शिवाजी महाराज कळावेत, किशोरवयीन यासाठी पुढाकार घेत, महिलांनी चक्क स्वतःच्या कपाळावरच (तात्पुरता) टॅटू काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी मुलांमध्ये उत्सुकता वाढण्यासाठी ही युक्ती महिलांनी निर्माण केली आहे.

आता मुलांमध्ये शिवरायांबद्दलची उत्सुकता निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना शिवरायांची अधिक माहिती देण्यासाठी पुढील तीन दिवसात अनेक उपक्रम आम्ही राबवून असल्याचे या महिलांनी सांगितले. शेवटी काळ कोणताही असो शिवकाळ किंवा सध्याचा मुलांना घरासाठी आई जे करते त्याला तोड नसतेच हेच या त्यांच्या शिवभक्ती वरून दिसून आले.



सध्याची लहान मुले व किशोरवयीन मुले यांच्यासमोर टीव्ही मोबाईल मध्ये दिसणारे मोटू पतलू, शिनचॅन असे कार्टूनच वारंवार असतात. त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनातही दिसून येतो. भविष्यात त्यांना चांगल्या मार्गावरती यावयाची जाणीव व्हावी यासाठी आम्ही पण त्याच प्र-कारे विचार केला. शिवरायांचा टॅटू आपल्या कपाळावर काढून त्यांचे लक्ष वेधण्यात आम्ही यशस्वी ठरलो. आता तीन दिवस शिवरायांच्या कार्याविषयी माहिती त्यांना विविध उपक्रमातून देणार आहोत.

**- शुभांगी जगदाळे, गृहिणी**

छत्रपती शिवाजी महाराज हे सबंध राष्ट्राचे प्रेरणास्थान आहेत.त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आम्ही अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी कपाळावर प्रतिमा करून घेतली आहे.

**-श्रुती हंचनाळकर गृहिणी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही प्रेरणादायक आहे. लहान मुलांना ते समजावे यासाठी विविध उपक्रम तीन दिवस राबवणार आहोत. त्याची सुरुवात म्हणून शिवरायांची प्रतिमा कपाळावर करून आम्ही त्यांना स्मरण केले आहे.

**-आरती पवार,गृहिणी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल लहानपणापासून आदर आहे. नवीन पिढी मात्र त्यांच्या कार्यापासून अनभिज्ञ आहे. आधुनिक काळातील लहान मुलांना छत्रपती शिवाजी महाराज कळावेत यासाठी वेगळ्या पद्धतीने हा उपक्रम आम्ही राबवला. सोसायटीतील लहान व किशोर मुलांचे ते लक्षवेधी ठरत आहे. आता तीन दिवस अन्य उपक्रम राबवून शिवरायांच्या विजयाचा जागर करणार आहोत.

**- गंगा गुरव, गृहिणी**

## स्वबळाचे वक्तव्य करणारे अपरिपक्व नेते

- मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महायुतीतील नेत्यांना सुनावले खडेबोल..!

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ फेब्रुवारी-**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत न लढता त्या स्वबळावर लढविणे असे म्हणणाऱ्या नेत्यांची वक्तव्य म्हणजे अपरिपक्वपणाचे लक्षण आहे, असे खडे बोल महायुतीतील नेत्यांना राज्याचे संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सुनावले.



येथील भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार प्रशांत परिचारकांच्या वडीलांचे काही दिवसांपूर्वीच निधन झाले. परिचारक कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी मंत्री पाटील हे सोमवारी येथे आलेले होते. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी नेत्यांना खडे बोल सुनावले. यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी बाबत राजकीय पक्ष संपुर्ण राज्यासाठीचा एक निर्णय कधीच करीत नाहीत. स्थानिक पातळीवर संबंधित शहरात कुणाचे किती काम आहे यावरून या निवडणूकी संदर्भातील महत्वाचे निर्णय घेतले जात असतात असे त्यांनी सांगितले.

**सुप्रिम कोर्टाच्या निकालानंतर निर्णय होईल**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाबत सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर निर्णय होईल. त्या वेळेची परिस्थिती काय असेल त्यावर पुढील निर्णय होतील. त्यामुळे आतासध्याला तरी आपल्या हाता मध्ये याबाबतीत काहच नाही. त्यामुळे सुप्रिम कोर्टाच्या निर्णया नंतरच प्रभाग रचना होईल. मगच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाबत निर्णय होईल अशीही माहिती पाटील यांनी दिली.

**धनंजय मुंडे बाबतच्या प्रश्नावर मौन**

राज्यातील मंत्री धनंजय मुंडे यांच्या बाबत राज्य सराकारला येणाऱ्या अडचणींबाबतचा प्रश्न जेव्हा मंत्री चंद्रकांत पाटील यांना येथील पत्रकारांनी विचारला त्यावेळी चंद्रकांत पाटील यांनी त्यावर मौन बाळगणे पसंद केले. मंत्री पाटील हे त्याप्रश्ना संदर्भात कोणतेही उत्तर न देताच निघून गेले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३२

**अमृताचा सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी।**
**तेचि दे अमृतलहरी। चुळी घेतलिया।।**

विश्वरुप दर्शनाने धन्य झालेला अर्जुन आपल्या इच्छेप्रमाणे पुन्हा कृष्णरुप पाहू शकला. विश्वरुप आणि कृष्णरुप ही दोन्ही भगवंताची रुपे असल्याचे त्याच्या लक्षात आले. विश्वरुप हे भयानक, उग्र व अत्यंत अद्भूत असे होते. कृष्णरुप हे अत्यंत गोजिरे व आवडणारे होते. आपणाला कृष्णरुपाचीच सवय व आवड असल्याने, भगवंताना त्याने कृष्णरुपात येण्यास विनंती केली होती. विश्वरुपाच्या ठिकाणी अनेक जीवांचे एकत्रीकरण तर होतेच पण त्या विश्वरुपात श्रीकृष्ण भगवंताचा व अर्जुनाचाही समावेश होता. या विश्वरुपात नाही असा कोणीही नव्हता. श्रीकृष्ण हे सुध्दा या विश्वरुपाचाच एक अंश होते. विश्वरुपात जो ईश्वर आहे तोच ईश्वर त्याचा एक अंश असणाऱ्या कोणत्याही प्राणीमात्रात, जीवात आहे. महासागर जर अमृताने भरला असेल तर त्या अमृताची चव चुळकाभर पाण्यातसुध्दा सारखीच असते. अर्थात अमर करण्याचे जे सामर्थ्य ज्या महासागरात आहे, तेच सामर्थ्य त्या महासागराच्या चुळकाभर पाण्यात असते. अगदी त्याचप्रमाणे विश्वरुपात जे सामर्थ्य, अलौकिकपणा आहे, तेच सामर्थ्य, तोच अलौकिकपणा त्या विश्वरुपाचा अंश असणाऱ्या एका जीवातही आहे. तो जीव मग श्रीकृष्णाचा असो, की अर्जुनाचा असो किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचा असो की जीवमात्राचा असो. ईश्वर हा सर्वांमध्ये सारखाच भरुन उरला आहे. हे स्पष्ट करतांना माऊली म्हणतात, अमृताचा सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ।।



आपण अमृत हे फक्त ऐकले आहे. प्रत्यक्ष त्याला आपण पाहिले किंवा अनुभवले नाही; पण खारट समुद्र आपण अनुभवला आहे. त्या संपूर्ण समुद्रात जो खारटपणा आहे, तोच खारटपणा त्या समुद्राच्या चुळकाभर पाण्यात असतो, हे आपणाला मान्य असेलच. अगदी असेच ईश्वराचे आहे. विश्वरुपात जो भगवंत आहे, तोच भगवंत तुमच्या आमच्यात आहे. तुम्ही आम्ही विश्वरुपाचाच एक भाग असल्याने एकमेकांशी लाडीगोडीने, आपुलकीने, प्रेमाने वागणे अत्यंत आवश्यक आहे. चालत्या बोलत्या या ईश्वरांना डावलून दगडा-धोंडयात ईश्वराला शोधण्याचा प्रयत्न करणे हितावह असणार नाही. सर्व जीवमात्रात ईश्वराला पाहून संपले तर निर्जिवामध्ये ईश्वर पाहण्याची पायरी असू शकेल. असो, प्रथम प्राणीमात्रात ईश्वर पाहून, त्याची सेवा करण्यास प्रारंभ करणे आवश्यक आहे. किलोभर सोन्याचा जो कस असतो, तोच कस त्यातील गुंजभर सोन्याचा असतो. त्याप्रमाणे ईश्वराचे आहे हे विसरता कामा नये. सर्व देही ईश्वर पाहण्याची अर्जुनाची मानसिकता पाहून भगवंतांना जसा आनंद वाटला तसे आपली सर्वदेही भगवंत पाहण्याची मानसिकता पाहून माऊलींना आनंद वाटेल. सर्व संतमहात्यांनी सर्व देही ईश्वराला पाहिल्याने आपणही सर्वदेही ईश्वराला पाहू या. अशा सकारात्मक दृष्टीतच ईश्वर आहे, हे खरे आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - श्री विठ्ठलादेवी जागर सरवदे रामकृष्ण जन्मोत्सव |
| दि. १८ फेब्रुवारी २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. षष्ठी (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - चित्रा (०७.३४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - गंड (०९.५०) | |
| करण - गर (१८.१२) | |

### राशीभविष्य

**मेष** : कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ** : आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह** : प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या** : उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक** : कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** : सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणताही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर** : दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ** : व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन** : श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.

# शिवजयंतीनिमित्त उद्या शिवभोजन

## ● थोरला मंगळवेढा तालीमतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

श्री शिवजन्मोत्सव निमित्त थोरला मंगळवेढा तालीम मंडळातर्फे शिवभक्तांसाठी आणि बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस बांधवांसाठी तसेच शहर जिल्हयातून येणाऱ्या शिवप्रेमी असे २५ हजार शिवभक्तांसाठी शिवभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.




अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा निमंत्रक अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिवजयंती निमित्त बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौकातील यात्री कॉटेज येथे बाजी आण्णा मठाजवळ टेबल खुर्चीवर शिवभोजन होणार आहे. शिवजयंतीच्या सोलापूर शहरात भव्य मिरवणुका निघतात. शहरातील हॉटेल बंद असतात. मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या शहर आणि जिल्ह्यातील शिवप्रेमींची गैरसोय होते. हे लक्षात घेऊन मिरवणुक टाळून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवभक्तांना पोटभर जेवण देऊन तृप्त करण्याचा उपक्रम थोरला मंगळवेढा तालमीच्या वतीने मागील अनेक वर्षापासून सुरु आहे. या वर्षी २५ हजार शिवभक्तांना भोजन देण्याचा संकल्प असल्याचे थोरला मंगळवेढा तालमीचे आधारस्तंभ शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले. कुशल संघटक संकेत पिसे, अमोलराजे भोसले, अनिकेत पिसे व थोरला मंगळवेढा तालीमचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या नियोजनात हा उपक्रम होणार आहे. शिवभोजन कार्यक्रमाचे उद्‌घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. याप्रसंगी मनपा आयुक्त शीतल तेली-उगले, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, शिवसेना संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत, अन्नछत्र मंडळाचे जन्मेजयराजे भोसले, बिपीन पटेल, राजाभाऊ सरवदे, महेश गादेकर, दास शेळके, शहाजी पवार, नरेंद्र काळे, चेतन नरोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस प्रकाश कदम, सागर भिसे, इम्तियाज कमिशनर, अमित पवार, सागर भिसे, राहुल गोयल, संजय होळकर आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५५) दु:खाश्रू

अन्यायाशी संघर्ष हा डॉक्टरांचा स्वभाव होता व कष्टासी मानू झोला मृत्यूशी खेळू खेळा असे त्यांचे मनोधैर्य होते. त्यांनी असहकार आंदोलनात भाग घेतला होता. असहकारावर डॉक्टर ठिकठिकाणी व्याख्यान देत असत. तेव्हाच खिलाफत चळवळ पण सुरू होती. (वाचाअलक ४७) असहकारावर राष्ट्रद्रोही व्याख्यान या सबबीखाली त्यांना एक वर्ष कारावास झाला. १९ ऑगस्ट १९२१ ला डॉक्टर नागपूरच्या कारागृहात गेले. १२ जुलै १९२२ ला मुक्त झाले. परंतु त्याच काळात मलबारातील मुसलमानांनी बंड केले होते. त्यावर स्वा. सावरकरांनी मोपल्याचे बंड अर्थात मला काय त्याचे ही कादंबरी १९२६ मध्ये लिहिली. केरळमधील मलबारातील मोपला मुसलमानांनी अनन्वित अत्याचार केले होते. मोपल्यांच्या बंडात १५०० हिंदू बळी पडले होते व वीस सहस्त्र हिंदूंना सक्तीने बाटवले होते. त्या काळात मालमत्तेची हानी तीन कोटी रुपये झाली होती. डॉक्टर हेडगेवार पुस्तक वाचत होते, तेव्हा अक्षरशः दु:खाश्रूंना त्यांच्या डोळ्यांनी वाट मोकळी करून दिली होती. कारण बंडाच्या वेळी ते कारागृहात होते. आणि तरीसुद्धा महात्मा गांधी म्हणत होते हा मोपल्यांचा धार्मिक झगडा होता; तसे ते देवभोळे असतात. हे वाचून तर डॉक्टरांनी स्वतःच्या डोक्यावर हात मारला.

**क्रमशः**

# सत्य पचविण्याची शक्ती समाजात उरली नाही

## ● प्रा. मिलिंद जोशी; जुळे सोलापूर मसाप डॉ. आगाशे, प्रा. वझे यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**




सोलापूर शहरात लोकमान्य टिळक सभागृहात रायते पुरस्कार प्रसंगी कलावंताची कला कशी असावी याचे निर्णय जेव्हा झुंडी घेऊ लागतात तेव्हा ती कलेच्या ऱ्हास पर्वाची सुरुवात असते. आजच्या समाजात अनेक विषय अकारण अतिसंवेदनशील झाले आहेत त्यामुळे लेखक आणि कलावंत यांनी निर्भीडपणे सत्य मांडले तरी ते पचविण्याची शक्ती समाजात उरली नाही. कला व्यवहार समजून घेण्यासाठी प्रगल्भ समाजमानस निर्माण होणे गरजेचे आहे महाराष्ट्र साहित्य परिषदेची जुळे सोलापूर शाखा उत्तम काम करत असून या पुरस्काराला महाराष्ट्रात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्यावतीने ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांना स्वर्गीय.डॉ. वासुदेव रायते स्मृती पुरस्कार तर श्यामची आई चित्रपटातील श्यामची भूमिका साकारणारे प्रा.माधव वझे यांना स्वर्गीय. श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक राज्यस्तरीय पुरस्कार समारंभ पूर्वक देण्यात आला. त्यावेळी प्रा. मिलिंद जोशी बोलत होते. रोख १० हजार रुपये रोख, सन्मान चिन्ह, शाल, पुस्तक, गुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मसाप जुळे सोलापुर शाखेच्या कार्याध्यक्ष सायली जोशी होत्या. सत्काराला उत्तर देताना डॉ.आगाशे म्हणाले, लहान मुले कुठलीही भावना कधीही लपवून ठेवत नाही. मोठे झाल्यावर जे लहानपण टिकवून ठेवतील ते कधीच म्हातारे होत नाहीत.

अनेक घरात लहान मुले आणि आजोबांचे यामुळेच जमते. कारण ते लहान मुलांसोबत लहान होऊन जगतात. प्रारंभी शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन शाखेचे कार्यकारणी सदस्य संतोष पवार यांनी केले तर आभार प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी मांडले या समारंभाला मधुसुदन रायते, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, प्रशांत जोशी, डॉ माधुरी भोसले, रामचंद्र धर्मसाले, सचिन चौधरी, अचला राचर्ला, सुनील शिनखेडे, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. श्रुती वडगबाळकर, जे. जे. कुलकर्णी, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. विद्या देशपांडे, डॉ. क्षमा वळसंगकर, गोविंद काळे, मारुती कटकधोंड, अशोक खानापूर उपस्थित होते.




# विद्यार्थ्यांनी राबविले रानमसलेत समृध्द गाव स्वच्छता अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रासेयो शिबिराच्या माध्यमातून लोकमंगल समृद्ध गाव योजनेअंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविले.

या अभियानांतर्गत रानमसले येथील अंगणवाडी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अंगणवाडी परिसरातील वाढलेले गवत व झाडांच्या आजूबाजूला असलेल्या काटेरी गवताळ झुडुपे काढण्यात आली. यामध्ये महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर व उपसरपंच रमेश सुतार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यासोबतच रोसेयो शिबिराअंतर्गत पार पडलेल्या रक्तक्षय तपासणी शिबिराचे अहवाल शिबिरातील ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहभागी शालेय विद्यार्थीनींना वितरित करण्यात आले.

याप्रसंगी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सागर महाजन तसेच संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख व सचिव डॉ. अनिता ढोबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल सोबत भागीदारीची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रवारी-**

डोळ्यांची देखभाल करणाऱ्या नेटवर्कच्या भारतातील प्रमुख शृंखलांपैकी एक असलेल्या मॅक्सिव्हिजन ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स,मुंबईतील जगप्रसिद्ध आणि प्रतिष्ठित नेत्रसेवा प्रदाता असलेल्या ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल सोबत धोरणात्मक भागीदारीद्वारे महाराष्ट्रात प्रवेश करण्याची घोषणा केली.

या भागीदारीचा औपचारिक शुभारंभ डॉ.जीएसके वेलू,प्रवर्तक आणि अध्यक्ष, मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स आणि डॉ.नितिन देधिया, प्रवर्तक आणि अध्यक्ष, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, डॉ.रोहन देधिया, प्रवर्तक आणि संचालक ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया, सीईओ, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया यांच्या उपस्थितीत करण्यात आला. मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स एकत्रितपणे, नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त उपक्रम - ओजस मॅक्सीव्हिजन आय हॉस्पिटल्सचे संपूर्ण महाराष्ट्रात कारभार वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट आहे.

# सिंहगड इन्स्टिट्यूटच्या कार्यशाळेत ९५ जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**



हँड्स ऑन रिअल-टाइम डव्हान्स्ड क्लाउड कॉम्प्युटिंग कॉन्फिगरेशन आणि सेवा या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडली. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ९५ जण सहभागी झाले होते. ज्यात विविध विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा समावेश होता.

संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभाग, एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर द्वारे प्रायोजित हँड्स-ऑन रीअल-टाईम डव्हान्स्ड क्लाउड कॉम्प्युटिंग कॉन्फिगरेशन आणि सर्व्हिसेस या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा यशस्वीरित्या आयोजित केली होती. भाविक शाह (व्यवस्थापकीय संचालक, आर. बी. टेक सर्व्हिसेस, अहमदनगर) आणि सुनील म्हामणे (बिझनेस प्रोग्राम मॅनेजर, मायक्रोसॉफ्ट, बंगलोर) यांची उपस्थिती होती. उद्घाटन समारंभास डॉ.एस. एच. पवार, संचालक, सीआरटीडी, सिंहगड इन्स्टिट्यूट, सोलापूर, यांच्यासह डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य, एनबीएनएससीओई, प्रा. एच. टी. गुरमे, सीएसई विभागाचे प्रमुख, डॉ. आर. टी. व्यवहारे, उपप्राचार्य आणि डॉ. एस. एम. जगडे, उपप्राचार्य. कार्यशाळेत क्लाउड सर्व्हिस मॉडेल्स, व्हर्च्युअलायझेशन, डिप्लॉयमेंट स्ट्रॅटेजीज आणि सुरक्षा पैलूंचा समावेश असलेल्या उद्योग व्यावसायिक आणि शिक्षणतज्ज्ञांकडून तज्ञ सत्रे सादर केली. कार्यशाळेत क्लाउड सर्व्हिस मॉडेल्स, व्हर्च्युअलायझेशन, डिप्लॉयमेंट स्ट्रॅटेजीज आणि सुरक्षा पैलूंचा समावेश असलेल्या उद्योग व्यावसायिक आणि शिक्षणतज्ज्ञांकडून तज्ञ सत्रे सादर केली गेली. परस्परसंवादी सत्रे, रीअल-टाइम प्रात्यक्षिके आणि हँड्स-ऑन व्यायामाने एक मौल्यवान शिक्षण अनुभव प्रदान केला. कार्यशाळेचा समारोप प्रा.एस.एस. शेळके यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. त्यांनी सर्व योगदानकर्त्यांचे आभार मानले. संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा. एच. टी. गुरमे यांनी आभार मानले.

## पदाधिकारी अधिकारी व कर्मचारी विविध गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धा

# दक्षिण सोलापूरला विजेतेपद; माळशिरस उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**




जिल्हा परिषद सोलापूर आयोजित पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी व सांस्कृतिक स्पर्धेत पंचायत समिती दक्षिण सोलापूरने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. पंचायत समिती माळशिरस तालुक्याने सर्वसाधारण उपविजेतेपद संपादिले.

हुतात्मा स्मृती मंदिर येथे या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, खाते प्रमुख मीनाक्षी वाकडे, अमोल जाधव, प्रसाद मिरकले, संतोष कुलकर्णी, क्रीडा व सांस्कृतिक नियोजन समितीचे सहसचिव अनिल जगताप, संजय सावंत, विशेष निमंत्रित सदस्य विजय साळुंखे, सुमित फुलमामडी, गोवर्धन कमटम, सदस्य चंद्रकांत होळकर, अविनाश गोडसे, तजमुल मूतवल्ली, सचिन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक स्पर्धेसाठी अनिल लोंढे, सुनंदा शेंडगे, बळवंत जोशी, असावरी नारकर, प्रसाद विभुते, अश्विनी मेटकरी, सागर देवकुळे व समाधान लोखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सांस्कृतिक स्पर्धा सहसचिव किरण लोंढे, गणेश कुडले, मल्लिकार्जुन सोमेश्वर, डॉ. माधुरी भोसले, नरेंद्र अकेले, कृष्णा लोंढे आदींनी परिश्रम घेतले.

### विविध गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धेचा निकाल याप्रमाणे (प्रथम तीन)

वैयक्तिक गीत गायन : पारंपारिक : पंचशीला कसबे (दक्षिण सोलापूर), किरण शेलार (कुर्डवाडी), महेश कोटीवाले (मोहोळ).चित्रपट गीत : सिद्राम पेदे (मुख्यालय), योगेश माने (मंगळवेढा), महेश मैत्री (अक्कलकोट).द्वंद्व गीत : किरण शेलार व चंदाराणी खुळे (कुर्डवाडी), शहजादी काजी व जगदीश गोडसे (माळशिरस), जगदीश मेटकरी व सुनिता राठोड (दक्षिण सोलापूर).नृत्य वैयक्तिक पारंपारिक : अलका भालेकर (मोहोळ), प्रिया तोरणे (माळशिरस), अतिषा पवार (कुर्डवाडी). नृत्य वैयक्तिक चित्रपट : नाजनीन शेख (माळशिरस), अनिल राठोड (दक्षिण सोलापूर), दिपाली साळवे (करमाळा). सांघिक : समूहगीत पारंपारिकः मोहोळ, दक्षिण सोलापूर. समूहगीत कराओके साँगः मोहोळ, उत्तर सोलापूर. समूह नृत्य पारंपारिक : माळशिस, द.सोलापूर. समूहनृत्य चित्रपट : द.सोलापूर, माळशिरस.



# स्वच्छतेमुळे उठून दिसते 'व्यक्तीमत्व' : सुधीर ठोंबरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

स्वच्छतेमुळे व्यक्तीमत्व उठून दिसते. स्वतःमध्ये बदल करण्याचा संकल्प करा. स्वच्छता ही सेवा माना, असे मत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ.सुधीर ठोंबरे यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शंभर दिवसीय कृती आराखडा व सात कलमी कार्यक्रमानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा येथे सदर मोहीम राबविण्यात आली. यावेळी डॉ. ठोंबरे बोलत होते. या प्रसंगी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रतीलाल साळुंखे, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, विस्तार अधिकारी सराफ, कार्यालयीन अधीक्षक लोखंडे, जिल्हा व्यवस्थापक दयानंद सरवळे, मीनाक्षी मडीवली, अनिता माने, प्रमिला बचुटे आदी उपस्थित होते.

डॉ. ठोंबरे म्हणाले की, चांगल्या गोष्टींची शरीराला सवय लावा. चांगल्यांसाठी मानसिकता तयार करा. जे करायचे ते चांगले करा. स्वत: मध्ये बदल करा. निरीक्षण करा. मनाने गरीब होऊ नका. व्यक्तीमत्वासाठी स्वच्छतेचा अंगीकार करा. स्वच्छता ही सेवा म्हणून काम करा. स्वच्छतेमुळे रोगराई दूर होण्यास मदत होते. त्यामुळे आपले घर, परिसर, कार्यालय हे नेहमी स्वच्छ ठेवा. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सदर मोहिमेत दोन तास श्रम दान करून कार्यालयीन स्वच्छ्ता, परिचर स्वच्छ्ता केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/


## संक्षिप्त वृत्त



### आनंद बाजारातून विद्यार्थ्यांनी अनुभवले व्यवहार ज्ञानाचे धडे

**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**

मनोरंजनातून कृतीयुक्त व्यवहारज्ञान हा उद्देश सफल करण्यासाठी आज बार्शी तालुक्यातील गुणवत्तेत अग्रगण्य असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठोंगे) येथे बाल आनंद बाजार भरविण्यात आला. यामध्ये इयत्ता १ ली ते ७ वी मधील विदयार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. विदयार्थ्यांनी ७५ स्टॉल उभे केले होते. यात इडली सांबर, बटाटे वडा, सामोसे, पॅटिस, पाणीपुरी, भेळ, चहा या खाऊच्या पदार्थासह फळे, पालेभाज्या, फळभाज्या, स्टेशनरी वस्तू, यांचा समावेश होता. यात जवळजवळ २५ हजार रुपयांची उलाढाल झाली. या आनंद बाजाराचे उदघाटन उपळाई (ठो) चे माजी सरपंच विजय ठोंगे व माजी उपसरपंच संदीप बोटे, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खराडे यांचे हस्ते करण्यात आले. या आनंद बाजाराला माजी उपसरपंच सुंदरराव पाटील, आण्णासाहेब लुंगसे, काकासाहेब जामदार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता भोंग, उपाध्यक्ष योगिता सदावर्ते, शाळा नंबर १ चे मुख्याध्यापक पांडुरंग कांबळे त्यांचे सर्व सहकारी शिक्षक, किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक चौधरी सर व त्यांचे सहकारी नितिन काळे, पाटील, सतीश गवळी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, विद्यार्थ्यांचे पालक, गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी भेटी दिल्या. खाऊचा आस्वाद घेऊन खरेदीचा आनंद लुटला. जि. प. प्रा. शाळा नंबर दोनचे मुख्याध्यापक अनिल काळे त्यांचे सहकारी शिक्षक आप्पासाहेब पिंगळे, प्रभाकर काटे, सविता जाधव, रामचंद्र बरचे, आनंद घाडगे, सुवर्णगौरी गवळी, हरिभाऊ दळवी, मीरा गरड, दिपाली गोरे यांनी परिश्रम घेतले.



### पिलीव येथील महालक्ष्मी देवीच्या यात्रेला भक्तिभावात प्रारंभ

**पिलीव, दि. १७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील महालक्ष्मी देवीच्या यात्रेस यात्रा कमीटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील व नम्रतादेवी पाटील यांच्या हस्ते पहाटे महाअभिषेक करून यात्रेस प्रारंभ झाला. यानंतर पिलीव येथील महालक्ष्मी परीसरातील युवकांनी हलदहीवडी येथुन पेटती ज्योत आणली .सध्या मोठ्या प्रमाणात यात्रा भरणयास सुरुवात झाली आहे. मंगळवारी कुस्त्या, बुधवारी गझीढोल, गुरुवारी देवीची रथातून मिरवणूक तर शुक्रवारी महावैदय,बक्षीस वितरण व रात्री छबीना होऊन यात्रेची सांगता होणार आहे.



### साळुबाई सुळेची महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**पिलीव, दि. १७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील साळुबाई सुळे - गोरड हिची नुकतीच महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार प्रियांका मदने यांच्या हस्ते करणयात आला. यावेळी प्रा. संजय पाटील, अतुल नष्टे, विजय मदने,नाथा मदने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### वंचित बहुजन आघाडीतर्फे पत्रकार गायकवाड, जगताप यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी-**

वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट तालुक्याच्या वतीने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणी सदस्य पदी निवड झाल्याबद्दल पत्रकार स्वामीराव गायकवाड तसेच आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार राजेश जगताप यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी वंचित बहुजन आघाडी कडून स्वामीराव गायकवाड व राजेश जगताप यांचा सत्कार करण्यात आला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी पत्रकार स्वामीराव गायकवाड व राजेश जगताप यांच्या सन्मानाबद्दल यावेळी अभिनंदन व्यक्त केले. कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रवी पोटे, पत्रकार नंदकुमार जगदाळे, पत्रकार रमेश भंडारी, वंचित बहुजन आघाडीचे तालुका उपाध्यक्ष बबन गायकवाड, माणिक गायकवाड उपस्थित होते.

# नातेपुते शहर विकास आराखडा वादाच्या भोवऱ्यात

## नागरिकांचा विश्वासघात झाल्याचा आरोप; आरक्षण रद्दचा ठराव बेकायदेशीर

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १७ फेब्रुवारी-**

नातेपुते नगरपंचायतीने लागू केलेला शहर विकास आराखडा वादाच्या भोवऱ्यात असताना नगरपंचायतीकडून प्रशासकीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी आपल्या समस्या अतिशय तीव्र स्वरूपात मांडल्या.

मुख्याधिकारी खांडेकर यांनी प्रशासकीय भूमिका सांगितली असता त्यामध्ये त्यांनी सांगितल की, रस्त्यासाठी जे आरक्षण पडले, त्यासाठी कोणतीही आर्थिक भरपाई मिळणार नाही. त्याचबरोबर जे भूखंड आरक्षित केलेले आहेत. ते नगरपंचायतीने स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी करावयाचे आहेत. नगरपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे का? नागरिकांच्या हरकतीच्या अनुषंगाने नगरपंचायतीमध्ये ३ जानेवारी २०२५ रोजी विषय क्रमांक ५ अन्वये आरक्षण रद्द करण्याचा ठराव करण्यात आला. त्या ठरावामध्ये मुख्याधिकारी खांडेकर हे सांगतात की, हा ठराव बेकायदेशीर आहे, हा ठराव महाराष्ट्र न. प. अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये रद्द होऊ शकतो तशी कायद्यामध्ये कोणतीही तरतूद नाही. हा ठराव करून प्रशासनाला काय सिद्ध करायच आहे? म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल की, घटनेत एखादे कलम वाईट आहे, पण ते जर चांगल्या लोकांच्या हाती पडले तर त्याचे रिझल्ट चांगले येतील. परंतु याउलट घटनेत एखादे कलम वाईट आहे, जर चांगल्या लोकांच्या हातात पडले तर त्याचे रिझल्ट सुद्धा चांगले येतील.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, यांच्याकडे शिवसेनेच्या वतीने जनतेच्या बाजूने सकारात्मक भूमिका घेण्यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे.

**- राजकुमार हिवरकर-पाटील**

वास्तविक पाहता नगरपंचायतीने महाराष्ट्र नगरपंचायत नगर विकास नगर रचना २८ च्या पोट-नियम (४) या कायद्यान्वये सुधारणा करणे, बदल करणे, राजपत्रित करणे अपेक्षित होत. पुणे-पंढरपूर रस्ता सध्याचा १०० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. दहिगाव रोड सध्याचा ६० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. पिरळे रोड सध्याचा २५ फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. पालखी तळाच्या पूर्वेला माऊली मंदिर रोड १० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे, कारण नातेपुते नगरपंचायत अंतर्गत येणारी अखंड बाजारपेठ व नागरीवस्ती उध्वस्त होत असल्याने हा बदल करणे अपेक्षित आहे.

रस्त्यामुळे नागरिकांची घरे, दवाखाने आदी पडझड होत असल्यामुळे अशा ठिकाणचे रस्ते करून कोणाची घरे उध्वस्त होणार नाहीत याची दखल घ्यावी. उमाजी नाईक नगरमध्ये औद्योगिक वसाहत म्हणून टाकलेला झोन रद्द करून निवासी करणे, कत्तलखाने मटन मार्केट रद्द करणे, नवीन विकसित केलेल्या भागांमध्ये रस्ते मोठे करणे किंवा ते आहे तेवढेच ठेवणे, कारण नवीन कलेक्टर एन.ए. असल्याने त्यांना अपेक्षित असणारे रस्ते आरक्षण सदर जागा मालकांनी सोडलेले आहेतच.

त्याचबरोबर नगरपंचायत जेवढे भूखंड खरेदी करू शकते तेवढेच खरेदी करणे किंवा बदलणे अगोदर आरक्षण शासकीय जमिनीवर टाकणे, भूखंड ठरवताना नागरिकांना विश्वासात घेऊन नातेपुते प्रादेशिक योजना हद्द वाढ करून वाढवणे.

कलम २८(४) च्या नियमानुसार नियोजन समिती गठीत करून वर सुनावणी घेऊन कलम २८ (४) व कलम ३० नुसार प्रारूप विकास योजनेतील अपेक्षित बदलानुसार शासनाच्या मंजूरीसाठी पाठवणे अपेक्षित असल्याचे शिवसेना नेते राजकुमार हिवरकर पाटील यांनी नातेपुते येथील पत्रकार परिषदेत सांगितले यावेळी ते पुढे म्हणाले.

### सकारात्मक प्रयत्नांची गरज

३ फेब्रुवारी २०२५ च्या केलेल्या ठरावामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे कदाचित व्यापारी, प्लॉटधारक, खरेदी करणारे, खरीददार, आसपासच्या पंचक्रोशीतून राहण्यासाठी पसंती देणारे नागरिक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण होऊन ते वेगळ्या ठिकाणी जाऊन राहू शकतात. पर्यायांमध्ये बारामती, अकलूज, फलटण या शहरांमध्ये राहण्यास अथवा व्यापार करण्यासाठी जातील असे झाल्यास नातेपुते बाजारपेठेची घोडदौड मंदावणार आहे. यासाठी सकारात्मक प्रयत्नाची गरज आहे.

## उद्योजक अमोल येलमार यांच्याकडून स्वामी विवेकानंद वाचनालयास पुस्तके भेट



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ फेब्रुवारी-**

पुणे येथील उद्योजक व येलमार समाज प्रतिष्ठानचे सचिव अमोल येलमार यांनी श्रीनाथ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था संचालित कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिका मार्फत चालू करण्यात आलेल्या स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयास स्पर्धा परीक्षाची पुस्तके भेट दिली. यावेळी डॉ. हेडगेवार वाचनालयचे अध्यक्ष महेंद्र येलपले हे उपस्थित होते.

ग्रामीण भागात मोफत अभ्यासिका बरोबर स्पर्धा परीक्षा वाचनालय सुरू असून ही चळवळ सर्वत्र पसरली पाहिजे,आणि अश्या वाचनालयाचा फायदा सर्व विद्यार्थी नी घेतला पाहिजे असे मत यावेळी उद्योजक येलमार समाज प्रतिष्ठान चे सचिव अमोल येलमार यांनी व्यक्त केले. श्रीनाथ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्थे च्या माध्यमातून लवकरच महिलांसाठी मोफत अत्याधुनिक व्यायामशाळा सुरू करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीधर येलमार यांनी यावेळी सांगितले. यावेळी गणेश पाटील,माजी उपसरपंच विजय पाटील,आबासाहेब रणखांबे,राहुल लाडे,विजय उलभगत,आदी उपस्थित होते.

## निर्यातक्षम केळीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती : डॉ. पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १७ फेब्रुवारी-**

माळशिरस, माढा, करमाळा, मोहोळ, पंढरपूर या तालुक्यातील केळीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे. यामुळे परकीय चलन शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी केळीचा सिंहाचा वाटा असल्याचे मत आंतरराष्ट्रीय केळी तज्ञ डॉ. के. बी. पाटील यांनी व्यक्त केले.

ते महा केळी पिक परिसंवाद आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्ष स्थानी परादीपचे चिफ जनरल मॅनेजर दिलीप चव्हाण होते. शेतकऱ्यांनी आर्थीक प्रगती साधणयासाठी शास्त्रयुक्त पद्धतीने केळी लागवड करुन पाणी, रासायनिक, सेंद्रिय खतांचे व फवारणीचे नियोजन करुन शेतकऱ्यांनी निर्यातक्षम केळीचे उत्पन्न घ्यावे. सध्या रशिया, इराण, इराक, दुबई, कॅनडा या देशात केळीला मोठी व चांगलि मागणी आहे. येणारा भविष्यकाळ केळी साठी चांगला असल्याचे मत जैन इरिगेशनचे व्हाईस प्रेसिडेंट के. बी. पाटील यांनी विश्वास व्यक्त केला.




## कायदेविषयक सजग असणे काळाजी गरज

### न्या. व्ही. के. मांडे : देगाव मां येथे शिवाजी महाविद्यालयाचे एनएसएस शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१७ फेब्रुवारी-**

सध्या समाजात घडत असलेल्या अन्यायकारक घटना थांबविण्यासाठी कायदेविषयक सजग असणे काळाची गरज बनले आहे, असे प्रतिपादन न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी केले.

संविधान गौरव महोत्सवनिमित्ताने श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा विभागाच्यावतीने देवगाव (मां) येथे विशेष श्रम संस्कार शिबिरातील कार्यक्रमात न्यायाधीश मांडे बोलत होते. याप्रसंगी न्यायाधीश एल.एस. चव्हाण, दिवाणी नायाधीश श्रीमती आर. एम. कंटे, सह दिवाणी न्यायाधीश एस.बी. विजयकर, न्यायाधीश श्रीमती पी.व्ही. राऊत, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, डॉ.बिरा पारसे, ड. संजय कोकाटे, उपसरपंच प्रकाश मांजरे, मुख्याध्यापक बाळासाहेब मोरे, पोलीस पाटील विशाल मांजरे, ग्रामसेवक प्रमोद बाबर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे न्यायाधीश मांडे म्हणाले की, वयोवृद्ध मातापित्याचे संगोपन करण्याची जबाबदारी पाल्याची असते. पण जर पाल्याने वयोवृद्ध मातापित्या सांभाळ केला नाही तर मातापित्यांना पाल्याकडून पोटगी मिळते. कोणताही वाद हा न्यायालयाकडे घेऊन जाण्यापेक्षा आपआपसात मिटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, याचे कारण म्हणजे तुमचा वेळ आणि पैसा याचे नुकसान होणार नाही. तसेच भारतीय राज्यघटना ही जगातील आदर्श अशी राज्यघटना असून या राज्यघटनेप्रमाणे आपले वर्तन असले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी न्यायाधीश एस. बी. विजयकर यांनी पोक्सो कायदा म्हणजेच लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा हा २०१२ साली तयार करण्यात आला आहे. हा कायदा बालकांवरील लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करण्यासाठी आणि अशा घटनातील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी हा पोक्सो कायदा अस्तित्वात आला आहे असे मत त्यांनी मांडले. न्यायाधीश श्रीमती पी.व्ही.राऊत यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध कायदाविषयक माहिती दिली. त्याचबरोबर न्यायाधीश श्रीमती एल.एस. चव्हाण आणि ड. संजय कोकाटे यांनी ही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. प्रास्ताविक ॲड. काकासाहेब गुंड यांनी तर सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे यांनी केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. समाधान लोंढे यांनी आभार मानले.

## चित्रकार अण्णाराव खंडागळे यांना राष्ट्र शिल्पकार पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १७ फेब्रुवारी-**

माढा येथील कलाशिक्षक लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूल, शेटफळ. येथे कार्यरत असणारे अण्णाराव नागनाथ खंडागळे यांचा रोटरी क्लब ऑफ माढा यांच्यावतीने सेवानिवृत्त उपसचिव मंत्रालय सुनील रावडे साहेब यांच्या शुभहस्ते मानाचा फेटा, पुष्पगुच्छ, मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे यांना शिक्षण क्षेत्रातील बारा वर्षाच्या अनुभव आहे.शालेय विद्यार्थ्यांसाठी एलिमेंट्री, इंटरमिजिएट शासकीय ग्रीड परीक्षेचे मार्गदर्शन करणे व शंभर टक्के निकाल लावणे. चित्रकला प्रदर्शन घेणे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींची व्यक्ती चित्रे पेन्सिल शेडिंग माध्यमातून हुबेहूब रेखाटने ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या हातून अनेक विद्यार्थी घडले आहेत. शैक्षणिक व कलाक्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. त्यांना अनेक जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. म्हणूनच त्यांचा रोटरी क्लब ऑफ माढा यांच्या वतीने राज्यस्तरीय राष्ट्र शिल्पकार पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयराज डोंगरे संस्थेचे मार्गदर्शक अजय काका डोंगरे, प्राचार्या फराह शेख, कार्यालयीन अधीक्षक चेतन कोरके, प्रा. दत्तात्रय चव्हाण डॉ. सोमेश्वर टोंगळे, डॉ. सुभाष पाटील, सचिन घाडगे, प्रवीण भांगे, चित्रकार देवेंद्र निम्बर्गीकर दीपक कन्ना, वैभव गायकवाड व शैक्षणिक कला क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.




## नागणसूर येथील प्रचंडे हायस्कूलचे पाच विद्यार्थी पोलीस दलात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**

नागणसूर तालुका येथील एच.जी. प्रचंडे माध्य. व उच्च माध्यमिक प्रशालेतील पाच विद्यार्थी मुंबई पोलिस दलात भरती झाल्याने प्रशालेच्या व बसवलिंगेश्वर कला व क्रीडा प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कृतिका गगोंडा, अंबिका चनकोटी, कावेरी माशाळकर, श्रुधा गुरव या गुणवंत विद्यार्थ्यांचा दहावी व बारावीत प्रथम आल्याबद्दल सत्कार करण्यात आला. काजल गगोंडा, एश्वर्या क्यातकेरी, वाहिद शेख, नागेश नागलगाव, चंद्रकांत मशाळकर हे विद्यार्थी मुंबई पोलिस दलात भरती झाल्याने त्यांचा प्राचार्य शंकर व्हनमाने, बसवलिंगेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. धरेप्पा नागणसुरे, प्रा. सोमशेखर कोनापुरे, भीमाशंकर झळकिकर, गुरूबाई प्रचंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. चिदानंद मठपती यांनी केले.

यावेळी धरेपा नागणसुरे, भीमाशंकर झाळकिकर, संजयकुमार गंगदे, गुरुबाई प्रचंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर प्रा. इरणा धानशेट्टी, प्रा. अनिल इंगळे, शरणपा मणुरे, बसवराज धानशेट्टी, सोमशेखर कळसगोंडा, सुनीता बंदीछोडे, शांतप्पा गगोंडा उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बेबी प्रचंडे, वर्षली सोनटक्के, अजय पाटील, थावरू चव्हाण, विश्वनाथ तळवार, भीमाशंकर सोलापुरे, माणिक किनगी, सागर पोतदार आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विश्वनाथ वाघमोडे, आभार प्रा. प्रशांत नागुरे यांनी मानले.

# जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर सिद्धाराम बनला मुंबई पोलीस

## आई-वडील, भाऊ-बहीण निरक्षर असताना राज्यात नंबर वन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी-**

मुंबईत झालेल्या पोलीस भरतीत पानमंगरुळचा सिध्दाराम मलकण्णा हंगरगी यांनी १५० पैकी १४२ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत पोलीस भरती झाला आहे. आई-वडील, भाऊ-बहीण निरक्षर असताना घरात साक्षरतेचा गंध नसतानाही जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर सिध्दाराम यांनी मुंबई पोलीस भरतीत अव्वल स्थान पटकाविला आहे.

अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ येथील सिध्दाराम मलकण्णा हंगरगी याला शिक्षणाची आवड. घरातले सगळे निरक्षर असताना आपण काहीतरी करू अशा प्रयत्न त्याने बी. कॉमचे शिक्षण पूर्ण केले वडील मलकण्णा दुसऱ्यांचे जनावर राखत होते. आई महादेवी या पडेल ते काम करत, भाऊ बाबुराव भोळसर, बहिण संगिता ही दुसऱ्यांच्या शेतात काम करत. आई, वडील, बहीण यांनी आपला मुलगा भाऊ शिकला पाहिजे यासाठी वाटेल ते काम करून शिक्षणास प्रोत्साहन दिले याचे फळ त्यांना मिळाले. सिध्दाराम हा मागील तीन-चार वर्षापासून पोलीस भरतीसाठी अहोरात्र मेहनत घेत होता, प्रत्येक वेळी एक दोन मार्कांनी हुलकावणी देत होते. परंतु पट्ट्यांनी जिद्द काही सोडला नाही. आर्थिक परिस्थिती हालाखीची असताना त्याला अॅकॅडमी लावणे ही शक्य नव्हते. शेवटी घरातील सर्वांच्या सहकार्याने युवा करिअर अॅकॅडमी शिंगडगाव येथे दाखल झाल्यावर एका वर्षातच त्यांनी झेंडा रोवला तो ही मुंबईत. यंदा मुंबईत झालेल्या पोलीस भरतीत शारीरिक परीक्षेत ५० पैकी ४२ गुण, लेखी ९५ गुण व एनसीसी ५ असे १५० पैकी १४२ गुण मिळवून पानमंगरुळचे नाव केले.

आम्ही उपाशी तपशी राहून मुलाच्या शिक्षणात कुठेही खंड पडू दिला नाही. लोकांच्यात कामाला जाऊन त्याचे शिक्षण पूर्ण केले. याचे फळ आज आम्हाला मिळाले, आज किती आनंद झाला हे शब्दात सांगता येणार नाही.

**- महादेवी हंगरगी, आई**



माझ्याकडून शेतातील व इतर अवजड कामे होत नाहीत. त्यामुळे लोकांचे जनावर राखण्याचे काम करत होतो. आमच्या घरात शिक्षणाचे कोणाला गंध नव्हता. माझा मुलगा पोलीस झाल्याचे ऐकून आनंद द्विगुणीत झाला आहे.

**- मलकण्णा हंगरगी, वडील**

आई-वडील, भाऊ बहिण, मित्र, गुरुंची मदत, आशीर्वाद, जिद्द, चिकाटी व परिश्रमाच्य जोरावर आज ध्येयापर्यंत पोहचल्याचा आनंद झाला आहे. दोन-तीनदा एक दोन मार्कांनी हुलकावणी दिलेल्या परीक्षेत आज राज्यात प्रथम क्रमांकाने पास झाल्याचा आनंद वाटत आहे.

**- सिध्दाराम हंगरगी, पोलीस**

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बार्शी बार असोसिएशनची आज निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**
बार्शी बार असोसिएशनची मंगळवारी दि. १८ फेब्रुवारी रोजी घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि लायब्ररी चेअरमन या पाच पदासाठी एकूण १३ उमेदवार रिंगणात आहेत. अध्यक्षपदासाठी ॲड. रणजीत गुंड व ॲड. संजय साखरे तसेच उपाध्यक्ष पदासाठी ॲड. वैभव देशमुख, ॲड. संभाजी गलांडे, ॲड. विशाल गोणेकर, ॲड. सुकुमार खामगावकर, तसेच सचिव पदासाठी ॲड. दत्तप्रसाद घोगरे, ॲड. इक्बाल पठाण, ॲड. अक्षय पाटील तसेच लायब्ररी चेअरमनपदासाठी ॲड. अमोल अलाट व ॲड. प्रशांत घोडके, खजिनदार पदासाठी ॲड. अक्षय बीडबाग व ॲड. सुरज जामदार हे उमेदवार रिंगणात आहेत. मॅनेजिंग कमिटीच्या चार पदासाठी ॲड. रवींद्र वैद्य, ॲड. नितीन शिंदे, ॲड. धीरज कांबळे तसेच महिला सदस्य म्हणून ॲड. योजना घोलप यांची बिनविरोध निवड झाल्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुनील कुलकर्णी यांनी सांगितले. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. हर्षवर्धन बोधले व ॲड. ज्योतिर्लिंग नवले हे काम पाहत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### बचेरीतील वाचनालयातर्फे पुरस्कार वितरण, गुणगौरव सोहळा

**पिलीव, दि. १७ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील मच्छिंद्रमामा खुर्द वाचनालयात मच्छिंद्रमामा खुर्द यांची ८४ वी जयंती व वाचनालयाचा २५ वा वर्धापन दिन मोठ्या उस्हात साजरा करण्यात आला. पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहेळा पार पडला. यावेळी प्राचार्य संतोषकुम ार शेंडगे, मुख्याध्यापक जगदीश गोडसे उपस्थित होते. सुरुवातीला वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. सदाशिव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजयकुमार पवार, माळशिरस ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विलास कदम, मुख्याध्यापक आश्वीनी शेंडगे, पत्रकार संजय पाटील यांना ग्रंथमित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच बचेरी येथील योजना काटे हिची महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल काजल कोकरे, प्रियांका बरकडे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तसेच बचेरी येथील पहिलि ते चौथीपर्यंतच्या विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विदयार्थीनचा सत्कार करणयात आला. यावेळी सदगुरु साखर कारखान्याचे पिसे, पवार, शशिकांत मोरे, बीभिषण शिकारे, बाबा गोरड, बबन शिंदे, संभाजी कोकरे, नारायण शिंदे, सोनाली गोरड, संगिता शिंदे, अक्षय शिंदे, सागर शिंदे, विजय मदने, सौरभ शिंदे, ओम शिंदे, समर्थ शिंदे, चैतन्य शिंदे, वैभव शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन समर्थ शिंदे यांनी केले तर आभार अस्मिता शिंदे यांनी मानले.



### छावा चित्रपट टॅक्स फ्री करा

**बार्शी शहर छावा संघटनेचे तहसीलदारांना निवेदन**

**बार्शी दि. फेब्रुवारी**
संभाजी महाराजांचा इतिहास हा महाराष्ट्राच्या रघात वाहणाऱ्या रक्तासारखा आहे. पण दुर्दैवाने तो इतिहास काळाच्या ओघात पुसला जातोय. आजच्या पिढीला माहिती नाही की, आपल्या मातीत एक असा राजा होऊन गेला. जो नडला, झुंजला आणि मरण पत्करले पण झुकला नाही. छावा हा केवळ चित्रपट नाही तो आपली मुळे शोधण्याचा प्रयत्न आहे. हा चित्रपट प्रत्येक घरात पोचला पाहिजे, मुलांच्या मनात जागा केली पाहिजे, संभाजी महाराजांचे बलिदान त्यांचा स्वाभिमान यांचे कठोर वास्तव पिढ्यांन पिढ्या जिवंत राहिले पाहिजे. म्हणून हा चित्रपट करमुक्त करावा. तसेच शालेयविद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात हा चित्रपट दाखवा ही विनंती शासनाला केली. यावेळी छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष धिरज शेळके, शहराध्यक्ष निलेश पवार, प्रविण पवार, बजरंग पवार, अतीश थोरात, कालिदास गवळी, राम शिंदे, हनुमंत पवार, सचिन गोडगे आदी उपस्थित होते.

### पिलीव येथील ओंकार फलके याची मृदा व जलसंधारण अधिकारीपदी नियुक्ती



**पिलीव, दि. १७ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ओंकार प्रकाश फलके याने २०२४ मध्ये महाराष्ट्र शासना मार्फत घेणयात आलेल्या सरळ सेवा भरती परीक्षेत पहील्याच प्रयत्नात मृदा व जलसंधारण अधिकारीपदाला गवसणी घातली आहे. ही क्लास दोनची पोस्ट आहे. यामध्ये मृदा व जलसंधारण विभागा अंतर्गत जलसंधारण क्षेत्रातील विविध उपक्रम राबविणे, पाणलोट कार्यक्रमाचे व्यवस्थापन व देखरेख करणे,शेतकरी, जमीनमालक, समाजातील सदस्यांसाठी मृदा व जलसंधारणाच्या महत्व सांगुन जागरुकता निर्माण करणे,वारंवार उदभवणाऱ्या दुषकाळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी उपाययोजना करणे अशा कामांचा समावेश होतो.ओंकारचे आई-वडील हे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ओंकराच्या या यशाबद्दल पिलीव परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवराकडून या यशाबद्दल अभिनंदन व कौतुक होत आहे.

### शितल वाघमारे यांची महसूल सहाय्यकपदी निवड



**करमाळा, दि. १७ फेब्रुवारी-**
पांगरे (ता. करमाळा) येथील शितल सुनिल वाघमारे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत महसूल सहाय्यक पदी निवड झाली. याबद्दल पांगरे गावातील माजी उपसरपंच चंद्रकांत पाटील, आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि आदिनाथ नगरचे माजी प्रशासकीय संचालक संजय गुटाळ, प्रगतशील बागायतदार भारत टेकाळे, वि. का. सो.संचालक गहिनीनाथराजे गुंजाळ, आमदार गटाचे नेते पिंटू पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. शितलचे सर्व शिक्षण नु. म. वि. मुलीची शाळा पुणे येथे झाले. सातत्य, परिश्रम व योग्य नियोजनामुळे यश प्राप्त झाले.

# अंत्यविधीसाठी पाच हजारांचा सहाय्यता निधी

## समर्थ नगरी परिवार राज्यभर राबविणार उपक्रम; गरजवंतांना मिळणार आधार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी-**
वाढती महागाई पाहता काही कुटुंबांकडे मयत झालेल्या व्यक्तीचे अंत्यविधी करण्याकरितादेखील पुरेशी रक्कम नसते. अशा कुटुंबाला समर्थ नगरी परिवाराच्या माध्यमातून स्वामी कृपा निधी म्हणून मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराकरिता पाच हजार रुपये सहाय्यता देण्याचा उपक्रम जाहीर करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ प्रकट दिनी ३१ मार्चपासून राज्यभरामध्ये ही योजना लागू करण्याचा निर्णय संस्थेच्या वतीने घेण्यात आला. ही गोष्ट समाधानकारक असून सम र्थ नगरीच्या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्री स्वामीभक्त चोळपा म हाराजांचे वंशज वे. शा. सं. अण्णू महाराज यांनी केले. अक्कलकोटसह राज्यभरामध्ये



श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे व स्वामीभक्त चोळप्पा महाराज यांचे वंशज वे. शा. सं. अण्णू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ नामप्रसाराची सेवा करणाऱ्या सम र्थनगरी प्रतिष्ठानच्या अक्कलकोट येथील कार्यालयाचे शुभारंभ शनिवारी करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रम जाहीर करण्यात आला.

यावेळी अण्णू महाराज बोलत होते.

> **पाच ठिकाणी होणार शुभारंभ**
> स्वामी प्रकट दिनाच्या दिवशी या योजनेचा शुभारंभ अक्कलकोट, पुणे, इंदापूर, बारामती, कोल्हापूर व रत्नागिरी या पाच ठिकाणी शुभारंभ करण्याचे नियोजन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.
> **- सैदप्पा इंगळे, संस्थापक अध्यक्ष**

> समर्थ नगरीच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेली योजना पुण्यप्राप्तीची योजना आहे. यामध्ये गरजवंतांना आधार मिळतो. ज्यांना दानधर्म करावयाचे आहे, अशा लोकांना योग्य मार्गाने दान करण्याची संधी मिळते. म्हणजे गरजवंतांना लाभदायी व दानशूरांना फलदायी ठरणारी योजना आहे.
> **-प्रथमेश इंगळे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान**

याप्रसंगी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे युवा प्रतिनिधीत्व प्रथमेश इंगळे व समर्थ नगरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. मनोहर मोरे, चंद्रप्रकाश उदगिरी, राहुल होटकर, कुमार पतंगे, घाटगे, राजू माशाळे, राजू एकबोटे, ओंकार पाठक, भीमराव धडके, सुभाष तारापुरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी हरित शाळा उदयास आणा

## झुआरी सिमेंट कंपनीचे प्रमुख प्रकल्प अधिकारी दीपक कक्कर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ फेब्रुवारी-**
मुलांना लहानपणापासूनच स्वच्छतेच्या आणि पर्यावरण संवर्धनाच्या सवयी लागाव्यात म्हणून उपलब्ध पाण्याने आपली शाळा 'हरित शााळा' म्हणून उदयास आणा असे मत झुआरी सिमेंट कंपनीचे प्रमुख प्रकल्प अधिकारी दीपक कक्कर यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत झुआरी सिमेंट कंपनीच्या सीएसआर फंडाच्या माध्यामातून बोअरवेल लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी दीपक कक्कर हे बोलत होते. यावेळी झुआरी सिमेंट कंपनीचे एचआर हेड शिवाजी चौगुले, एचआर अमोल जाधव, विनायक झिंगाडे, मुख्याध्यापक विश्वनाथ बिराजदार, मुख्याध्यापक यशवंत पाटील उपस्थित



होते. पुढे बोलताना दीपक कक्कर म्हणाले की, निसर्गाबद्दल उत्सुकता, जागरुकता निर्माण करणारा हा विषय केवळ पुस्तकांद्वारे शिकता येत नाही. विद्यार्थ्यांना पुस्तकी माहितीबरोबरच शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणाची जाण व्हावी, त्याची काळजी घेण्याची लहानपणापासूनच सवय लागावी आणि ते पर्यावरणाच्या अधिक जवळ जावेत म्हणून 'हरित शाळा'उपक्रम हाती घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी झुआरी सिमेंट कंपनीचे एचआर हेड शिवाजी चौगुले म्हणाले की, पाणी हे जीवन आहे. पाणी पृथ्वीवरील सर्वात महत्त्वाची संपत्ती आहे. संपूर्ण सजीव सृष्टीची उत्पत्ती पाण्यामुळे झाली आहे. सजीवांच्या जीवनात प्राणवायू व पाणी यांना जास्त महत्त्व आहे. म्हणूनच पाण्याचे वापर काटकसरीने करण्याचे आवाहन यावेळी केले. सूत्रसंचालन सिध्दाराम चौधरी तर आभार मुख्याध्यापक विश्वनाथ बिराजदार यांनी मानले.

# वाळू वाहतूक टिप्परच्या धडकेत एक ठार, एक जखमी

## अरणजवळ अपघात; दुचाकीस दहा मीटर फरफटत नेले

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १७ फेब्रुवारी-**
वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीस धडक दिल्याने मोडनिंब (ता.माढा) येथील दिनेश खडके (वय ३४) हा तरुण जागीच ठार झाला. तर पाठीमागे बसलेले धनाजी बागल (वय ४७, रा. कुर्दुवाडी हे डोक्यास मार लागून गंभीर जखमी झाले.



रविवारी (ता. १६) सकाळी अकराच्या सुमारास अरण (ता. माढा) येथे हा अपघात घडला. सोलापूर पुणे महामार्गावर अरण गावाजवळ तुळशी फाटा येथे दुचाकीवरून (एम. एच. ४५ ए. के. २५७७) दोघे तरुण टेंभूर्णी येथे जात असताना तुळशीकडून येणाऱ्या वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीस समोरून जोरदार धडक दिली. टिप्परच्या अति वेगाने दुचाकीस जवळपास दहा मीटर फरफटत नेले. यात दिनेश खडके याच्या अंगावरून टीपरचे चाक गेल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. पाठीमागे बसलेले धनाजी बागल हे जखमी झाले. अपघातातील जखमीस वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिकेमधून डॉ. गोरखनाथ लोंढे आणि रुग्णवाहिका चालक श्री. सागर फाटे यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.



# समरसता साहित्य परिषदेतर्फे अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांना भारत सरकारच्या वतीने पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र सोलापूर शाखेच्या वतीने अक्कलकोट रोड येथील मणीधारी सोसायटी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सल्लागार प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. माधव कुलकर्णी, महिला आयाम प्रमुख वसुंधरा शर्मा-कुलकर्णी, कार्यवाह कविवर्य देवेंद्र औटी, युवती आयाम सहप्रमुख श्रद्धा रोडगे, सांस्कृतिक आयाम प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार, पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष जगन्नाथ हुक्केरी, झी कन्नड सारेगमप लिटल चॅम्प्स फायनललिस्ट रेवणसिद्ध फुलारी, शरणप्पा फुलारी, काशिनाथ बिराजदार, सहकार्यवाह दिनेश मडके, अनिता कुलकर्णी, शुभांगी पुजारी, अर्णव कुलकर्णी यांच्यासह विविध आयाम प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा. धन्यकुमार बिराजदार, प्रा. माधव कुलकर्णी, देवेंद्र औटी यांनी मनोगत व्यक्त करत अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या साहित्यिक प्रवासाची प्रशंसा केली. ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक दशरथ वडतिले यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. रेवणसिद्ध फुलारी व श्रद्धा रोडगे यांनी अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्यावर रचलेल्या गीतांचे गायन केले.

# करमाळ्याच्या किंडरजॉय स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात चिमुकल्यांची धमाल



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १७ फेब्रुवारी-**
करमाळा शहरातील किंडरजॉय प्री-प्रायमरी सीएससी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

अथर्व मंगल कार्यालयात झालेल्या या स्नेहसंम लनात अनेक लहान मुलांनी धमाल उडवून दिली. या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे प्रा. गणेश करे-पाटील, माजी प्राचार्य जयप्रकाश बिले, मुख्याध्यापिका असादे, ग्राहकमंच करमाळाचे अध्यक्ष नरोटे, डॉ. शेलार, डॉ. भोसले, स्वाती फंड, संस्थेचे अध्यक्ष धनराज कांबळे, सचिव मुख्याध्यापिका राजश्री कांबळे उपस्थित होते. यावेळी करे-पाटील यांनी या बाल विद्यालयाच्या सर्वगुणसंपन्न कार्याची विशेष दखल घेतली तर जयप्रकाश बिले यांनी करमाळ्यातील हे स्कूल एक आदर्श असल्याचे मत नोंदवले. आभार अध्यक्ष धनराज कांबळे यांनी मानले.

या वार्षिक स्नेहसंमेलनात छोट्याछोट्या मुलांनी जुन्या नव्या रिमिक्स गाण्यावर आपली कला सादर केली. यात कोळीगीते छत्रपती शिवाजी महाराज यांची थोरवी गाणारी गीते, देशभक्तीपर गीते व पारंपारिक गीतांनी उपस्थित पालकांची मने जिंकली. या सर्व विद्यार्थ्यांना कुमारी सिद्धी कदम यांनी योग्य प्रशिक्षण देऊन रंगमंचावरती आत्मविश्वासपूर्वक उभा केले होते. सूत्रसंचालन प्रा. नंदकिशोर वलटे यांनी केले. मुख्याध्यापिका कांबळे यांच्याकडून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

# अभिमानास्पद! मोटेवाडीमधील मेंढपाळाच्या मुलाने वर्षात काढल्या चार पोस्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १७ फेब्रुवारी-**
समोर अनेक आव्हाने.. वडिलांनी भरपूर कष्ट सोसलेले.. आता परिस्थिती बदलायची व वेगळं काहीतरी करून दाखवायचे अशी मनाशी खूणगाठ.. त्यातून सुरु झाली प्रयत्नांची पराकाष्ठा.. अन् थेट एका वर्षात ४ जागेवर निवड.. ही यशोगाथा आहे मोटेवाडी माळशिरस येथील सोमनाथ मधुकर दडस यांची.

माळशिरस तालुक्यातील मोटेवाडी माळशिरस येथील सोमनाथ मधुकर दडस,यांची घरची परिस्थिती बेताची. पाच एकर शेती त्यावर कुटुंबाची गुजराण



> ग्रामीण मुलांना स्पर्धा परीक्षेत मोठी संधी आहे. प्रयत्नांत सातत्य ठेवल्याने मला यशपर्यत पोहोचता आले. आई-वडील, भाऊ कुटुंबातील सदस्य म झ्या पाठीशी ठाम उभे राहिल्यानेच मला यश मिळवता आले.
> **- सोमनाथ दडस, मोटेवाडी, माळशिरस**

.कुटुंबाला हातभार लागावा, म्हणून पारंपरिक मेंढीपालन, कधी उसतोड असे विविध व्यवसाय करून वडिलांनी शिक्षण पूर्ण केली. सोमनाथ दडस यांनी प्राथमिक शिक्षण जि. प. शाळा पालवेवस्ती येथे,५ वी ते १० वी शिक्षण क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले विद्यालय माळशिरस, अकरावी, बारावी शिक्षण शेतकी महाविद्यालय फलटण येथे बी. एससी अॅग्री सोनाई कृषी महाविद्यालय येथे तर एम. एस. सी अॅग्री कृषी महाविद्यालय परभणी येथे पूर्ण केले.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, अपेक्षित नोकरी मिळत नव्हती. मित्रांच्या सोबतीने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास पुणे येथे सुरू केला. या परीक्षेविषयी काहीही माहिती नसताना केवळ धाडस दाखवत आपण स्पर्धा परीक्षेला सामोरे गेल्याचे सोमनाथ सांगतात. दोन वर्षे अभ्यासावर लक्ष केंद्रित करीत २०२४ मध्ये कनिष्ट लिपिक, डिसेंबरमध्ये ग्रामविकास अधिकारी, तर फेब्रुवारी २०२५ मध्ये महसूल सहाय्यक, कर सहाय्यक या दोन्ही पोस्ट सलग निघाल्या. घरात कुठलाही शिक्षणाचा वारसा नसताना केवळ जिद्द अन आत्म विश्वासाच्या जोरावर सोमानाथ यांनी हे यश मिळविले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेल्या यशाबद्दल सोमनाथ दडस यांचे कौतुक होत आहे.

CMYK

धाराशिव

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गोवंशीय जनावरांचे मांस वाहतूक; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोवंशीय जनावरांचे कत्तल केलेले संशयित मांस वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस अटक केली आहे. धाराशिव शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास १४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ११.४५ वाजता प्रथमेश हॉटेलजवळ, सोलापूर-धुळे महामार्गाच्या बाजूला संशयास्पदरीत्या एक टाटा एलपीटी वाहन उभे असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार, पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपासणी

केली असता, सदर वाहन क्रमांक एमएच ४२/१०३३ मध्ये अंदाजे चार टन गोवंशीय मांस आढळून आले.

याची किंमत सुमारे ८ लाख रुपये असल्याचे प्राथमिक अंदाजानुसार समोर आले आहे. वाहनासह एकूण जप्त मुद्देमालाची किंमत १६.८५ लाख रुपये इतकी आहे.

या प्रकरणात समीर महेमुद कुरेशी (वय ३२, रा. खिरणी मळा, धाराशिव) याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याविरोधात महाराष्ट्र प्राणी

संरक्षण अधिनियम १९९५ मधील कलम ५(अ), ५(ब), ५(क) आणि ९(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे काळाची गरज : आ. कैलास पाटील



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१७ फेब्रुवारी -**

विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव देणे काळाजी गरज असल्याचे मत आ. कैलास पाटील यांनी व्यक्त केले. तालुक्यातील भोगजी येथील कै. पवनराजे निंबाळकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सार्वजनिक व्यक्तिमत्व विकासला चालना देण्यासाठी विविध गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी सरपंच वसंत आबा खराटे होते.या कार्यक्रमांमध्ये आ. कैलास पाटील यांनी विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला व ग्रामीण भागामध्ये इंग्रजी व सेमी इंग्रजीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थतच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबवित असलेबाबत संस्थेचे अध्यक्ष सचिव यांचे अभिनंदन करून सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद धाराशिव चे उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे, शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी यरमनवाड, माळी संतोष, गुरव, सचिन काळे, विश्वजीत जाधव, बालाजी अडसूळ, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, महादेव खराटे, सुनील लुगडे, बालासाहेब चौधरी, दिगंबर डाके, सरपंच ज्ञानेश्वर तांबडे, आशाताई आश्रुबा बिक्कड, मंगल श्रीपती, लंकाबाई सर्जेराव, अडसूळ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदास चौधरी, उपस्थित होते.

कार्यक्रमांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी गीत, देशभक्तीपर गीत अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल झाली. कार्यक्रमासाठी पालक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमेश पालकर, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रामहरी खराटे व दोन्ही शाळेचे सर्व शिक्षक वृंद कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पीसीपीएनडीटी जिल्हा सल्लागार समितीची बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**



गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र लिंगनिवडीस प्रतिबंध (पीसीपीएनडीटी) जिल्हा सल्लागार समितीची बैठक जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयात आज १७ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्यातील सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांवरील देखरेख, कायद्याची अंमलबजावणी तसेच जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर वाढवण्यासाठीच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीत संशयित सोनोग्राफी केंद्रांवर डिकॉय कारवाई करणे, तिमाही तपासणी करण्यासह जिल्हा व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या पीसीपीएनडीटी कायद्याच्या खटल्यांचा आढावा घेण्यात आला. तसेच नवीन सोनोग्राफी व सिटीस्कॅन केंद्रांना परवानगी देणे आणि पाच वर्षे पूर्ण झालेल्या केंद्रांचे नूतनीकरण करण्याच्या विषयावरही चर्चा झाली.

जिल्ह्यातील मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढवण्यासाठी समिती सातत्याने कार्यरत आहे.

दर दोन महिन्यांनी सल्लागार समितीची बैठक आयोजित करून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाते.

तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करून जनजागृती केली जात आहे. बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी, वरिष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ आय.के. मुल्ला, पीसीपीएनडीटी नोडल अधिकारी डॉ. दत्तात्रय खुणे, आयएमए अध्यक्ष डॉ. महेश कानडे, डॉ. अदिनाथ राजगुरू, जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. देशमुख, तेजस्विनी महिला बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष नंदा पुनगुडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

अवैध गर्भलिंग निदान किंवा गर्भपात प्रकरणांची माहिती नागरिकांनी पीसीपीएनडीटी सेल, जिल्हा रुग्णालय धाराशिव, उपजिल्हा रुग्णालय किंवा ग्रामीण रुग्णालय येथे द्यावी.

तसेच टोल-फ्री क्रमांक १८००२३३४४७५/१०४ गोपनीय माहिती दिली जाऊ शकते. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल आणि माहिती खरी असल्यास राज्य सरकारकडून एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. धनंजय चाकुरकर यांनी केले.

# शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नळदुर्गमध्ये किल्ल्याची स्वच्छता

**स्वच्छता मोहिमेत संगणक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ फेब्रुवारी -**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. (एम.के.सी.एल.) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने व एम.के.सी.एल. चे जिल्हा समन्वयक धनंजय जवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१७ फेब्रुवारी रोजी नळदुर्गच्या ऐतिहासिक व प्राचिन किल्लयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानामध्ये संगणक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

प्रारंभी नळदुर्ग येथील सतीश पुदाले, बालाजी सुरवसे, बाबा, शिवराज गळाकाटे (उमरगा), अभिजित राऊत, दत्तात्रय पांचाळ, नवले, मनोहर पाटील हे विद्यार्थ्यांसह नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयातील उपली बुरुजासमोर एकत्रित जमा झाले होते. याठिकाणी पत्रकार विलास येडगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी जय भवानी, जय शिवाजी प्रचंड जयघोष केला. या घोषनांनी किल्ला परीसर दणाणुन गेला होता. या उपक्रमामध्ये नळदुर्ग येथील शिवम कॉम्पुटर एज्युकेशनचे सतीश पुदाले, पुनम बिसेनी, सानिका महाबोले,



अदिती बेले, तृप्ती गायकवाड, आकांक्षा चव्हाण, ऐश्वरया सुरवसे, प्रणिता भोसले, पंकज सुरवसे, दीपक टकले, सुरज गायकवाड, शरण इब्रामपुर यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील श्री साई कंप्युटर, हरी इन्फोटेक उमरगा, समर्थ कंप्युटर बलसुर, समर्थ कॉम्पुटर नळदुर्ग, सुपर कॉम्पुटर अणदुर, विशाल कॉम्पुटर येणेगुर, अभिनव कॉम्पुटर उपळे, राजीव कॉम्पुटर, अष्टभुजा स्किल तुळजापुर, समर्थ कॉम्प्युटर तुळजापुर, ग्लोबल इन्फोटेक जे.बी. कॉम्प्युटर तुळजापुर यांच्यासह इतर सेंटरचे २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. यानंतर स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उपली बुरुज तसेच बुरुजासमोरील परीसर, पाणीमहाल, बारादारी, रंगमहाल, हुलमुख दरवाजा,व किल्लयाचा प्रवेशद्वार या भागातील कचरा जमा करण्याबरोबरच उगवलेले गवत उपटुन काढणे तसेच प्लास्टिक कचरा जमा करून ऐतिहासिक वास्तुतील हा परीसर स्वच्छ केला आहे.

सारथी आणि एमकेसीएलच्या माध्यमातुन किल्ले स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जपणुक या उपक्रमाद्वारे नवीन पिढीला किल्ले तसेच आपल्या जाज्वल्य इतिहासाबद्दल माहिती मिळावी आणि यातुनच या किल्लयांची वारसा जपण्याची जबाबदारी त्यांना कळावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधुन ऐतिहासिक किल्लयांमध्ये हा किल्ले स्वच्छतेचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला असल्याचे नळदुर्ग येथील शिवम कॉम्प्युटरचे सतीश पुदाले यांनी म्हटले आहे.

## सुबोध विद्यामंदिर शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१७ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील सुबोध विद्यामंदिर शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. तसेच यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरणाचा देखील कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक कांतीलालजी बोराणा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किशन ठाकूर, सेवानिवृत्त शिक्षक बलभीम खामकर यांची उपस्थिती लाभली होती. डॉ. ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून दहावीच्या परीक्षेबद्दल तसेच दहावीनंतर पुढे काय करायचे याचे मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त शिक्षक खामकर व मुख्याध्यापक दत्तप्रसाद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक इयत्ता आठवीची विद्यार्थिनी राशी खोत व अनुष्का सरवदे या विद्यार्थिनींनी केले.

## श्रीसंत नरहरी महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ फेब्रुवारी -**



परमेश्वरावर निष्टा कशी असावी याची शिकवण नरहरी महाराज यांनी समाजाला दिली, असे प्रतिपादन बाळुमामा सेवक हभप मेजर विक्रम जगताप यांनी श्रीसंत नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त शनिवार (दि.१५) रोजी आयोजित किर्तन सेवेच्या माध्यमातून केले.

सुवर्णकार समाजातील थोर संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७३९ वा पुण्यतिथी कार्यक्रम सराफ व्यापारी मनोज चिंतामणी यांच्या मातोश्री निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. शनिवारी सकाळी ७ वाजता नरहरी महाराज व प्रज्ञानानंद स्वामी महाराज यांच्या पादुकास अभिषेक करण्यात आला. त्यानंतर १०.३० ते १ पर्यंत किर्तनसेवा आयोजित करण्यात आली. यावेळी उपविभागिय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ, पोलीस निरिक्षक विनोद इज्जपवार, माजी सभापती दत्ता साळुंके, भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, हभप. बालाजी महाराज बोराडे, माजी नगरसेवक मकरंद जोशी आदीची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज चिंतामणी, सागर लंगोटे, नितीन महामुनी, श्रीकांत पोतदार, गोकुळ पंडित, नानासाहेब दिक्षीत, अनिल पेडगावकर, मयुर बेदमुथा, दशरथ शहाणे, मिलिंद चिंतामणी, दिपक दिक्षित, संतोष नष्टे, मनोज शहाणे, भगवान शहाणे, प्रमोद वेदपाठक आदीनी परिश्रम घेतले. याप्रसंगी सोनार व इतर समाजातील महिला मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी पुढे म्हणाले की, संत नरहरी महाराज हे शिवभक्त होते त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा देण्याचे महान कार्य केले. देवावर निष्टा व भक्ती कशी असावी याची शिकवन महाराजानी सुवर्णकार तसेच श्रीसंत बाळुमामानी इतर समाजाला योग्य दिशा देण्याचे महान कार्य केले. यावेळी दुपारी १ वाजता श्रीसंत नरहरी महाराज यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

# सुशिलाबाई शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांचे निधन

**अंत्यसंस्कारासाठी हजारोंची उपस्थिती...**



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१७ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. डॉ शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुशीलाबाई शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी लातूर येथे रुग्णालयात उपचार घेत असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्या ८८ वर्षाच्या होत्या. सोमवार दि.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी सिंदखेड रोडवरील शेतात त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत सुशीलाबाई यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी विविध विभागाचे शासकीय अधिकारी, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नेते, महाराष्ट्र शिक्षण समिती अंतर्गत असलेल्या विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विविध संस्था संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, पत्रकार, वकील, डॉक्टर, आजी माजी नगराध्यक्ष ,नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आजी माजी अध्यक्ष, सदस्य यांच्या सह लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संचालक अशोक गोविंदपूरकर, डि.एन. दादा शेळके, प्रतिभाताई पाटील कव्हेकर, अभय सोळुंके, डॉ. अरविंद भातांब्रे, सिद्धेश्वर बँकेचे संचालक अरविंद लातूरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, उस्मानाबाद काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश आष्टे, निलंगा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोपान अकेले, विनोद आर्य, अविनाश रेशमे, हमीद शेख, बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, नरसिंग बिरादार, डॉ. सतीश हंडरगुळे यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.



मयत सुशीलाबाई यांच्या पार्थिवास कनिष्ठ चिरंजीव विजय पाटील-निलंगेकर यांनी अग्नी दिली. यावेळी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर, माजी खासदार रूपाताई पाटील-निलंगेकर, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, डॉ. शरद पाटील निलंगेकर यांच्यासह निलंगेकर परिवारातील सदस्य, नातेवाईक मित्र परिवार, विविध पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मयत सुशिलाबाई निलंगेकर यांच्या पश्चात तीन मुले, एक विवाहित मुलगी, सुना नातवंडे, जावाई असा परिवार आहे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, डॉ. शरद पाटील निलंगेकर, महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या त्या आई तर माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर यांच्या सासू व माजी कॅबिनेट मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या त्या आजी होत.

निलंगा शहरातील सर्व व्यापाऱ्याने सोमवारी दिवसभर आपले व्यवसाय व दुकान बंद ठेवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# न्यायालयामुळे पक्षकारांची २५ किलोमीटर जाण्याची पायपीट थांबली : न्यायमूर्ती पेडणेकर

**तुळजापूरात दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालयाचे उद्‌घाटन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ फेब्रुवारी -**

येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या न्यायालयाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण रामनाथ पेडणेकर यांच्या हस्ते रविवारी दि.१६ झाले. याप्रसंगी प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश धाराशिव राजेश गुप्ता हे अध्यक्षस्थानी होते. तसेच विधीज्ञ मंडळ अध्यक्ष ॲड. दत्तात्रय घोडके , सचिव ॲड. नीलकंठ वट्टे, नवनियुक्त दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तुळजापूर माननीय स्वाती अवसेकर या उपस्थित होत्या.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरूण पेडणेकर उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयामुळे पक्षकारांची सोय होणार आहे. तसेच आर्थिक भार ही पक्षकारांचा कमी होणार आहे. विधीज्ञांनी प्रकरणे तातडीने चालवावीत असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोप जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश गुप्ता यांनी केला. या न्यायालयामुळे पक्षकारांची २५ किलोमीटर जाण्याची पायपीट थांबलेली आहे. तुळजापूर येथील नागरिकांना पाच लाख पेक्षा जास्त मूल्यांकन असणाऱ्या दाव्यासाठी धाराशिव येथे प्रकरणे दाखल करावी लागत होती. परंतु त्याच न्यायालयाची स्थापना तुळजापूर येथे झाल्याने नागरिकांवर पडणारा आर्थिक भार व तुळजापूर पासून पुढे २५ किलोमीटर धाराशिवला जाण्याची पायपीट थांबली आहे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर धाराशिव येथे तुळजापूर तालुक्यामधील जवळपास १५३० प्रकरणी चालू होती. ती सर्वप्रकरणी यापुढे तुळजापूर येथील न्यायालयात चालणार आहेत. तसेच भूसंपादन संदर्भ शासन पक्षकार असलेले सर्व प्रकरण अशी बरीच प्रकरणे तुळजापूर येथे यापुढे चालणार आहेत. सदर



न्यायालयाचे उद्घाटन पालक न्यायमूर्ती तथा न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई अरुण रामनाथ पेडणेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. दत्तात्रय घोडके यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. संजय मैंदर्गी यांनी केले. तसेच सर्वांचे आभार हे दिवाणी न्यायाधीश क स्तर मिलिंद निकम यांनी केले. यावेळी कार्यक्रमास जिल्हाभरातील विधींनी मंडळाचे सर्व अध्यक्ष व पदाधिकारी तथा विधीज्ञ तुळजापूर न्यायालयातील विधीज्ञ उपस्थित होते.

## तात्यारावजी मोरे महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन क्रीडा महोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ फेब्रुवारी -**

भारत शिक्षण संस्था संचलित तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम धरोहर २०२५ या नावाने उत्साहात संपन्न झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कवलजित बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेल्या धरोहर २०२५ सलग दहा दिवसापासून सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात क्रिकेट, बँटमिटन, कबड्डी, बुद्धिबळ कॅरम, रस्सीखेच, गोळा फेक, तसेच मैदानी खेळ घेण्यात आले. तसेच सामाजिक विषयावर प्रबोधनात्मक नाटक, नृत्य, लावणी, वेशभूषा, स्पर्धा घेण्यात आल्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सवाचा धरोनोहर २०२५ चा समारोप झाला, यावेळी कार्यक्रमाचे अधक्ष श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड चे मुख्याध्यापक विराज मोरे, सोबत नितीन राठोड हे होते.

यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रशांत माने, डॉ. गणेश केशवसेट्टी, प्रा. अंकूश तरमुडे प्रा. अभिलाषा प्रा. धृती माने हांडे उपस्थीत होते. प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वृषाली पाटील यांच्या पुस्तकांची लातुरात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** वृषाली पाटील यांनी कादंबरी आणि काव्यसंग्रहातून सकारात्मक समाजाची बांधणी व्हावी यासाठी लेखन केले आहे. मानवी जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नांची चर्चा करताना सहजतेने ते प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी त्या आपल्या कादंबरी आणि काव्यसंग्रहातून मार्ग दाखवितात, असे मत वृषाली विक्रम पाटील लिखित प्रौढ कादंबरी स्मृतिछटा, काव्यसंग्रह ऋतूरंग आणि बाल काव्यसंग्रह जग आमचे सप्तरंगांचे या तीन पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

वृषाली पाटील लिखित तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा शनिवारी भालचंद्र ब्लड बँक सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार अजय पांडे हे होते तर भाष्यकार म्हणून लेखक आणि व्याख्याते डॉ.राजशेखर सोलापुरे, समीक्षक आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्रीय कार्यकारणीचे सदस्य डॉ. जयद्रथ जाधव, साहित्यिक धनंजय गुडसुरकर, बालसाहित्य समीक्षक प्रा.रामदास केदार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी स्मृतिछटा या कादंबरीवर बोलताना डॉ.राजशेखर सोलापुरे म्हणाले की, वृध्दाश्रमाच्या विकृतीला नाकारत, मानवी नातेसंबंधात सुखद स्मृतींची संस्कृती निर्माण करण्यासाठी 'स्मृतिछटा' ही कांदबरी आग्रह धरते. आपल्या भोवतालच्या माणसांचं जगणं सहज व सुंदर व्हावे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची प्रेरणा ही कादंबरी देते. स्मृती आणि विस्मृती माणसाला मिळालेली देणगी आहे. या देणगीतून माणसाने जगण्याची नवी रीत निर्माण करावी तरच द्वेषाची दलदल नष्ट होईल. प्रेमाचा ओलावा हा जगण्यातील सर्व समस्यांवरील उत्तम तोडगा आहे, हे ही कादंबरी अभिव्यक्त करते. यावेळी डॉ.जयद्रथ जाधव यांच्यासह अनेकांनी मार्गदर्शन केले.



### संक्षिप्त वृत्त...

## अज्ञाताने पळविली दुचाकी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** चक्कर आल्यासारखे वाटल्याने रस्त्याच्या बाजूस दुचाकी उभी करुन थांबले असता अज्ञाताने ती मोटारसायकल पळविल्याची घटना लातूर-बार्शी रोडवरील अंकोली पाटीजवळ घडली. या प्रकरणी गातेगाव पोलिसांत शुक्रवारी गुन्हा दाखल आहे.

लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील बालाजी बळीराम घोडके हे बार्शी- लातूर रस्त्यावर निघाले होते. दरम्यान, त्यांना चक्कर आल्यासारखे वाटले. त्यामुळे त्यांनी अंकोली पाटी येथे रस्त्याच्या बाजूस दुचाकी (एमएच २४, बीएस ४३०९) उभी केली. दरम्यान, अज्ञात चोरट्याने ही मोटारसायकल पळविली. तिची किंमत ७४ हजार रुपये आहे. या प्रकरणी बालाजी घोडके यांच्या फिर्यादीवरून गातेगाव ठाण्यात शुक्रवारी गुन्हा नोंद आहे.

## 'जीएसटी'च्या माहितीसाठी चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** जीएसटी कायद्याच्या माहितीसाठी येथील केंद्रीय जीएसटी रेंज कार्यालयात शुक्रवारी चर्चासत्र झाले.

यावेळी आयसीएआयचे पदाधिकारी राहुल धरणे, महेश तोष्णीवाल, लातूरच्या कर सल्लागार समितीचे अध्यक्ष सचिन पतंगे, लातूर शहर रेंजचे अधीक्षक राजकुमार सिंह यांची उपस्थिती होती. यावेळी जीएसटीसंदर्भात माहिती देण्यात आली. सूत्रसंचालन जीएसटी लातूर ग्रामीण रेंजचे अधीक्षक प्रशांत देशपांडे यांनी केले. यशस्वीतेसाठी राहुल मीना, निरीक्षक निलेश पोटे यांनी सहकार्य केले.

## रॉंग साईडने येऊन दिली धडक; एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** घरणी येथील गोरखनाथ वडजे यांचा भाच्चा एमएच ३५, एक्स २९९० क्रमांकाच्या दुचाकीवरून आष्टा टोलनाक्याकडे कामाला जात होता. तेव्हा रॉंग साईडने येऊन एका कारने त्याला धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला. ही घटना घरणी ग्रामीण आयटीआयसमोर घडली. याप्रकरणी चाकूर पोलिस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.बी.पी.बंडगर यांनी मानवतावादी संत,भारतीय सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील सुधारक,गोरबंजारा समाजातील थोर संत,क्रांतिसिंह श्री.संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्या शुभेच्छाही दिल्या.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, पर्यवेक्षक डॉ.संध्या वाडीकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## ५५ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** लातुरात मित्र परिवाराच्या वतीने आणि माऊली ब्लड सेंटर लातूरच्या सहकार्याने बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज यांच्या जयंती भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात सायंकाळ पर्यंत ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सदर रक्तदान शिबिराला सकाळपासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विलास चव्हाण, कृष्णा राठोड, सागर राठोड, हरंगुळ बु. चे ग्रामपंचायत सदस्य प्रभू राठोड, ज्योती राठोड, बालाजी राठोड, नागनाथ राठोड, मनोज राठोड आदिसह ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## नाईक चौक बनला अपघाताचा हॉटस्पॉट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** लातूर शहरातून गेलेल्या रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील राजीव गांधी चौक ते महात्मा बसवेश्वर चौकादरम्यान असलेल्या वसंतराव नाईक चौकात नित्य अपघात, एकमेकांवर वाहने आदळणे असे प्रकार घडत आहेत.

आतापर्यंत या चौकात शंभरपेक्षा अधिक अपघात होऊन दहा ते पंधरा जणांचा मृत्यू झाला आहे. याबाबत या भागातील नागरिकांनी नॅशनल हायवे ॲथॉरिटीकडे तक्रार करुन या चौकात गतीरोधक बसविण्याची मागणीही केली आहे. परंतु त्यांनी दुर्लक्ष केले. आता या चौकात वाहनांच्या वेगावर नियंत्रण यावे आणि अपघात थांबावेत म्हणून या भागातील नागरिकांनी आ. अमित देशमुख यांना निवेदन देऊन साकडे घातले आहे.



लातूर शहरातील वसंतराव नाईक चौक दिवसेंदिवस अपघाताचा हॉटस्पॉट बनू लागला आहे. राजीव गांधी चौकातून बसवेश्वर चौकाकडे जाताना रस्त्यावर उतार आहे. त्यामुळे आपोआप वाहनांचा वेग वाढतो. त्याच दरम्यान वसंतराव नाईक चौक येतो. परंतु एलआयसी कॉलनी व अन्य भागातील विविध विद्यार्थी टिविशन एरियात जाण्यासाठी हाच रस्ता वापरतात. शिवाय, महिला, नागरिक, शाळकरी विद्यार्थी, तरुण, तरुणी व वाहनधारक यांची या चौकात एकच गोची होत आहे.

राजीव गांधी चौकाकडून सुसाट वेगात आलेले वाहन या विद्यार्थी व नागरिकांना धडकून पुढे जात आहे. हाच प्रकार बसवेश्वर चौकाकडून वसंतराव नाईक चौक मार्गे राजीव गांधी चौकाकडे जातानाही घडत आहे. नाईक चौकात रस्ता ओलांडने म्हणजे अत्यंत जिकिरीचे काम झाले आहे. दिवस उजाडल्यापासून ते सायंकाळपर्यंत या चौकात एकतरी अपघात झाल्याशिवाय राहत नाही किंवा एखाद्या वाहनाची धडक पादचाऱ्याला होते. अशाप्रकारे आतापर्यंत शंभरपेक्षा अधिक अपघात या चौकात झाले आहेत. या झालेल्या अपघातात दहा ते बारा जणांचा मृत्यू झाला असून, अनेकांचे हात-पाय मोडले आहेत. त्यामुळे या चौकातील अपघात नियंत्रणात आणण्यासाठी दोन्ही रस्त्यांवर गतिरोधक बसवावेत. जेणेकरून वाहनांच्या वेगाला नियंत्रण मिळेल. यासाठी वसंतराव नाईक चौकातील व्यापारी, व्यावसायिक मंडळ व प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिक व विद्यार्थी यांच्यावतीने प्रवीण घोटाळे यांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.

## माजी खासदार डॉ. गायकवाड यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** इमेज इंटरनेशनल रिसर्च असोसिएशन गोवा, नॅशनल प्रधान मुखिया सरपंच संघ, न्यू दिल्ली आणि बाबू जगजीवन राम कला संस्कृती व साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या वतीने लॉर्ड गौतम बुद्ध लाईफ 'टाईम अचिव्हमेंट इंटरनेशनल एक्सलेन्स अवार्ड माजी खा.डॉ. सुनील गायकवाड यांना गोवा येथे आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

माजी खा. डॉ. गायकवाड यांनी खासदार म्हणून केलेले काम, २०० खाटांचे सूपरस्पेशालिटी हॉस्पिटल, पासपोर्ट सेवा केंद्र, नीट परिक्षा केंद्र, राष्ट्रीय महामार्ग, नवीन रेल्वे सुरू, पीटलाईन, रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण, हिंदी लायब्ररी, उदगीर, लातूर रोड, लातूर रेल्वे स्थानकावर नवीन फलाट, तिन्ही ठिकाणी रेल्वे दादरा, खासदार फंडातून रेल्वे स्थानकावर प्रवाशांना बसण्यासाठी स्टील खुर्चा, सोफा, लातूर रेल्वेस्थानकावर व्हीआयपी लाउंज, रेल्वे बोगी कारखाना, जलयुक्त शिवार आदींसह विविध सामाजिक कार्य केले असून, याची दखल घेत गोव्यातील पणजीत त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला मुंबईच्या माजी महापौर स्नेहल अंबेकर, भाजी सैनिक अधिकारी डांगले, संजय मोहिते, हेमंत कोलंबकर, प्रा. गोरख साठे, वसंतराव महाडीक, राहुल उके, प्रो.डॉ. बी.एन. खरात, निलेश कारेकर, पांडुरंग अंबुलगेकर आदिंची उपस्थिती होती.

## दुभाजकाला दिली ट्रॅक्टरने धडक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** शहरात वाहतूक कोंडी ही नित्याचीच असली तरी जड वाहनांमुळे काय घडू शकते याचा प्रत्यय शनिवारी सकाळी आला. शहराच्या मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाच्या भुयारी रस्त्यात दोन ट्रॉलीसकट ट्रॅक्टर घुसला अन् भलताच प्रसंग घडला. भुयारी मार्गातून जाता येत नसल्याने अखेर दुभाजकावरुनच यु-टर्न घ्यावा लागला.

जड वाहनांना शहरातून वाहतूकबंदी असली तरी अनेकजण मार्ग काढतात, इथपर्यंत ठीक आहे पण शनिवारी सकाळी एक पट्याने तर भुयारी रस्त्यातून ट्रॅक्टर काढण्याचा प्रयत्न केला.

एका ट्रॉलीत महिला तर दुसऱ्या ट्रॉलीत संसारउपयोगी साहित्य होते. भुयारी रस्त्यात गेल्यानंतर ट्रॅक्टर मार्गस्थ होऊ शकत नाही हे चालकाच्या लक्षात आले. त्यानंतर कोणताच पर्याय शिल्लक नसल्याने अखेर दुभाजकावरुन युटर्न घेऊन त्याला माघारी फिरावे लागले. ट्रॅक्टर माघारी घेण्यासाठी चालकाला किमान अर्धा तासाचा कालावधी लागला. ट्रॅक्टर चालकाची ही कसरत पाहण्यासाठी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती.

## उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

## हातभट्टी अड्यांवर धाडी; ४८ जणांना अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** जिल्ह्यात विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, हातभट्टी अड्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने धाडी टाकल्या आहेत. यामध्ये तब्बल २ लाख २१ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत ४८ जणांना अटक केली असून, ५१ स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

लातूर, उदगीर, निलंगा, चाकूर विभागात मोठ्या प्रमाणावर हातभट्टी, अवैध देशी-विदेशी दारूची विक्री केली जात असल्याची माहिती



मिळाली. या माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुक्ल विभागाचे नांदेड येथील विभागीय उप-आयुक्त बी. एच. तडवी यांच्या निर्देशानुसार अधीक्षक केशव राऊत यांच्या आदेशानुसार १ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत पथकाने विविध ठिकाणी धाडी टाकल्या. यामध्ये हातभट्टी दारू ९४५ लिटर, हातभट्टी निर्मितीसाठी लागणारे रसायन १ हजार ४०० लिटर, देशी- ११२ लिटर, विदेशी दारू २१ लिटर असा २ लाख २१ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याबाबत जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये ५१ जणांविरुद्ध स्वतंत्रपणे गुन्हे दाखल केले आहेत. हातभट्टी अड्डे, अवैध देशी आणि विदेशी दारू विक्री करणाऱ्यांविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई मोहीम राबविली आहे. ही कारवाई उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक आर.एस. कोतवाल, आर.एम. चाटे, आर.व्ही. कडवे, यू.वी. मिसाळ, दुय्यम निरीक्षक आर.डी. भोसले, एस.आर. राठोड, एस.के. वाघमारे, बी.आर. वाघमोडे, व्ही. पी. राठोड आदिंनी केली.

## श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** लातूर शहरातील गंजगोलाई येथून श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७३९ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या रथातील प्रतिमेचे भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे जिल्हा महामंत्री ॲड. दिग्विजय कातवटे व युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गणेश गोमचाळे यांच्या हस्ते पूजन करून गोविंदा.. गोविंदा.. श्री वेंकटेशा गोविंदाच्या जयघोषित मंदिरापर्यंत रथाची २५० बाल वारकऱ्यांच्या टाळ्या मृदंगाच्या व ढोल ताशाच्या गजरात देवस्थानपर्यंत शोभायात्रा काढून श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ७३९ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७३९ व्या पुण्यतिथीनिमित्त मंदिरात ह.भ.प.श्री रघुनंदन महाराज पुजारी तेर जिल्हा धाराशिव यांचे कीर्तन झाले व भाजपा नेते अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते महाराजांच्या मूर्तिचे पुजन करण्यात आले. यावेळी पुण्यतिथीनिमित्त तीन हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लाड सोनार समाजाचे अध्यक्ष तथा देवस्थानचे विश्वस्त राजाभाऊ बोकन पुण्यतिथी महोत्सव समितीचे अजय भुमकर, सुनील वाडकर,कुमार अडाणे, सुजीत बोकन,नितीन बागडे, शैलेश टेहरे, रमेश अडाणे, राजेश बागडे, सचीन अडाणे, गजेंद्र बोकन, भारत बोकन, विलास भुमकर, रमेश अडाणे आदिंनी परिश्रम घेतले.

## संत रविदासांच्या विचारांची प्रेरणा घ्यावी : डॉ. रोडे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** सद्या देशात अभिव्यक्तीसह सर्वच स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचे काम होत आहे. त्यामुळे संत रविदास महाराज यांच्या सामाजिक समतेच्या विचारांची प्रेरणा घेऊन गाव, तांडा-वस्त्यातून जनजागृतीचे काम मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.

येथील संत रविदास चौकात संत गुरु रविदास, छत्रपती शिवाजी महाराज आणि संत सेवालाल महाराज संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने शनिवारी आयोजित संत रविदास महाराज जयंती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून डॉ. रोडे बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्य निटूरकर, प्रा. सुधीर अनवले, रामराजे आत्राम, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत रविदास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. रोडे म्हणाले, संत रविदास यांचे संबंध देशाच्या सामाजिक बांधणीत मोठे योगदान आहे. देशाचे ऐक्य टिकवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. भारतीय संविधानाच्या रचनेला अभिप्रेत असलेले कार्य संतांनी अगोदरच करून ठेवले आहे. त्यामुळे संविधान रुजण्याची प्रक्रिया सुलभ होऊ शकली.

यावेळी डॉ. कुंभार म्हणाले, आपल्या समोर आज फॅसिझमचे प्रस्थ वाढण्याची भीती आहे. भारतीय संविधान व लोकशाहीवर अप्रत्यक्षपणे हल्ले होत आहेत. याचा परिणाम बहुजन समाज गुलामीत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जोपर्यंत तत्व, मूल्यांच्या अंगाने जाणीव निर्माण होणार नाही तोपर्यत सामाजिक परिवर्तनाला गती मिळणार नाही, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन नरसिंग घोडके यांनी केले. यू. डी. गायकवाड यांनी आभार मानले.



## स्टोन क्रशर बंद करा; सरपंचाचे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** शेतकऱ्यांसह नागरिकांना त्रासदायक ठरणारे यशवंतवाडी गावालगतचे स्टोन क्रशर कायमस्वरूपी बंद करण्यात यावे, या मागणीसाठी रेणापूर तालुक्यातील यशवंतवाडी येथील सरपंच ओम चव्हाण यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. रविवारी उपोषणाचा सहावा दिवस होता.

ग्रामपंचायतचा विरोध झुगारून संबंधित प्रशासनही या व्यवसायाला पाठीशी घालत असल्यास आरोप होत आहे.

रेणापूर तालुक्यातील यशवंतवाडी गावालगत स्टोन क्रशर गेल्या पाच-सात वर्षांपासून सुरू असून हे क्रशर परिसरातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे.

ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा ठराव घेऊन सदर क्रशर कायमस्वरूपी बंद करून स्थलांतरीत करावे, अशी मागणी केली असता, रेणापूर तहसीलच्या मंडल अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करून वरिष्ठांना अहवालही सादर केला आहे. दरम्यान, क्रशर बंद करण्यात आले होते. मात्र, पुन्हा तात्पुरत्या परवानगीने ते सुरू करण्यात आले आहे. सदर क्रशर तत्काळ बंद करावे व नागरिकांना दिलासा द्यावा, या मागणीसाठी यशवंतवाडीचे सरपंच ओम चव्हाण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत असून प्रशासनाने त्यांची अद्याप दखल घेतली नाही.

## फेरीवाल्यांचा प्रश्न चिघळला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** गेल्या दोन दिवसांपासून शहरातील गंजगोलाईतील भाजीपाला व फळविक्रेत्यांचा प्रश्न चिघळला आहे. गंजगोलाईतच व्यवसाय करणार अशी भूमिका व्यावसायिकांनी घेतली आहे तर तुम्हाला फ्रूट मार्केटमध्ये पर्यायी जागा दिली आहे, तिथे व्यवसाय करा. वाहतुकीला अडचण येत आहे, असे महापालिकेकडून सांगण्यात येत आहे. शनिवारी सकाळी फेरीवाल्यांनी स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेचे अध्यक्ष मोहसीन खान यांच्या नेतृत्वात पालिका प्रशासनाचा निषेध नोंदवत रस्त्यावर भाजी व फळे टाकून रस्त्यावरच ठिय्या दिला तर रविवारी भाजीपाला व फळांचे गाडे उलथून टाकल्याने काही वेळ तणाव निर्माण झाला होता.



गेल्या दोन दिवसांपासून महानगरपालिका प्रशासनाने गंजगोलाईतील फेरीवाल्यांना निश्चित केलेल्या फ्रूट मार्केटमध्ये जावे म्हणून त्यांना हटविण्याची मोहीम सुरू केली आहे. मात्र, शनिवारी सकाळी ९ वाजेपासूनच या परिसरातील फेरीवाल्यांनी आंदोलन तीव्र केले आहे. आपण करीत असलेल्या व्यावसायातील भाजीपाला व फळांचे गाडे अक्षरशः रस्त्यावर ओतून या आंदोलनकर्त्यांनी ठिय्या दिला. आम्हाला याच ठिकाणी व्यवसायाला परवानगी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. गोलाईतील फेरीवाल्यांना महापालिकेने पर्यायी जागा घोषीत केली होती. मात्र, त्या ठिकाणी ग्राहक येत नाहीत, आम्ही तिथे व्यवसाय करणार नाही. आम्हाला गंजगोलाईतच व्यवसाय करू द्यावा, अशी मागणी व्यावसायिक करीत आहेत. जी जागा पर्यायी जागा म्हणून निश्चित केली होती, त्याशिवाय दुसरीच जागा महापालिका दर्शवत आहे. तशी लेखी मान्यता महापालिका प्रशासनाने दिली द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

महापालिका प्रशासनाने फेरीवाल्यांसाठी आठवडी बाजार म्हणून काही जागा निश्चित केल्या आहेत. त्याही फेरीवाल्यांना मान्य नाहीत. भाजीपाला, फळे आदीसारखा व्यापार हा गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठेतच असतो. पर्यायी जागा म्हणून तुम्ही दूर कोठेतरी जागा देणार असाल तर ते फेरीवाल्यांसाठी व ग्राहकांसाठीही त्रासदायक आहे, अशी तक्रार करण्यात येत आहे. दरम्यान, रविवारी गंजगोलाईत फेरीवाल्यांची गाडे उलथून टाकण्यात आले. यामुळे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## 'दयानंद'च्या सांस्कृतिक कार्यक्रमाला तरुणाईंचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ फेब्रुवारी -** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी ' इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन केमिस्ट्री फॉर सोसायटी, हेल्थ, इंडस्ट्रीज ॲन्ड फार्मसी (आयसीसीएचआयपी-२०२५ )' या विषयावरील तीन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे औचित्य साधून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दिल्ली येथे सादरीकरण केलेले सामूहिक. नृत्य व गिनीज बुक ऑफ वर्ल्ड. रेकॉर्डमध्ये नोंद असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या दयानंद सभागृहात करण्यात आलेले होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमात गणेश वंदना,सत्यम शिवम सुंदरम,बहुरूपी सोंग, लावणी, अभंग,मिमिक्री, कव्वाली, लंम्बाडी गीत,भैरवी आदि गितांच्या माध्यमातून तरुणाईंचा जल्लोष दिसून आला.

यावेळी डॉ.पद्मावती बियाणी, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे जय माँ भारती नृत्य महोत्सवात महाराष्ट्राचे कोळी नृत्य सादर केलेल्या सायली पंडित, शिवकन्या भद्रे व अजित गुजर तसेच आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.सांस्कृतिक प्रभारी प्रा.मेघा पंडित यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केलेले होते.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजक डॉ.रवींद्र शिंदे, समन्वयक डॉ.नाथराव केदार तसेच डॉ. चंद्रशेखर स्वामी, डॉ.गजानन बने,प्रा.श्वेता मदने, प्रा.सुरेंद्र स्वामी आदी उपस्थित होते.